डॉ. नितीन मोरे

# वाळूतील रेषा

# वाळूतील रेघा

डॉ. नितीन मोरे

ई साहित्य प्रतिष्ठान

# वाळूतील रेघा

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फुकट नाही

### हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

### असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.
## साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# वाळूतील रेघा

लेखक  :डॉ. नितीन मोरे

Mobile No. 98209 37490, 98696 73415.

Email - drnmore@yahoo.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखककाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.  तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957.  Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : २८ जुलै २०१९

©esahity Pratishthan®2019

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

## डॉ. नितीन मोरे यांची साहित्यसंपदा:

1. चक्रमादित्याचा दरबार १(नाटक)
2. चक्रमादित्याचा दरबार २(नाटक)
3. केल्याने शीर्षासन,
4. नाच जमूरे नाच,
5. अहम ब्रह्मास्मि,
6. मच्छर टाईम्स,
7. संवादोनी प्रकटावे
8. या कोल्हटकरांच्या घरात (नाटक )
9. प्रेमातुराणां (नाटक)
10. सांगतो ऐका (एकपात्री)
11. प्रिय पत्रास
12. शिभ्रष्टाचार!
13. आधुनिक कहाण्या
14. अवलोकन..अनुभव..मनोव्यापार
15. राग दरबारी
16. **वाळूतील रेषा**

हीं सर्व पुस्तके ई साहित्यच्या वेबसाइटवर

विनामूल्य उपलब्ध आहेत.


www.esahity.com

डॉ. नितीन मोरे यांची ई साहित्यतर्फ़े प्रसिद्ध झालेली पुस्तके



















डॉ. नितीन मोरे
प्रिय पत्रास,



डॉ. नितीन मोरे
HOSTEL-I
प्रेमातुराणां


डॉ. नितीन मोरे
अ..अ..म..
अवलोकन.अनुभव.मनोव्यापार


डॉ. नितीन मोरे
मच्छर टाईम्स


डॉ. नितीन मोरे
या
कोल्हटकरांच्या
घरात


डॉ. नितीन मोरे
चक्रमादित्याचा दरबार
२


डॉ. नितीन मोरे
संवादांनी
प्रकटावे


डॉ. नितीन मोरे
एकपात्री नाट्यछटा
सांगतो
ऐका


डॉ. नितीन मोरे
भ्र
शिष्टाचार

# वाळूतील रेघा

# वाळूतील रेघा

**प्रस्तावना**

*प्रथमपुरूषी..*

*मध्ये माझा एक मित्र भेटला. म्हणाला, "वाचलीत तुझी ती पुस्तके. विनोद म्हणून ठीक आहेत पण कितीही चांगला असेल विनोद ना तरीही विनोदाला ती खोली नसते."*
*"खोली? अरे असे पण मुंबईत जागेची कमी. त्यात अजून खोली कुठून मिळायला?"*
*माझ्या मते मी खोलीवरून बरा विनोद केला. पण त्याच्या चेहऱ्यावरच्या आठ्यांची खोली काही कमी होईना.*
*"अरे आजूबाजूला बघ. सारे दु:ख चराचरात साठून वर उरले आहे दशांगुळे. मानवप्राणी आपल्याच जगण्याने हैराण आहे. कुणाला आजची तर कुणाला उद्याची भ्रांत आहे. काही तर पुढच्या जन्माचीही चिंता करण्यात व्यस्त आहेत.. आणि तुला विनोद सुचतो?"*
*"म्हणजे? मी ही त्यांच्यात बसून चिंता करू म्हणतोस?"*
*"अर्थात. तशीच आहे परिस्थिती. दुनिया किती जालीम आहे. त्यात तुला हसावेसे कसे वाटू शकते?"*
*"मग काय? रडू?"*
*"नाही.. तुझ्यासारख्यांनी जीवनाचे सखोल चिंतन केले पाहिजे. आयुष्याचा अर्थ लावला पाहिजे."*
*"म्हणजे?"*
*"हे तू मलाच विचारतोस? बरोबरच आहे! बोलून चालून विनोदी लिहिणार.. तुझ्या विचारांत कुठून येणार डेप्थ?"*
*त्याने खोली शब्द मुद्दाम टाळला असावा.*
*"मग काय करू सांग. अरे विद्वज्जनांच्या पंक्तीत मला कच्चा लिंबू म्हणूनही नाही घेत."*
*"सोपेय. लिही काही अर्थगर्भ!"*

*अर्थगर्भ पुढे मी 'म्हणजे?' विचारणार होतो. पण मौनात खरोखर जग तरते! उगाच मला त्या शब्दाचा अर्थच माहिती नाही ह्याची त्याला का माहिती करून द्यावी?*

*मी मग विचार केला खूप. साहित्य दरबारी नोंद हवी असेल तर अर्थगर्भ का काय ते लिहिण्यास आयुर्विम्यास नसतो तसा पर्याय नाही. कुणीतरी माझे लिखाण गंभीरपणे घ्यावे.. पर्यायाने मला ही.. या विचाराने मी झपाटलो. म्हटले शेंडी तुटो की पारंबी.. मी यशस्वी होणारच! नुसताच गंभीर नाही.. तर विचारवंत म्हणून ओळखला जाईन मी. नुसत्या गंभीर लेखकाचा 'लो एम' ठेवण्याचा 'क्राईम' कशाला.. अगदी डायरेक्ट विचारवंतच होईन मी!*

*विचारवंत म्हणून स्वतःस म्हणवून घ्यायला मग काय काय नाही केले मी! अगदी गंभीर चेहऱ्यानी फोटो काढले. सेल्फी सुद्धा. कपाळास आठ्या घालून बसलो दिवसेंदिवस. पण विदुषकास कोणी घेतच नाही गंभीरपणे आणि कोणी म्हणतच नाही विचारवंत! मग बसलो लेखणी सरसावून. आणि काही चिंतनात्मक लिहू म्हटले! लिहावयास बसलो. पण मूळ स्वभाव जाईना. तरीही गांभीर्याचा उसना आव आणत लिहिलेल्या लेखांचा हा संग्रह. मूलभूत आणि मूलगामी! कुणी गोमय पार्श्वभागी थापून बैल म्हणा असा प्रयत्न करतो तसा हा विचारवंत म्हणवून घेण्याचा प्रयत्न!*

*वाळूतल्या रेघा आणि इतर 'ललित' अंगाने लिहिलेल्या लेखांचा हा संग्रह.. वाळूतल्या रेघांसारखे हे लिखाण अल्पजीवी न ठरो म्हणजे मिळवले!*

डॉ. नितीन मोरे

१ वाळूतील रेघा

२ आम्ही : एक विचारवंत!

३ माझे साहित्यिक आत्मकथन

४ आम्ही भ्र.तंत्रस्वामी!

५ माझे चाहित्यिक आत्मकथन

६ नाट्यभैरव अनंतरामांचे मनोगत

७ गिरीशरावांचे गुऱ्हाळ

८ असा मी असामी!

९ एक मूलभूत मूलगामी मागोवा!

१० मी (असा) कसा घडलो

११ म्हातारा इतुका..

१२ दंतपुराण

## वाळूतील रेघा

चिमटीत पकडलेली रेती.. काळासारखीच असते म्हणे.. सरकन जाते निसटून.. पाठी न सोडता कसला मागमूस. काळ पुढे जाताना आपल्या बऱ्यावाईट आठवणी तरी सोडतो. वाळू निसटते तेव्हा ते देखील नाही राहात मागे!

समुद्राच्या काठावर.. काठ कसला किनारा तो.. अलगद पाय सोडून बसलेला मी.. वाळू गुदगुल्या करतेय.. पाण्यापासून दूरवर कोरडी वाळू.. पिवळीशार.. चाळा हातांना म्हणून ओढतोय काही रेघा.. जोरदार वारा आला तरी मिटतील त्या ते माहित असूनही! जवळ छोटी पोरे जीव लावून बनवताहेत किल्ला रेतीचा.. एका लाटेबरोबर तो नाहीसा होईल हे ठाऊक असूनही! समुद्रकिनाऱ्यावरचा झोंबरा वारा.. लाटांची गाज.. मधूनच भरती आली की की दूर किनाऱ्यावर पोचणारे पाणी. आपल्यासोबत सारे आपल्यात सामावून घेत मागे हटणारा ओहोटीचा दर्या.

आठवतात ते बालपणीचे दिन.. पाठीवर दप्तर नि पाटीपेन्सिल हाती घेऊन शाळेतले दिवस. अभ्यासाशिवाय गती नाही असला उपदेश ऐकून जीव तोडून केलेला अभ्यास.. पुढे काय..मग तशाच अभ्यासाची झाली जणू सवय! अजून आहेत शाळेतल्या त्या चिमुकल्या आठवणी...

जमतंय तर अजून लिहायला.. चांगले वाटतेय वाचताना. आणि अर्थात लिहायलाही. बालपण आणि आठवणी! अजून काय असणार.. आठवणीच फक्त. चिमटीतून निसटून गेलेल्या वाळूसारखे बालपण गेले. त्यावर लिहू काही! म्हणजे अगदी आयुष्यावर बोलू काही! अख्खे आयुष्य एकीकडे नि बालपण एकीकडे. नकोच! कितीही प्रयत्न करा पण हे गंभीर वगैरे व्हायला नाही जमत मला. उगाच लांब तोंडे घेऊन कशाला बसावे? त्यापेक्षा मस्तपैकी चार हाणावे विनोदाचे काही किस्से.. हसावे मस्त दात काढून.. मग म्हणणारे म्हणोत.. हसतील त्याचे दात दिसतील!

गंमत सांगू का.. त्या बापड्यांचेच दात दिसतील! का? विचारा तर! का काय.. तर अहो, आमच्यासारख्यांच्या तर हसलं की दिसतात त्या कवळ्या! थोडक्यात हसतील त्याचे दात दिसतील ही म्हण आम्ही पाडलीय खोटी! आणि आमच्याकडे जे अपेक्षेने पाहतील ते आमचे दंतविहीन निरागस हास्य पाहून स्वतःच हसत सुटतील.. आणि त्यांचेच दिसतील दात! असो. विषय काय नि सांगतो काय! पण मूळ विषयापेक्षा अशा फुटलेल्या वाटांवरच गंमत असते. उगाच रूळलेल्या नि मळलेल्या वाटांवर चालून तेच ते आणि तेच ते अनुभव कशाला? आहे ना अशा वाटा फुटण्यात गंमत? हो म्हणा की नाही.. आम्हाला काय फरक पडत नाही!

म्हातारपणात हे असे होते म्हणे.. कोण म्हणे? तर तो कोपऱ्यावरचा हणमंत बळवंत कोपरगावकार! नावाची कसली आगगाडी त्याच्या. मला म्हणतो कसा..'ऐका बळवंतराव कोपरगावकर .. हाडे गेली मसणात.. अजून शौक सुटत नाहीत. घ्या देवादिकाचे नाव. जोडा गाठीस पुण्याची पुंजी.. या जन्मी नाही तर पुढील जन्माची तरी लावा सोय! उगाच काढताय दात.. होणार.. वय झाले.. असेच होणार!' एवढे बोलून हणमंता दात काढतो! हणमंता म्हणतो ते खरेच असणार.. पूर्वजन्मी पुण्य केले असते तर असे ऐकावे लागले असते? बोळके झाले तोंडाचे पण मेंदू तल्लख आहे अजून माझा!

तर काय तर.. वय म्हणे! अरे, आजही लहानपणीच्या आठवणी ताज्या आहेत. लिहीणार की नाही मी त्याच्याबद्दल? अर्थातच लिहीणार! त्या लिहून मग जाऊ पुढे! पुढे म्हणजे लवलवत्या तारूण्याच्या फसफसत्या आठवणी! बालपणी आम्ही जायचो चार बुके शिकायला हे खरे.. आता ही 'चार बुके शिकणे' अशी भाषा अति प्राचीन झाली की नाही? हल्ली तर सारी पोरेपोरी स्कूलात जातात. आमच्या वेळची पाटी न पेन्सिल पण आता कटाप! तर बुके बिके शिकणारे ते तर अजूनच जुन्या जमान्यातील .. पगडी आणि शेंडीधारी! तर ते असो. कटाप वरून आठवला.. कटप्पा! आमच्या वेळी आम्ही जायचो पाटी पेन्सिल घेऊन. त्यावेळेस सगळ्यात मोठे टेन्शन म्हणजे पाटीवर लिहून आणलेले पुसले गेले तर! बाई म्हणणार.. अभ्यास केला नाय.. आणि

पिळणार कान. अगदी कटप्पा करायच्या तेव्हा. कटप्पा शब्द नसेल तेव्हा. पण आजच्या जमान्यातल्या भाषेत समजेल ना सर्वांना चटकन. तर ती ही असायची एक गंमत आणि काय! लहानपणी अभ्यासात मी तसा ढ. पण छडी आमच्या वेळेस तडीपार झाली नव्हती. तर त्या छडीच्या जोरावर हळूहळू ढ पणा कमी झाला. मग अभ्यासाचीच गोडी लागली.

कॉलेजमध्ये आलो तर नाकापुढे पाहात अभ्यास एके अभ्यास! थोडे विषय सोडून तुम्हाला सांगतो, एवढी पुस्तके लिहिली, हिने त्यातले एक ही वाचले असेल तर शपथ. तसे बरेच म्हणावे! आपल्याला हवे ते लिहावयास! तर सांगत कॉलेजबद्दल होतो. हिच्याबद्दल सांगतोय त्याला हेच कारण आहे. नाकासमोर चालणाऱ्यास पण आजूबाजूला हिरवळ दिसू नये असे थोडीच आहे. दिसायच्या नयनरम्य नयनतारा! असे अनेकवचनी फक्त नयनरम्यांबद्दल. पण तशी घाव घालून गेलेली ती एकच! म्हटले ना ही वाचत नाही.. त्याचा संदर्भ हा! तर आज लिहूनच घेतो तिच्याबद्दल. आज पन्नाशी उलटून गेली. माझी नव्हे! तिला पहिल्यांदा पाहिले त्याची! अगदी प्रथम तुज पाहता जीव वेडावला अशी गत! नाव तिचे होते.. खरे सांगत नाही. उगाच तिच्यावर आफत! खरेतर आज ती पण माझ्याहून थोडीच कमी वयस्कर असणार. तरी पण नकोच.

वयावरून आठवले. काय गंमत झाली पहा. आमच्या कॉलेजच्या पोरापोरींचे झाले गॅदरिंग आता दोन वर्षांपूर्वी. अगदी आमच्या कॉलेज कॅम्पस मध्ये. तेव्हा आवडायच्या नयनतारा आता बघून गंमत वाटली. मी गेलेलो. कधी घालत नाही ती जीन्स आणि टी शर्ट आणि चक्क स्पोर्ट्स शूज घालून. मला तरी आरशात हा रूबाबदार कोण असा प्रश्न पडला. हिने चिडवलेच.. कोण मैत्रीण भेटणारे का म्हणून! चला म्हणजे मी तसा मैत्रीणीस भेटावयास जातो असा दिसतोय हे ही नसे थोडके! तर आमच्या कॉलेजच्या त्या पोरी. तेव्हाच्या त्या चवळीच्या शेंगा बघता बघता आता पेंगा यायच्या. मी माझा मित्र मिलिंदाला म्हटले ही, 'ही पहा तुझी ज्योती.. बने ज्वाला!' ज्योती अलमाडी आता ज्वालेसारखी फुलली होती. मिलिंदा कसला हटतोय.. म्हणाला, 'छट रे, मी असतो तर ती अशी नसती.. तशीच असती! तिच्या नवऱ्याला काळजी घेता येत नाही बघ!'

आहे ना गंमत. याला म्हणतात पहिला प्यार आणि सच्चा प्यार! हे शब्द हल्लीच शिकलोय बरे टीव्हीवरच्या सीरियल पाहून. तर माझीवाली ती आमच्या गॅदरिंगला खरी यायला नको कारण ती मला दोन वर्षे ज्युनियर. पण आली. आमच्याच मित्रापैकी एकाने नंबर लावला आणि हम देखते ही रह गए! आणि आज मिरवायला घेऊन आला तिला ही! खरे सांगू माझी

आजची 'ही' तशी छान आहे. तशी छान कसली.. छानच आहे. माझी लिखाणाची हौस भागवतो मी.. ते फक्त वाचण्याचा तिचा आळस सोडला तर! तर सांगत त्या जुन्या फ्लेम बद्दल होतो. तिला सोयीसाठी तेच नाव ठेऊ! फ्लेम! तर फ्लेमला पटवले ते आमच्याच बॅचच्या गायतोंड्याने. आता हे नाव पण बदललेय मी. आपली मध्यमवर्गीय भीती हो. उगीच कुणाबद्दल काही लिहून वाद ओढवून पुस्तके विकायला मी काही सराईत बनिया लेखक नाही. खरे तर पुस्तकांच्या आवृत्त्या आणि त्यांना कॉप्यांनी अडवलीय घरात जागा. माझ्या लिखाणावरचा हिचा निम्मा राग त्या माळयावरल्या अडलेल्या जागेनेच असावा असा मला संशय आहे! हे म्हणजे माझे लिहीणे छान नि त्यावर हिचा राग नाही.. नसावा.. असे आपलेच आपण केलेले समाधान आणि काय! असो. तर पुन्हा पेटवू ती ज्योत.. म्हणजे फ्लेम! त्या काळतोंड्याबरोबर म्हणजे गायतोंड्याबरोबर शोभत नाही जोडी. तशी ती जाडी झालीय नि हा.. टकलू आणि बोळक्या. अर्थात तसा  कृतांतकटकामलध्वजा मी पण.. पण अजून पाठीतून वाकलो नाही! गायतोंड्या चालतो काठी टेकत! त्याचे काही नाही. पण फ्लेमला याने पळवले ते माझ्या डोळयादेखत! आता सांगायला हरकत नाही.. मी मारे असा सांगतोय पण फ्लेम शी कधी चार शब्द देखील बोललो नव्हतो  तेव्हा. तर तिला दिलकी बात सांगायची तर दूरच! गायतोंड्या तेव्हाही धडाडीचा. आजच्या अवताराकडे पाहून कल्पना नाही यायची. पण तेव्हा चांगलाच फेमस होता. त्याला ही पटली तर नवल नव्हते. माझे काय.. उगाच गेल्या दिवसांच्या आठवणी काढत गवताच्या काड्या चघळाव्यात तसे चघळत बसायचे.. म्हातारचळ म्हणा!

असो. पण हे असे होते. लिहू म्हटले तर भरकटायला होते. लिंक लागते कधी.. कधी तुटते. कुठे विषय बदलतो तर कुठे मधेच कसलीतरी आठवण येते नि सांगायची विसरू नये म्हणून लिहावी लागते.

लिहिण्यावरून आठवतय.. काय लिहायचो मी महाराजा! पंधरा पुस्तके झाली माझी. काहींच्या दुसऱ्या आवृत्त्या तर काही तिसऱ्या. नि आधी म्हणालो ना तशा काही न खपता पडून. त्या आधीच्या खपलेल्या आवृत्यांचे नाही हिला कौतुक. पण पडून राहिलेल्याची काळजी! काळजी पेक्षा जागा अडवून बसलीत त्याचा राग असावा!

लिहायला मी कधी लागलो ते आठवत नाही. कॉलेजमध्ये असताना कधीकधी लिहायचो. मराठी वाङ्मय मंडळातले माझे लेख लागायचे बोर्डावर. त्याकाळी मी गंभीर आणि काहीतरी अर्थपूर्ण लिहायचा प्रयत्न करायचो. पुढे अभ्यास वाढला. नंतर नोकरी नि घरच्या जबाबदाऱ्या आल्या. लिहीणे विसरलो असे वाटले. पण नाही. दाबून ठेवलेली ती लिहिण्याची ऊर्मी केव्हातरी उफाळून येणारच असावी. एके दिवशी अचानक मी नव्याने लिहायला लागलो. फरक इतकाच पडला की आता गंभीर लेखन पूर्णपणे व्यर्ज. लिहावे ते हसवण्यासाठी. उगाच कोणाच्या डोळयांतून टिपे कशाला काढायची. अर्थात मलाही नाही आवडत ते टिपे गाळणे. सुख जवापाडे म्हणतात. मला नाही पटत. मला छोट्या गोष्टीत सुख दिसावयास लागले की आयुष्य कसे सुंदर वाटू लागायचे. कोणास हसवणे याहून दुसरे चांगले काम नाही म्हणून विनोदी लिहायला लागलो. कुणी पहिल्यांदा छापेना. साहित्य बऱ्यापैकी जमले. त्याचे करायचे काय? दरवर्षी गोष्टी पोस्टाने पाठवयचो मासिकांना. आता मराठी मासिके जवळजवळ बंदच पडलीत. पण तेव्हा जोरात नि जोमात होती. पण कुणी छापेल तर शपथ. उगाच पोस्टाच्या तिकीटांचा भुर्दंड. ही त्यावरून टोचायची. घरी खर्चाला पैसे कमी पडतात नि तुम्ही आपले दान करताय पोस्ट खात्याला? मग एका वर्षी एका दिवाळी अंकात पहिली गोष्ट आली. चुकून असावी. तेव्हाचे संपादक प्रथम हाच विचार करीत असावेत.. या लेखकाचे आजवर काय काय प्रसिद्ध झालेय.. नाव झाले असेल तर छापू. छापत नाही म्हणून नाव नाही.. आणि नाव नाही म्हणून छापत नाही असले दुष्टचक्र! मग नाव झालेले काही लेखक पाट्या टाकाव्यात तसे लिहीत कित्येकदा. आणि ते ही खपून जाई. पुढे काही अजून मासिकांतून चौकशी झाली. नियमित लिहायला लागलो. नाही, ते तर लिहीत होतोच. नियमित प्रसिद्ध होऊ लागले. दोन तीन वर्षात पुस्तक निघाले. आणि विश्वास बसू नये असे खपले. पुढे हे सुरू राहिले. पासष्टीला पंधरावे अपत्य जन्मले.. ते मात्र अजून घरी पडून आहे. दुकानात कुणी हात लावेना. कसा कोणास ठाऊक लिहीता हात आखडता झाला. आधी गोष्टी लिहायचो. त्यानंतर कादंबऱ्या आल्या. शेवटची 'प्रथमा तुज पाहता' तिच्याकडे कुणी न पाहिल्याने प्रथमपासूनच अडकली घरात. वाहता प्रवाह अडला असावा. अध्येमध्ये लिहायचो. जुनी थोडी मासिके टिकून होती. ती छापायची काही. पण ती ही मासिके आता बंद. बहुतेक आता फक्त दिवाळी अंक छापण्यामागे लागलेले. माझा उत्साहही आटला. आज विचार करतो तर गंमत ही वाटते, पहिल्यापहिल्यांदा काही छापून आले की आनंद वाटे. काही दिवस हवेत तरंगावयास होई. पहिली काही वर्षे तर स्वप्ने पडत.. कुठे

'कोपरगावकरांचा विनोद' यावर लेख लिहील कोणी. तर कधी उत्कृष्ट विनोदी साहित्य निर्मितीचे पारितोषिक मिळाले असे मला. पुढे हे सारे किती निरर्थक हे जाणवू लागले. लिहायची खाज.. साहित्यिक शब्द .. ऊर्मी.. मलाच! मी लिहिले काय की न लिहिले काय.. फरक कुणाला पडतोय! मग छापून आल्याचा आनंद एका दिवसावर टिकेना झाला. अर्थात आतून यायचे तेवढे लिहीणे सुरूच होते माझे हे खरे.

गेले काही वर्षे आता लिहावेसे वाटत नाही. मागे काही आठवडे न लिहीता गेले की थोडेफार अस्वस्थ व्हावयास होई. आता ते नाही. लिहू की न लिहू.. हा प्रश्न नव्हता. लिहावेसे वाटले की लिहावे. नाही तर नाही. कित्येक वर्षे तर ओढाळ वासरासारखे हात शिवशिवायचे लिहिण्यासाठी. कुठूनतरी सुरुवात होई. गोष्ट कुठे ना कुठे पोहोचत असे. गोष्टीतली पात्रे एकेक पात्र म्हणण्यालायक असतील एवढी काळजी घेतली की झाले. माझ्या 'उसवशील खास मला' गोष्टीत नायक शिंपी होता. नायिकेच्या प्रेमास भीक न घालणारा. मग नायिका खास गाणे गाते.. उसवशील खास मला! असली अतरंगी पात्रे घेतली की गोष्टीत मजा येई. अशा थोड्याथोडक्या नाहीत तर शंभर एक गोष्टी लिहिल्या मी. पण मन रंगत असे ते कादंबऱ्यांत. एक लिहायला घेतली की काही महिने तिचाच विचार. माझे ते पंधरावे पुस्तक खपले असते तर मी कदाचित रिटायर झालो नसतो. तेव्हाच 'एका विदूषकाची कहाणी' असले काही आत्मचरित्र लिहून टाकले असते!

कोणास वाटेल ही लेखनकामाठी म्हणजे माझे मुख्य जीवनकार्य. तसे नव्हतेच काही. आपल्याकडे पुस्तकांवर वा तत्सम साहित्यावर जगणारा वा जगू शकणारा एकच.. तो म्हणजे रद्दीवाला! त्यातही तो नुसत्या रद्दीवर थांबत नाही. जुन्यापुराण्या भंगाराची जोड देतो! तिकडे म्हणजे परदेशी लेखक पुस्तकाच्या बिदागीवर जगतात. असली चैन थोडीच परवडेल आम्हाला.

तर मी एका रूक्ष अशा बिल्डर ऑफिसात होतो काही वर्षे. कल्पनांचे इमले बांधणे इतकीच ऐपत असलेल्यास हे बांधकामाचे काम मिळावे! पण आमच्या वेळी आजसारखे ना बिल्डर होते ना तशी घरे घेणारे लोक. गुणवंताने कर्ज काढून बंगला बांधला. आमच्यावेळीस कर्ज काढणे अब्रह्मण्यम!

आधी आमचे घर होते तिसऱ्या मजल्यावर. तीन खोल्या. त्यात स्वतंत्र बाथरुम ही मोठी चैन. तेव्हा हणमंता.. अंघोळीस उशीर झाला कुणी आत असेल तर.. तर सरळ शाळेस दांडी मारायचा. आता तर प्रत्येकास स्वतंत्र खोली. एक दोन नाही तर तीन तीन बाथरुम्स! मला लिहायचे नसते हल्ली तरी गुणवंत बेट्याने माझ्यासाठी मुद्दाम टेबल खुर्ची बनवून घेतलीय. अगदी वरून टांगलेल्या टेबललॅंप सकट! अगदी या म्हाताऱ्याम्हातारीस स्वतंत्र खोली मिळाली. आमच्या त्या खोलीत तर ही प्रथम गांगरून गेली. पण म्हणाली, 'बघा मुलगा कसा कर्तृत्ववान निघाला.' हणमंत आपल्या खोलीत असतो एकटा, दैवाच्या नाहीतर अजून कुणाच्या नावे बोटे मोडत.

घराबद्दल आधी लिहिले तर हिच्याबद्दल लिहायचे गेले राहून. अगदी फ्लेम पण आधी चमकून गेली. याला कारण हे वयच असं असतं! अगदी पौगंडावस्थेस वापरले जाणारे वाक्य वापरतोय.. पण असतं.. हे वयच असं! मध्ये आठवले काही.. काही विसरले. प्राध्यापकास शोभत नाही असे वरखाली लिखाण. पण मी मलाच मोकळीक दिलीय. लिही जे जसे जमेल नि आठवेल तसे! आणि गंमत म्हणजे मी प्राध्यापक होतो हे सांगितलेच नाही. तर बिल्डरच्या ऑफिसातून थेट गेलो तो विद्यादेवीच्या पायी.

मी जात्याच हुशार. त्यात पदवी नि पदव्युत्तरही डिस्टिंक्षन काही चुकले नव्हते. आमच्या डेक्कन कॉलेजात जागा रिकामी होईतोवर बांधून घेतले इमले बिल्डरच्या ऑफिसात. कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून रूजू झालो नि तिथेच गाठ पडली कुमुदिनीची! तुम्हाला वाटेल कुणी विद्यार्थिनी असेल. नेहमीची लव्हस्टोरी असेल. म्हणजे मराठी साहित्य वाचून तुम्हाला असे वाटले तर नवल नाही. त्यात कसे एक कॉलेज असते. एक माझ्यासारखा होतकरू आणि देखणा(!) हीरो प्रोफेसर म्हणून वर्गावर येतो. कथानकाच्या सोयीवर अवलंबून पुढे काय घडणार ते अवलंबून. म्हणजे सरळसोट असेल कथा तर ती जी कुणी असेल ती त्या हीरोकडे डोळे भरून नुसते पाहात राहिल. हळूहळू पुढे जाईल ती प्रेमकथा. नाहीतर टाका कुठे शैक्षणिक सहल. तिच्यात ती कुठल्यातरी संकटात नि आपला हीरो चालला मदतीस! अजूनही काही फॉरमॅट आहेत. पण विषय तो नाही. म्हणून डायरेक्ट आपल्या कुमुदिनीवर येतो. आपल्या म्हणजे आपल्या विषयावर! तर कुमुदिनी आमच्या कॉलेजचे प्रिन्सिपॉल कीर यांची मुलगी. जेष्ठ. सरांना आडवळणाने माझ्याबद्दल

कळले प्रथम नि नंतर लक्षात आले की तो मीच! मग रीतसर मागणी घालणे नि कांदेपोहे खाणे झाले. ते पचवून घरी येईपर्यंत माझा निर्णय झाला होताच. आता हिच्याबद्दल लिहितोय तर तिचा निर्णयही आपसूक समजला असेलच! तर कुकी म्हणजे कुमुदिनी कीर, कुको.. म्हणजे कुमुदिनी कोपरगावकर झाली! ही आहेच तशी छान. पण प्रिन्सिपॉलची कन्या.. एका प्राध्यापकाची पत्नी.. पण पुस्तके वाचण्याशी वैर! माझी पुस्तके वाचणे तर नाहीच नाही. बाकी सारे उत्तम. आपल्या नेहमीच्या पद्धतीने सांगायचे तर मग संसारवेलीवर दोन फुले उमलली नंतर!

हणमंत म्हणजे आमचा मोठा. लाडाकोडाने वाढलेला. पण सदा रागावलेला. अगदी शाळकरी दिवसांत सुद्धा. त्याच्या रागाची सुरुवात बहुधा त्याच्या नावाने झाली असावी. माझे नाव बळवंत. माझी शरीरयष्टी त्या नावाच्या व्यस्त प्रमाणात असेलही पण आमच्या काळी अशी नावे ठेवायची पद्धत असे. त्यात नाव ठेवावेसे काही आहे असे वाटत नसे आम्हाला. नाव असेच देवादिकांचे वा गुणवाचकच असणार! आजसारखे रोहन वा राहूल नाहीतर आहव.. आरव असली नसत नावे तेव्हा. तर हणमंत आपल्या नावावर उखडायचा. लहानपणीच शाळेत हणमंतचा हणम्या झाला. पोरे त्यास हणम्या म्हणत! तेवढे त्याला रागावण्यास पुरेसे होते. मुलाचे पाय असे पाळण्यात दिसले! म्हणजे रागीट जमदग्नीचा अवतार आणि त्यात परत तिरसटपणा. ब्रह्मचारी राहिला म्हणून त्याची न झालेली बायको.. जी कुणी असती.. ती तरी सुटली असे वाटायचे मला. पण आज आता काळजी वाटते. म्हातारपणच्या एकेक चिंता. झाले असते लग्न तर कुणी असती आमच्यामागे काळजी घ्यायला.. नि करायला सुद्धा. असो. दुसरा आमचा गुणवंत. तो नावाला साजेसा. हुशार आणि सिन्सियर. खूप पुढे गेला आणि हा ॲंग्री यंग हणमंत आपल्या नावा मुळे पुढे जाता आले नाही अशी आपल्या नावाच्या नावाने बोटे मोडत राहिला. ते जे उदासीनतेचे शेवाळ त्याच्या स्वभावाव रवाढले ते तेव्हा पासून वाढतच गेलेय. हणमंता नावाला जागून की काय पण ब्रह्मचारी राहिला.

गुणवंतला त्याच्यासारखीच गुणी बाळे आहेत. 'आजोबा आजोबा' म्हणून ती जवळ येतात तेव्हा पेन्शनर लोक आपल्या बंगल्याचे नाव 'सार्थक' वगैरे ठेवतात ते पटायला लागते.

सांगावयास सुरुवात कुठून केली. कुठून कुठे येत गेलो. खरेतर आत्मचरित्रच लिहावयास हवे होते. पण आता ना वय साथ देते ना लेखणी. एवढ्या साऱ्या वर्षांचा कसा मांडावा हिशेब आणि कसे लिहावे सुसंगत? लिहायला बसलो की बालकांड आणि तारूण्यकांड एकात एक मिसळतात. वृद्धावस्था तारूण्याच्या सीमेवरून कधी सुरू झाली ते कळले देखील नाही तर लिहिता लिहिता सरमिसळ होणारच ना! त्यात परत माझी स्मरणशक्ती! जुने आठवते पण नव्याचा पडतो विसर. कधी तर आज जेवलो का किंवा काय जेवलो याचीच आठवण राहात नाही. तर करणार काय. लिहू म्हटले तरी हे सोळावे पुस्तक नाही व्हायचे लिहून. आणि लिहिले तर वाचणारा कोण आहे इथे? तसा मी कादंबऱ्या लिहायचो तर त्यामागे वर्ष दोन वर्षे निघून जायची सहज. आता एवढा धीर नाही धरवत. त्यापेक्षा एखादा  स्मरणरंजनात्मक लिहावा लेख म्हणून बसलोय.

आयुष्याच्या अंतिम टप्प्यावर आलोय. सहस्त्रचंद्राच्या उंबरठ्यावर आहे आता. 'लागले नेत्र ते पैलतीरी' असे अगदीच झाले  नाही अजून. जगण्यात अजूनही मौज आहे. माझ्याबरोबरचे कित्येक आहेत त्यांच्या जीवनसाथीने जगाला रामराम केला नि आता आपली पाळी कधी याची वाट बघताहेत. माझ्या कॉलेजचे काही तर आधीच तिथे जाऊन वाट पाहताहेत. माझाही येणारच नंबर आज उद्या. यमराजाकडे कन्फर्म बुकिंग आहे. तारीख ठरणे बाकी आहे फक्त.

आज विचार करतोय.. मी गेल्यावर काय काय म्हणतील माझ्या मागे. माझी पुस्तके तशी जुनी झाली. तर पेपरात येईल का.. अग्रलेख वगैरे नाहीच. पण बातमी तरी.. 'जुन्या जमान्यातले प्रख्यात लेखक श्री. बळवंत कोपरगावकरांचे अल्पशा आजाराने निधन झाले..ते अठ्ठ्यांऐंशी वर्षांचे होते. पूर्वापार.. पूर्ववर्ती.. आणि पुराणातील वांगी अशा पुस्तकांचे लेखक.. त्यांच्या नर्म विनोदी शैलीने ते लोकप्रिय होते. त्यांच्या मागे एक पत्नी दोन मुले आणि तीन नातवंडे आहेत!' येईल अशी बातमी? की जमाना फारच जुना झाला? रेसमध्ये धावणारे घोडे सोडून कोण कशाला काढतोय अशा म्हाताऱ्या घोड्याची आठवण? आता हे लिहितोय. खूप काही वरखाली होतोय मजकूर. कधी हे आठवते कधी ते. हाताने लिहिता येतेय.. बुद्धी तशी साथ देतेय.. कानावर

उपकर्ण आले.. उपनेत्र लागून  जमाना लोटला. पण हातात अजून काठी नाही. पाठीस बाक नाही. स्वत: उठून बाहेर जाऊन येतो.. बॅंकेत पूर्वी केलेली सही अजूनही जुळतेय! तुम्हाला लक्षात नाही येणार आमच्या वयातले हे छोटे छोटे आनंद. अर्थात काही काही जण अजून त्या जवानीच्या आठवणींनी कढ काढत बसतात पण मी पूर्वीपासून असाच. पेला अर्धा का होईना भरला आहे हे पाहणारा नि म्हणणारा. त्यामुळे आहे त्यात ही एक आनंद आहे. छान पिकत जाणाऱ्या फळासारखे माणसाचे हे वय. पिकले की गोडवा यायला हवा. तरी काही म्हातारे उगाच देवाने आणि दैवाने जणू अन्याय केला असे समजून कडवट होतात. काहींना तर म्हातारे म्हणण्याचाही राग येतो. वृद्ध म्हणा.. म्हातारे म्हणा की वयस्कर! काय फरक पडतोय. एका ऐवजी दुसरा शब्द वापरल्याने कुण्या म्हाताऱ्यास दात नवे फुटणारेत की सुरकुत्या नाहीशा होणारेत की डोक्यावर केस उगवणारेत नवीन? नुसता शब्दखेळ आणि काय!

तर मी गेल्यावर कोणाला काय वाटेल? मागे कुठल्यातरी गोष्टीत असाच एक म्हातारा मेल्यासारखा वाटला सगळयांना. सगळी लोकं जमली, तयारी झाली.. या म्हाताऱ्यास वेळ द्यावा लागेल अशी ही  शेवटचा वेळ! नंतर गरज नाही.. अशा त्या लोकांच्या मनातील विचारानंतर आपण अजून खरेतर जिवंतच आहोत हे लक्षात येऊन बिचारा मेल्याहून मेल्यासारखा झाला. थोडक्यात कुणी गेल्यावर पळभर ही जन  'हाय हाय' म्हणायला ही नशीब लागते हे खरे! तर माझे काय होईल? आमच्या तारुण्यात शोले की असा काहीसा सिनेमा होता त्यात डायलॉग होता.. तेरा क्या होगा कालिया! तर माझे काय होणार? समजा मी गेलो उद्या..

हणमंतास काय वाटेल? अजून यौवनात मी सारखे अजून रागरागात मी त्याचे ब्रीद. कमीतकमी माझ्या जाण्याने पाझर फुटेल? कोणास ठाऊक. आहे तसा चांगला तो. खरेतर गुणवंत माझा गुणाचा आणि हणमंत राहिला असाच. राहून राहून वाटते, कधीही विषय निघाला की हणमंताबद्दलच जास्त मनात येत राहते. काळजी काय किंवा विचार काय माझ्या मनात सदैव हणमंताचा. म्हणतात ना आईबापास आपले लंगडे किंवा लुळे पोरच जास्त प्रिय असते. धडधाकटाचे काय कसेही निभावून जाईल. हणमंत आपल्या त्या तुसडेपणातून बाहेर येईल?

तर आहे हे असे आहे.. आणि झाले आधी ते तसे होते. मी काय कुणी मोठा नव्हतो कधी की कुणी चरित्र लिहावे किंवा मीच लिहावे आत्मचरित्र. पण आज फार दिवसांनी लेखणी आली हाती. म्हटले थोडे पांढऱ्यावर करू काळे. कुणी वाचो अथवा न वाचो. नुसते एक आपले लिहिण्याचे समाधान आणि काय! किंवा एक चाळा.. म्हणजे वाळूतल्या रेघा म्हणा ना!

तर घुमून फिरून परत आलो त्या वाळूतल्या रेघांवर! खरेतर ती वाळू आणि तिच्यातल्या रेघा हेच आयुष्य. वाळूतल्या रेघा टिकत नाहीत. वाळू निसटते हातातून. तसे आयुष्य निसटत जाते..

की जगाच्या हातातून आपणच निसटत जातो  वाळूसारखे? तसे तुम्ही आम्ही म्हणजे कोण? काही थोडक्यांसाठी जिवाचे जिवलग.. काहींसाठी जिवाचे मैतर.. कुणासाठी जिवाचा विसावा.. पण जगाच्या नि विश्वाच्या अनंत पसाऱ्यात कोण कुठले य:कश्चित बिंदू आपण. एखाद्या हातातल्या रेतीच्या कणांसारखे निसटणार एक दिवस. मग राहणार नाही आपला मागमूस देखील. बळवंत कोपरगावकर.. कुणी या नावाचा होऊन गेला इसम.. त्याने जीव तोडून केले काय.. पंधरा पुस्तके लिहिली. काही थोड्यांनी वाचली ती. त्याने आपल्या घरासाठी अपार मेहनत घेतली. त्याच्यामागे दोन मुले सोडून गेला.. वगैरे वगैरे.. याशिवाय माझ्यामागे बोलायला आहे काय किंवा खरेतर ठेवलेय काय मी?

तर हा एवढा लेख लिहितोय. कदाचित शेवटचा असेल. उद्या कुणी पाहिलेय? कुणास कशाला हवा माझ्यासारख्याच्या आयुष्यात रस? तर होणार काय.. हा लेख म्हणजे त्यांच्यासाठी एक वाळूतलीच एक रेघ. आज.. नाही .. आता वाचतील.. होता असा ही एक म्हातारा.. लिहायचा म्हणे काहीबाही.. असेल! त्याचे काय..? म्हणत क्षणार्धात विसरतील ही.

आणि ही वाळूतली रेघही मिटून जाईल!

## *आम्ही : एक विचारवंत!*

मोबाईल आल्याने सर्वात जास्त सोय कोणाची झाली असेल तर आमची! मोबाईल आले.. त्यात कॅमेरा आला. सेल्फीवाला कॅमेरा नंतर आला पण त्याआधीही आम्ही स्व छायाचित्रे काढीत होतोच.. कॅमेरा उलटा धरून. कदाचित कुण्या मोबाईल तंत्रज्ञाने ते पाहूनच स्वयं छायाचित्र म्हणजे सेल्फी घेता यावा अशा कॅमेराचा शोध लावला की काय न कळे. तर आमचा मुद्दा मोबाईल नाही वा सेल्फीचाही नाही.. सांगायची गोष्ट इतकीच.. की रोज आम्ही गालावर दोन बोटे ठेवून सेल्फी काढतो.. आणि त्याला देखील एक कारण आहे. असे फोटो काढतात ते आपल्याच तंद्रीत असणारे विचारवंत. आणि आम्ही ते असे फोटो काढून घेतो रोज.. कारण आम्हीही आहोत विचारवंत! म्हणजे असे फोटो काढतो म्हणून आम्ही विचारवंत नाही तर विचारवंत आहोत म्हणून काढतो असे फोटो!

तर प्रश्न येऊ शकतो..

विचारवंत म्हणजे कोण? तसे सोप्पंय उत्तर त्याचे.. साधेच उत्तर आहे.. म्हणजे विचारवंत कोण याबद्दल जास्त विचार करायची गरजच नाही.. आमचा विचार पक्का आहे.. कुणीही विचार करणारा तो विचारवंत. तर विचार करा पक्का आणि कुणीही विचार करणारा दिसला की मारा त्याच्यावर विचारवंत म्हणून शिक्का! तसा आमच्यावर बसला आहे. म्हणून आम्ही विचारवंत! पण हे वाटते नि दिसते तसे आणि तितके सोपे नाही. खरे सांगायचे तर विचारवंत हा प्राणी तसा दुर्मिळच. म्हणजे कुठेही पहावे किंवा रस्त्यात दहा दगड मारल्यास त्यातील एक विचारवंतास लागावा असे काही होत नाही. त्यासाठी साधना आणि तपस्या लागते. म्हणजे दगड मारण्यासाठी नव्हे, तर विचारवंत होण्यासाठी. आधी म्हटले ना की कुणीही विचार

करणारा तो विचारवंत.. ते फक्त एक असेच.. एक न विचार करता केलेले एक विधान म्हणून. पण विचार केला की लक्षात येईल.. हे असे होत नाही.

तर विचारवंत कोण?

कुठल्याही मूलभूत प्रश्नाचा मूलगामी विचार करणारा तो विचारवंत असे म्हणता येईल. आता कुठलाही प्रश्न म्हणजे काय? आणि मुलभूत नि मूलगामी हे म्हणजे काय? कायद्याच्या भाषेत वाक्यातील एकेका शब्दाचा कीस पाडतात.. तसे हे प्रश्न झाले. याबद्दल ही आम्ही त्याच पद्धतीने मूलगामी चिंतन मनन करून त्याबद्दल विस्तृत मूलभूत विवरण केले आहे! ते आमच्या 'विचार विकसिते: खंड १' पृष्ठ १ - २ या छोटेखानी त्रिखंडात्मक बृहद ग्रंथ पुस्तिकेत सापडेलच. त्याची द्विरुक्ती करण्याची गरज नसावी. फक्त आता तो ग्रंथ दुर्मिळ आहे.. इतका की.. मिळालाच तर चर्चगेटच्या फुटपाथावरच मिळतो! तर हे विचारवंत कोणास म्हणावे याबद्दल थोडक्यात विश्लेषणवजा विवेचन.

तर असे विचारवंत होणे कठीण असले तरी आम्ही त्यासाठी मेहनत घेतली आहेच. आमच्या वयातील काही वर्षे यासाठी आम्ही घालवली आहेत. कुणी वाया घालवली म्हटले तर त्यांना आम्ही कसे अडवू शकू? पण कोणी कितीही कुत्सितपणे बोलले तरी घेतला वसा आम्ही विचारवंत टाकत नाही. आणि हे देखील आमचे एक व्यवच्छेदक लक्षण म्हणता यावे. वरील विवेचनावरून आम्ही खरेखुरे विद्वान आणि विचारवंत आहोत यात दुमत नसावे. कारण कित्येक रकाने भरून त्यानंतरही मूळ मुद्दा अनुत्तरित राहात असेल तर आमच्या त्रिमिती विचारांची लांबी, रूंदी आणि खोली सहज लक्षात यावी!

तर आमच्या स्वतःबद्दलच्या या लिखाणात ही मांडणी आम्ही विचारपूर्वकच करीत आहोत. म्हणजे प्रथम विचारवंत या जाती प्रजाती किंवा ज्ञाती यांची ओळख करून देणे गरजेचे आहे असे वाटते आम्हाला. तशी ती किमान झाली असावी. तेव्हा आता दस्तुरखुद्द आमच्याबद्दलच काही सांगण्याकडे वळू. काही प्रमाणात स्वयंस्तुतीचा त्यास वास आला तरी किमान एवढे तरी आम्ही आमच्याबद्दल सांगितले पाहिजेच नाही का?

तर आम्हा विचारवंत मंडळींची काही वैशिष्ट्ये असतात. येथे व्यवच्छेदक वैशिष्ट्ये म्हणता आले असतेही. तो शब्द तसा विषयानुरूप आणि विषयाच्या अनुषंगात हवा तसा जड तथा बोजड वाटतोही. पण आधीच एकदा तो वापरून झाल्याने आम्ही नुसतीच वैशिष्ट्ये असे म्हणतो आहोत. तर आम्हा विचारवंतांची काही वैशिष्ट्ये असतात..

म्हणजे असे..

आम्हा विचारवंतांचे एक तत्व असते.. आम्ही कुणावर विसंबून राहात नाही. स्वयंपूर्णता आमच्यासाठी महत्वाची. म्हणजे कुण्या दुसऱ्याच्या विचाराचेही मिंधेपण नको. आणि आम्हाला असे वाटते आणि पक्के पटले आहे ते असे

.. की तसेही आम्हाला समज- उमजते तितके इतरांना थोडीच काही समजते!

तर आमच्या वैचारिक बैठकीस ही एक तात्विक बैठक आहे. आम्ही स्वतःस स्वयंभू समजावे इतकी. कदाचित नसूही स्वयंभू पण स्वावलंबी तरी आहोतच. म्हणजे सेल्फी आला नि आम्ही स्वयं छायाचित्रे काढू लागलो.. तसे आम्ही आमच्याच विचारांतून आमच्याच विचारांची स्वयं छायाचित्रे काढीत होतोच आधी देखील. आता सेल्फी छायाचित्रे दृश्य असतात आणि तशी आमची वैचारिक छायाचित्रे दृश्य नसत इतकाच काय तो फरक. तर विचारांसाठी आम्ही स्वतः स्वतःवरच अवलंबून असतो. कुणी छद्मीपणे यास स्वतःस शहाणे समजतात हे लोक अशी

टवाळीवजा टिप्पणी करेलही. पण आम्ही एक मानतो.. जया अंगी मोठेपण तया यातना कठीण. त्यामुळे या विधानाचा व्यत्यास म्हणून शाब्दिक हल्ल्याच्या कठीण यातना आमच्या वाटेस आल्या म्हणजे आम्ही मोठे आहोतच याबद्दल आम्ही नि:संदेह असतो. तर सांगायचा मुद्दा हा की आम्ही स्वयंपूर्ण आहोत.

म्हणजे स्वयंपूर्णतेचे उदाहरण म्हणून अजून एक.. कित्येक वर्षांपासून आम्ही एक शिस्त पाळली आहे. म्हणजे काय की आरशात रोज स्वतःचेच तोंड पाहून उठतो आम्ही! म्हणजे दिवस नक्कीच छान जायलाच हवा! आणि इंग्लिशमध्ये टाईम टेस्टेस्ड म्हणतात ना तशी पद्धत आहे ही. आजवर आमचा दिवस चांगला गेला नाही असे नाही झाले त्यामुळे. आपल्या सर्वात प्रिय व्यक्तीस सकाळी उठून सर्वप्रथम पाहाणे याशिवाय दुसरा आनंद तो कोणता! कित्येक वर्षांपासून ही सवय टिकवून ठेवली आहे आम्ही. म्हणतात ना जो दुसऱ्यावरी विसंबला.. तर एकूणच यावरून आमच्या स्वयंभू, स्वावलंबी, स्वयंपूर्ण आणि स्वयंसेवी विद्वान व्यक्तिमत्त्वाची कल्पना यावी! कुणी त्यास स्वयंकेद्री म्हणून टीका का करेनात.. आम्ही त्याबद्दल खंत करत नाही.. कारण तेच.. वर सांगितलेले.. जया अंगी मोठेपण तया..

वैचारिक बाबतीत आम्ही तसे डावे न उजवे. म्हणजे अतिडाव्यांहून उजवेच आणि उजव्यांहूनही उजवे! अर्थात हा उजवेपणा आमच्या राजकीय विचारांबद्दलचा नाही. डावरे किंवा उजवेपणा ही नाही. तर निखळ उजवेपणा म्हणजे आम्ही त्या उजव्या विचारसरणीवाल्यांहून उजवे म्हणजे अधिक चांगले आहोत. आमची वैचारिक बैठक आम्ही विश्वविद्यालयीन शिक्षण घेतानापासून तयार होऊ लागल्याचे आठवते. आम्ही तेव्हापासूनच या जगाच्या कल्याणासाठी विचार करीत आहोत. तरीही विचारांच्या बाबतीत आम्ही फार विचार करत नाही. म्हणजे विचार करण्यात कसले आलेय विचार दारिद्र्य? या दोन विधानांत विसंगती वाटतेय? आहेच ती.

आमच्या चिंतनात असे जाणवले आम्हाला की विसंगती ही सुसंगतीच्या संगतीतच असते.. फक्त ती पाहण्याची नजर असावी लागते. ती एकदा तयार झाली की मग जिकडेतिकडे चोहिकडे विसंगतीच विसंगती त्यातील एका अदृश्य संगतीसह दिसू लागतात.. कुणी ( म्हणजे आम्हीच ) एके ठिकाणी म्हटलेय ना.. विसंगती सदा घडो! तर तशी ती घडली की .. सुजन वाक्य कानी पडो न पडो.. आपण आपली सोय लावून घेता येते. (पहा: विचार विकसिते: खंड २ पृष्ठ ३)

आमच्या विचारांची एक पद्धत आहे. एक सुसंगतता आहे. आम्ही विचार करतो तेव्हा काय करतो? एक तर या जगीचा मानव प्राणी शहाणा करून सोडावा  म्हणून आम्ही कार्यरत असतो. त्यासाठी आम्ही आमच्या मेंदूच्या विशिष्ट भागास  कामास लावतो. त्याबद्दलच्या सुंसंगत विचारांचे सुसूत्रीकरण करून त्यांस संगती लावून माणसाच्या प्रगतीस आम्ही गती देतो. (म्हणजे आम्ही नक्की काय करतो? जिज्ञासूंनी विचार विकसिते खंड ३ पृष्ठ २ पहावे.. मिळण्याचे एकमेव खात्रीलायक ठिकाण.. चर्चगेट येथील फूटपाथ)

आता या विचारवंताच्या उपाधीने आम्ही काय मिळवतो? असे म्हणतात की जगाच्या कल्याणा आमच्या विभूती!  मानवजातीचा उद्धार आणि उन्नयन करण्यासाठी जन्म आमुचा हे खरे. त्यासाठी आजन्म ते आमरण मेंदूस कामास लावणारे आम्ही.. मग आम्हास सरकार दरबारी उच्च स्थान मिळाल्यास नवल ते काय? आमच्यातीलच कित्येक त्यामुळे सरकारमान्य उच्चासनी पोहोचून उच्चरवात उन्नयनात्मक उपायांचे उच्चारण करत सरकारमान्य विचारवंत होताना दिसल्यास त्यातही नवल ते काय? किंबहुना ती आमच्याच विचारांची ताकद मानावी की नाही? तशी ती आहेच. त्या सरकार मान्यतेच्या जोरावर आम्ही प्रतिष्ठित आणि लब्धप्रतिष्ठितांच्या मांडीस मांडी लावून उच्चभ्रू वर्तुळात लीलया संचार करताना दिसत असू तर त्यात आश्चर्य ते काय? असे असले तरी याबाबतीतही काही कुत्सित बोलांचे आम्हास धनी व्हावे लागते. सरकार दरबारी

'जी जी करणारे शाहीर' अशी आमची निर्भत्सना काही करतात तर काही ह्यास हुजुरेगिरी सारखा असांसदीय शब्द वापरतात. वापरोत. आम्ही एकच सांगतो.. हे करूणाकरा.. त्यांना माफ कर  कारण ते काय करत आहेत हे त्यांचे त्यांना ठाऊक नाही. ही आपल्या टीकाकारांवरही कृपा व्हावी अशी आमची प्रार्थना आमची वैचारिक श्रीमंती दाखवत नाहीत का? याहूनही अजून एक मुद्दा आहे जो लोकशाहीशी निगडीत आहे. आपल्या सरकारास जर जनतेने निवडून दिले असेल तर त्या सरकारची इच्छा ही जनेच्छाच ठरत नाही का? तेव्हा सरकारमान्यता हीच जनमान्यता.. तेव्हा आम्ही सरकार दरबारी प्रतिष्ठा पावत असू तर ती जनतेचीच इच्छा समजली जावी की नाही? असो. याबाबतीत आमच्या मनात मात्र यत्किंचितही किंतु नाही हे खरे!

आधीच आम्ही आमची व्यवच्छेदक लक्षणे सांगून झाली आहेत. आता ह्या विवेचनातून बाकी देखील चाणाक्ष वाचकांच्या ध्यानात आली असतीलच. आमच्या शब्दाशब्दातून जीवनाचा अर्थ आम्ही समजावून सांगतो. पण हे जीवनच मुळी इतके अथांग असताना आमच्या विवेचनात्मक लिखाणातून हाती काय लागते हा प्रश्न पडत असल्यास नवल नाही. हेच आमचे ते अजून एक व्यवच्छेदक असे लक्षण. शब्द बापुडे केवळ वारा ही आमची निवेदन पद्धती आणि मानवी जिवांचे जीवन ही तितकेच पोकळ असल्याचा आमच्या कथनाचा भावार्थ ध्यानात घेतलात तर आमच्या महानतेचा साक्षात्कार झाल्यावाचून राहणार नाही.

या गंभीर, विस्तृत, पण स्थलकाल आणि समय यांची कमतरता असल्याने तसे संकोचित.. संकुचित नव्हे.. लक्षात घ्या..  विवेचनातून लक्षात यावेच.. की आम्ही तसे गंभीर स्वभावाचे. म्हणजे आमचे विचारविश्वच तसे गंभीर आदि विषयांचे. जगी सर्वसुखी असा कोणी नाही.. समर्थ गेलेत सांगून. म्हणजे जगात दु:खाचा डोंगर पसरला आहे. असे असताना आम्ही या दु:खाचा परामर्श घेणारे विचार नाही करणार तर अन्य कोण करणार? कारण आम्ही आहोत ते

विचारवंत.  आणि विश्वास नसेल ना बसत तर तो फोटो पहाच आमचा. आहेत ना गालावर दोन बोटे? अहो विचारवंत असल्याखेरीज काय असला फोटो निघेल?

(वरील विवेचनातील विशेष विचक्षण व विद्वज्जनांच्या वदनी विलसणारे विशिष्ट व विलक्षण विजोड वा बोजड शब्द 'विद्वज्जन व विचारवंतांचा शब्दकोश, खंड सत्त्याण्णव' ले. विचारे आणि विचारे.. यातून साभार)

*माझे साहित्यिक आत्मकथन*

माणूस का लिहितो?

सजीव सृष्टीत कोणीही प्राणी असल्या फंदात पडताना दिसत नाही. कीडामुंगी किंवा वाघसिंह वगैरे प्राणी इतरांच्या तर सोडा पण आपल्या स्वतःच्या आयुष्यावर तरी लिहीतात का? कुणी वाचलेय.. 'मी मेरूपर्वत गिळला तेव्हा' हे मुंगीचे आत्मचरित्र.. किंवा 'गुहेतले दिवस' अशा वाघोबांच्या आठवणी? किंवा 'हसती दंत' हे हत्तीचे वा 'पट्टेरी दिवस' असे काही झेब्रेरावांचे पुस्तक? लिहित असते प्राणी तर लिहिली नसती एखादी कविता एखाद्या सिंहीणी ने.. 'वनराजा तुझी आयाळ.. करीते मला घायाळ' असली काही? आणि प्राण्यांना असले काही जमत असते तर पुरातनकालीन डायनोसॉरच्या डायऱ्या वगैरे मिळाल्या नसत्या? नि त्यातून बाकी काही नाही तरी संशोधकांची किती सोय झाली असती!

ते एक असो.

तर हा माणूसच का असा असावा?

आणि लिहितो म्हणजे काय? काहीही लिहितो तो! अगदी बाळबोध गोष्टींपासून ते किराणा सामानाच्या यादीपर्यंत.. किंवा पैशांच्या तगाद्याच्या बिलांपासून दिलाच्या तगाद्याच्या प्रेमपत्रांपर्यंत.. किंवा .. प्रचारकी साहित्यापासून ते बेकायदेशीर कामांबद्दलच्या कायदेशीर नोटिसांपर्यंत! पण मुद्दा साहित्यिक लिखाणाचा आहे! म्हणजे बडबडगीतांपासून ते महाकाव्य.. आणि हलक्याफुलक्या साहित्यापासून ते गहन आणि गूढ अशा अध्यात्मापर्यंत.. लिहिण्याचा! तर एखादा माणूसच असे लिहितच असतो. आणि माणूस असे लिहितच असतो! तो का लिहायला लागला असावा वगैरे तांत्रिक आणि मानसशास्त्रीय विश्लेषणात्मक मुद्दे सोडून देऊ शास्त्रज्ञांसाठी. आणि फक्त लिहिण्याबद्दल लिहू काही! आणि मी लिहिणार आहे ते फक्त माझ्याच लिहिण्याबद्दल..

खरेतर मी, मी कसा घडलो वगैरे वगैरे आधी लिहायला हवे. प्रास्ताविक! म्हणजे बालपणीच्या घटना किंवा तारूण्यातले कडू गोड अपघात यांच्या ठेचा खात किंवा कदाचित

कसल्या कसल्या आठवणी जागवत किंवा अन्यायाविरुद्ध पेटून उठत वगैरे वगैरे.. कसे घडले माझे व्यक्तिमत्व.. असे काही खरे खोटे लिहावयास हवे. त्यात चुकीचे काही नाही खरेतर. माणूस घडत असतो तेव्हा बऱ्यावाईट गोष्टी त्याच्यावर आघात करतच असतात. त्यांचे परिणाम आयुष्यभर तो वागवत असतो. मग त्यातूनच त्याचे व्यक्तिमत्त्व घडते.. आणि लिहायला बसला ना तो की तेच अनुभव लेखणीच्या टोकातून झिरपत झिरपत पाझरतात. हे सारे खरेतर खरेच आहे. तेव्हा लिहिले असतेही मी कदाचित यांबद्दल. पण इतकीही कल्पनाशक्ती ताणणे जरा कठीण आहे माझ्यासाठी. कारण असे विशेष सांगावे असे काही घडलेच नाही आजवर. सरळसोट आयुष्य असणाऱ्याच्या.. माझ्यासारख्याच्या जीवनात काय असे सनसनाटी घडणार आहे? तर हे सारे टाळून मी लिखाणाबद्दलच लिहिले तर त्यात चूक ते काय?

माझी ही साहित्यिक सुरूवात कुठून झाली असावी? पाळण्यात पाय दिसायला मी पाळण्यात फार झोपलेलाच नाही असे आई सांगायची. म्हणजे झाले काय की मी लवकरच डायरेक्ट चालू लागलो.. त्यामुळे पाळण्यात उभे राहाण्याची कसरत मी लवकरच शिकलो. नि तो माझ्यासकट पाळणाच पटापटा पालथा पडू लागला! मग शिस्तीत पुढच्या भावंडाची वाट पाहात त्याला माळयावर धाडण्यात आले. मुद्दा हा की माझे पाळण्यात पाय तसे फार दिसले नाहीत. तरी लिहिण्याची हौस भारी! दांडगी म्हणा! त्यावेळी, म्हणजे वयाच्या अकराव्या वर्षी, चक्क संत ज्ञानेश्वरांच्या आयुष्यावर एक कादंबरी लिहायला घेतलेली आठवते मला. ज्ञानेश्वर लहान वयात असले ग्रंथ लिहितात नि मी साधे त्यांचे चरित्र लिहू नये? तर त्या कादंबरीच्या दोन ओळया लिहून झाल्या.. पुढे काय घडवावे ते न कळून ते बाड(!) बाजूला ठेवून दिलेले मी! कादंबरी म्हणे! पण तरीही लिहित रहायची हौस फार मला. शाळेत नि कॉलेजात भित्तीपत्रिकात लिहिण्यास आसुसलेला मी आठवतो अजून. कुणी वाचो न वाचो.. मागे गुरखा लोक 'जागते रहो' अशी बांग गाढ झोपी गेलेल्या नि स्वप्ने पाहणाऱ्या आम जनतेस भर मध्यरात्री सुनावत असत. त्या धर्तीवर 'लिखते रहो..' ही बांग मी माझी मला देत असे. मग लिहित राहणे गरजेचे..

तर मला आठवतेय ती माझी पहिली गोष्ट.. लिहिलेली ही आणि कागदावर छपाई झालेली ही. या दोघांच्या मध्ये.. म्हणजे ती लिहिणे नि छापून येणे यांत.. कित्येक वर्षे गेली खरी.

पण पहिलेपणाचे लाडकोड वेगळेच. म्हणजे पहिलटकरीण कसे आपले डोहाळे पुरवून घेते तसे लाड मी स्वतःचे करून घेतले. स्वतःच स्वतःचे लाड करण्यावाचून दुसरा पर्यायही काय होता? माझ्या लेखनकामाठीचे अन्य कुणास काय कौतुक? तर लिहिली मी माझी पहिली गोष्ट. तिच्यात नायक आणि नायिकांच्या संघर्षोत्तर प्रेमाची मनोहारी कथा रंगवली मी. संघर्षोत्तर म्हणजे दोघे कडाडून भांडतात.. नि भांडत राहतात.. नि एक दिवस तीनशे साठ अंशात घूमजाव करून लग्न करतात.. पुढचा भाग लिहिला नाही मी पण त्यानंतरही ते कडाडून भांडणे सुरूच ठेवतात हे लिहिले असते तर ती वास्तविक आणि अति वास्तववादी वाटली असती कथा! तर लिहून हातावेगळी झाली ती गोष्ट. माझी पात्रे म्हणजे मला माझे मानस सगेसोयरे वाटू लागले. माझ्या लेखणीच्या एका फटकाऱ्याने काल जगात नसलेली पात्रे आज चालू बोलू लागली. मी कौतुकाने त्या पात्रांना पाहू लागलो. आजवर मी असे काही केले नव्हते. फक्त इतर लेखकांनी जन्मास घातलेल्या पात्रांबद्दल वाचत आलो होतो.. आज मला माझ्या हक्काची पात्रे मिळाली होती. त्यांना मी हवे तसे बोलाचालायला लावू शकत होतो. मीच त्यांचा सूत्रधार.. मला हवे तर ती पात्रे गोडीगुलाबीने राहतील.. नाहीतर वचावचा भांडतील.. किंवा झिंज्या उपटतील एकमेकांच्या! शांती की अशांती! प्रेम वा द्वेष.. लाड कौतुक वा सासुरवास.. सारे माझ्याच इच्छेवर अवलंबून. म्हणजे मी कर्ता करविता आणि घडविता देखील. माझ्या पहिल्यावहिल्या गोष्टीची झिंग खूप दिवस राहिलेली आठवते. नंतर त्या धुंदीत तसे मी लिहायचोही खूप. मनी आले ते कागदी उतरे असे काही होत असे. म्हणजे अजूनही होते. काही गोष्टी लिहिता लिहिता सुचतात तर काही सुचल्यावर लिहिल्या जातात. मग कागदावर कागद .. किंवा तावावर ताव अगदी ताव मारत भरतात. नि त्या नवनवीन पात्रांकडे मी कौतुकाने पाहात राहातो! लिहायला लागलो त्या कथा मी. लघुकथा.. थोड्या मोठ्या पण व्हायच्च्या काही. काही दीर्घकथा. कादंबऱ्या लिहू म्हटले तर तेवढा दम धरवायचा नाही. सगळ्यात छान म्हणजे कविता.. शब्द शब्द जुळवून ठेवले की बकुळीच्या फुलापरी कविता उमलते! लिहायला वेळ ही कमी! तरी देखील कथांमध्ये जीव रमतो जास्त माझा. अशा नाही नाही म्हणता खूप साऱ्या जमल्या कथा. जमणे हे दोन्ही अर्थाने.. म्हणजे मी जुळवून आणल्या काही त्याअर्थी जमल्या त्या गोष्टी नि माझ्या कडे गोळा झालेल्या कित्येक या अर्थानेही! आता तर काय काही पुस्तकेही झालीत प्रकाशित. प्रकाशित झाली म्हणून मी प्रथितयश झालो असे नाही झाले काही. पण पहिल्या पुस्तकावेळीही मीच माझे लाडकौतुक करून घेतले!

आता ते दिवस आठवून गंमत वाटते.

म्हणजे लिहायला तर लागलो पण यक्ष प्रश्न.. या साऱ्याचे करावे तर काय? लिहायला लागलो पण कुणी वाचक मिळेल का? पात्रांच्या शोधात नाटककार फिरावा तसा मी वाचकांच्या शोधात! घरी माझ्या लेखनकामाठीचे कौतुक नाही. उगाच कागदांची नासाडी.. पेनं काही फुकट मिळत नाहीत.. नि पोष्टाच्या खर्चाबद्दल टोमणे या वातावरणात माझे लेखन अगदी तावून सुलाखून होत राहिले.. तरी पण माझे लिहिलेले वाचायला वाचक कोण? नि माझे नाव कधी येईल छापून.. खरेतर छापणार कोण? नाही म्हणायला मी काही ना काही साहित्य पाठवत असे मासिकांना. मग पुढच्या काही अंकांत ते छापून यावे नि चुकून माझ्या लक्षात येऊ नये.. असले काही न होण्यासाठी मी जवळील मोफत लायबऱ्या पालथ्या घालीत असे. दिवाळी अंक ही माझ्यासारख्या लेखकाला पर्वणीे. दहा अंकांना दहा गोष्टी पाठवून प्रतीक्षा करणे हे मला अंगवळणी पडून गेले. एखाद चुकार संपादक कधी फोन करून विचारीत असे.. कुठे कुठे लिहिलेय आजवर? 'लिहायला काय मी सदा तयार आहे हो.. कुठेही.. कुणी छापलेच नाही आजवर!' या माझ्या उत्तराने त्या संपादकाचा हिरमोड होत असावा कदाचित.. कारण तोही ती गोष्ट छापणे टाळत असे! अशा साऱ्या वातावरणात

आपले काही छापून येणे म्हणजे भव्य दिव्य वाटे मला. गोष्ट छापून येणे एक दिव्य.. त्याखाली लेखक म्हणून स्वतःचे नाव येणे हे त्याहूनही दिव्य!

तर माझी अशी गोष्ट एकदा छापून आली. म्हणजे माझा स्ट्राईकरेट तसा मामुलीच होता. स्ट्राईकरेट म्हणजे मी पाठवायचो नि छापून आल्या अशा गोष्टींचे प्रमाण! पण चुकून संपादकाची डुलकी लागली की काय.. माझी गोष्ट एका मासिकात छापून आली. माझा माझ्याच डोळ्यांवर विश्वास बसेना. ते मासिक घेऊन मी किती एक वेळ दिवास्वप्ने पाहात बसलो. आज एक आली.. उद्या दुसरी.. हळूहळू दर महिन्यात.. मग मी प्रथितयश म्हणवू लागेन. संपादकाचा तगादा लागेल.. 'कांचनकुमार.. तुमचा लेख पाहिजेच बुवा.. खास लिहा दिवाळी अंकासाठी!' असे प्रेमळ आग्रह माझ्या ध्यानी मनी स्वप्नी दिसू लागले मला. कोणास ठाऊक.. कुठे साप्ताहिक सदर सुरूही होईल.. दर रविवार पुरवणीत.. मी लिहीन.. कांकु.. म्हणजे कांचनकुमार.. सदराचे नाव ही ठरवून ठेवलेले मी.. 'कांकुदृष्टी!' एक दोन सदरांचा मजकूर मी ठरवून लिहून तयार ठेवलेला. न जाणो कुणी अचानक मागितले तर? म्हटले सदर सदरात सादर करायला सदर सदा तयार असावे! अर्थात पुढे असे काही नाही झाले.. नुसतेच मुंगेरीलाल के हसीन सपने! खरेतर आजवरही

नाही झाले असे काही. आजवर म्हणजे माझे इतके सारे साहित्य प्रसिद्ध होऊनही! तर कांकुदृष्टी तशीच डोळे मिटून पडून राहिली.. निद्रिस्त! हे एक विषयांतर झाले.. तर त्या छापील गोष्टीचा परिणाम टिकला तो तब्बल महिनाभर. हवेत तरंगत मी तेवढे दिवस चाललो. आणि धुंदीतच पुढच्या महिन्यासाठी मी ऐटीत एक गोष्ट पाठवून दिलेली. अशी सुंदर गोष्ट छापणार नाही का कोणी..? अशा मनोरथांचा रथ परत जमिनीवर धाडकन आपटला. माझा तो युधिष्ठिराचा रथ सत्य परिस्थिती जाणून जमिनीस टेकून चालू लागला! खरे झाले ते इतकेच.. कीआधीही जे घडत होते.. आणि आताही तेच सुरू होते.. साभार परत! खरेतर साभार परत हा शब्दसमूह कुठून आला असावा? म्हणण्याची पद्धत असावी नुसती. कारण माझ्या दीर्घ अनुभवात पाठवलेल्या साहित्याची ना पोच कुणी दिली ना ते साभार किंवा विना आभार ही परत पाठवले! खरेतर एकदोन दिवाळी अंकांनी साहित्य छापूनही ते छापल्याचे कधी कळवले नाही. म्हणजे कदाचित मानधन वाचवण्यासाठी असेल. ते छापलेले कुठून तरी कळले की मी ते मासिक स्वखर्चाने घेत असे! म्हणजे मान नाही.. धन नाहीच.. वर परत तो मासिक विकत घेण्याचा भुर्दंड!

तर मला लिहिण्याची हौस भारी. ती पुरवता पुरवता खूप काही झाले लिहून. बरे म्हणा, वाईट म्हणा. ते जमलेले बाड सांभाळावे कसे? एवढ्या साऱ्या लिखाणाचे कसे होईल उद्यापन? वय वाढलेल्या उपवर कन्या वा मुलाच्या लग्नाची चिंता वाटावी तशी वाटे मला. हिला सांगायची सोय नाही.. उगाच टोमण्यांचा मार.. नि शब्दांचा भार! त्यापेक्षा आपल्या त्या गोष्टीरूप अपत्यांची काळजी करत कुठे उजवता येतात का ते पहावे.. एकट्याने.. हे बरे! थोडक्यात काय लिहिलेले कुणीच छापेना! तेव्हा मी लिहिणे बदलण्याऐवजी नावच बदलावे असे ठरवले! मूळ नावापेक्षा टोपणनाव भारी! आणि मी कांचनकुमार नाव धारण केले! कुणी काही म्हणो.. नावात काय आहे.. पण या नावानेच माझे लिखाण छापून यायला लागले. तर माझ्या या लिखाण प्रवासात त्याचे महत्त्व फार! म्हणून कांचनकुमार नावाबद्दल सांगायलाच हवे. कांचन म्हणजे कोणास माझ्या आईचे नाव वाटेल. आणि तसे वाटण्यात चुकीचे काही नाही. पण आईचे नाव कांचन नाही.. ही टोपणनावांची पद्धतच अशी पडलीय.. कुणी अग्रज होतो.. कुणी अनुज.. कुणी सुत तर कुणी कुमार! पण मी हे नाव आईवरून नाही घेतले. माझ्या आईचे नाव कमलिनी! मग कांचनकुमार कुठून आला? मी नाव घेताना पाहिलेल्या स्वप्नातून. मी लिहितोय.. माझे समग्र साहित्य.. त्यावर समीक्षा.. साहित्यातून दिसणारा मी.. कुणी त्यावर पी.एचडी. करतोय.. असले काहीबाही सुवर्णाक्षरात लिहिले जावे असे.. असली स्वप्ने पाहता पाहताच मी हे नाव घेतले..

कांचन कुमार! सुवर्णकुमार किंवा कनकनंदन घेणार होतो.. गणहिरण्य नाव घ्यावे असेही एकदा वाटून गेले. पण उगाच त्या भारदस्त नावास कोणी कश्यपु जोडून माझाच कोथळा काढला तर! म्हणून माझ्या मनास आवडले ते कांचनकुमार! थोडक्यात कांकु! या नावात काय नाही? काहीही कांकू न करता मी हे नाव घेतले! आणि तेच शुभशकुनी ठरले. कारण माझी पहिली कथा आली ती याच नावाने आणि हेच नाव घेतल्यावर. नाहीतर आधी गणाजी आबाजी हिंदोळेकर या नावात काही ग्लॅमर नव्हते. मी खरे तर कुणा सीनियर कवीचा आदर्श ठेऊन कांचनकुमारी असा नावापुरता लिंगबदल करणार होतो. केला ही असता. ती पहिली गोष्ट छापली गेली नसती तर कनकनंदिनी हे नाव मी ठरवून ठेवलेले स्वबारश्यासाठी! पण तशी वेळ नाही आली. एक गोष्ट त्या नावे छापून आली नि माझी भीड चेपली. मी तेच नाव कायम करत लिहीत राहिलो. नाव कांकु झाले तरी मी लिहीण्यासाठी कांकू नव्हतो करत.. पण अजूनही छापण्यासाठी कांकू करणारे संपादक होतेच! त्यांच्या अडथळ्यांतून पार होऊन काहीबाही नियमित छापून येण्यास काही वर्षे लागली! मग त्या छापील गोष्टींची बाडं जमली! आधी न छापलेल्या गोष्टींचे काय करावे कळत नव्हते.. आता छापीलांची काय लावावी विल्हेवाट ते कळेना. ऐवज पुरेसा जमला तर पदरास खार लावून पुस्तक छापले. पहिल्या पुस्तकावेळी कृतकृत्य झालो. आधी म्हटले तसे स्वकौतुकाची थाप स्व पाठीवर स्वहस्ते मारून घेतली! पुढे अजून काही छापली गेली. पुस्तकांचे ढीग घरात साठू लागले. पुढे तर या पुस्तकाच्या छापून येण्याचीही सवय झाली. आणि त्या पुस्तकांच्या जागा अडवून घरात साठवण्याची.. नि त्यामुळे हिची बोलणी खाण्याचीही!

हे इतके मी लिहिले आणि लिहितोय म्हणून तुम्हाला वाटेल माझी लिहावयाची काही खास पद्धत वगैरे असेल. तसे वाटणे चूक नाहीच. कारण काय आहे ना की लोक आम्हा कलावंतांना वेगळ्या नजरेतून पाहतात.. कलावंत म्हटले की कसे भारी वाटते.. म्हणजे आमची काही खास नजर.. काही खास पध्दत असेल.. मग आम्ही विचार नि मंथन करीत असणार.. वगैरे वगैरे. गटणे विचारून गेला ना पुलंना.. प्रतिभासाधनेत व्यत्यय तर नाही ना आणला? तर हे असे वाटत असते लोकांना! पण मी खरे तेच सांगून टाकतो.. माझी लिहायची पद्धत खास आहे. म्हणजे काही खास नसणे हेच माझ्यासाठी खास आहे! प्रतिभासाधनाची कशी काहींची ठराविक वेळ असते तशी माझी नाही. एक तर घरी माझ्या या लिहिण्यात नसत्या वेळ वाया घालवण्याबद्दल ऐकून घ्या.. वर आपल्या प्रतिभेला मालिश नि पॉलिश करायला अजून वेळ कुठून आणणार मी? त्याबद्दल तर अजूनच टीकास्त्रांचे ब्रह्मास्त्र झेलावे लागेल मला. त्यामुळे मिळेल त्या वेळेत नि कधी वेळात वेळ

काढून लिहित असतो मी. लिखाणाचे काम करायला काही मोठे लेखक म्हणे कुठे कुठे दूरगावी जातात.. कुणी स्फूर्ती येण्यासाठी काही न काही उपाय करतात.. हे असले काही जमले नाही मला कधी. अर्थात जमण्यासाठी कोणी जमू दिले तर ना.. आणि खरे तर ते जमलेच समजा एखाद वेळेस.. पण परवडायला पाहिजे ना? तर मी वेळ मिळेल तेव्हा नि तिथे लिहित आलो आजवर. आणि यापुढे ही राहिन!

काही जण याला साहित्यसेवा म्हणतात.. मातृभाषेचे ऋण फेडणे वगैरे भारी भाषा वापरतात. मी मात्र लिहून आपली साधीसुधी लिहिण्याची खाज पूर्ण करतो! खाज म्हटले म्हणजे कसे खास शुद्ध देशी वाटते. उगाच 'लिहिण्याची ऊर्मी त्यांना स्वस्थ बसू देईना.. म्हणून आपल्या लिखाणातून ते व्यक्त होत असत.. त्यांच्या लेखणीस ही भावभीनी किनार त्यांच्या लिहावयाच्या आंतरिक प्रबळ इच्छेतून त्यांच्या शब्दाशब्दात प्रकट होताना दिसे.. मनात आले ते लिहिल्यावाचून जेव्हा जिवास चैन पडत नाही तेव्हा ते लेखणी हाती घेत आपल्या आंतरिक ऊर्मींच्या उफाळयांना मोकळी वाट करून देत!' असले काही मृत्युलेखात शोभेलसे लिहिण्यापेक्षा खरे कारण हेच.. लिहिण्याची खाज! तर ही खाज कित्येक वर्षे टिकून आहे.. आणि पुढेही राहिल अशी लक्षणे दिसतात! तसा मी लिहितो हलकेफुलके. गंभीर गोष्टी टाळत. तेव्हा लिहिण्याच्या खाजेतून खाजवून खरूज न निघो एवढे पथ्य पाळतो मी!

तुम्हाला सांगतो, लिहीत राहण्याचीही एक नशा असते. म्हणजे खूप दिवसांत काही लिहून झाले नाही तर विथड्रॉवल यायला लागते. काय कुठे कसे लिहावे ते मनात सदा तयार हवे. कसली ना कसली कथा घडावयासच हवी. नवनवीन कथा लिहायचो तेव्हा त्यातल्या पात्रांबद्दल गंमत वाटे.. त्यांचा जन्मदाता म्हणून. ते आता जरा कमी झाले. तरी नव्या सिच्युएशन्स घडवण्याची हौस पुरी होत नाही नि लिहिणे काही बंद होत नाही. मध्ये महिना पंधरा दिवस झाले की नव्या लिखाणाची आठवण येऊ लागते.. जमले तर ठीक.. नाहीतर उगाच सारे रम्य 'गमते उदास' व्हायला लागते.

तर मी लिहितोय. गेली कित्येक वर्षे. काळयावर पांढरे करायला शिकलो शाळेत तेव्हापासून हे पांढऱ्यावरही काळे करतोय. कुठेतरी आपल्या साहित्यिक अस्तित्वाची नोंद व्हावी

आणि रहावी म्हणून हे साहित्यिक आत्मकथन. उगाच मी कोणी मोठा साहित्यिक असल्याचा दावा नाही माझा.. पण पुलं सारखे पुलं सांगून गेले.. बडोदकरबुवा, निजामपूरकरबुवा असतील मोठे कीर्तनकार पण म्हणून कुण्या कडमडेकरानं कीर्तन करूच नये की काय! तर मोठमोठे होऊन गेले कवी अन लेखक.. कालिदासापासून कुसुमाग्रजांपर्यंत.. म्हणून या कांचनकुमाराने लिहूच नये की काय! आणि मी नाही आहे कुठल्याही साहित्य संमेलनाच्या निवडणुकीत मतदान करावे इतकाही साहित्यिक अजून. तेव्हा खरेच नसलो मी कुणी मोठा तरीही मी आपले साहित्यिक आत्मकथन लिहूच नये की काय?

तेव्हा लिहावे.. किंवा लिहावेच! आणि आपल्या नावाची अशीही नोंद करून ठेवावी हे बरे! आणि आपली आपणच.. कारण अन्य कोणी करण्याची शक्यता नाहीच!

## *आम्ही भ्र.तंत्रस्वामी!*

या!

वत्सांनो या!

हा तंत्रस्वामी तुम्हाला आशीर्वच देत आहे! यत्र तत्र सर्वत्र असणारे तंत्रज्ञान तुमचा उद्धार करो. तुमच्या आयुष्याचा एक कोपरा पूर्वी तंत्रज्ञान व्यापत असे. पण आता कानाकोपरा व्यापून दशांगुळेवर उरलेल्या तंत्रज्ञानाची कृपादृष्टी तुमच्या आयुष्यावर सदैव राहो. त्या कृपेने तुमचे हे साधेसरळ आणि सरळसोट आयुष्य पुलकित होवो. त्यात सर्वत्र त्या ज्ञानाचा प्रकाश पसरो आणि तुम्ही त्या ज्ञानाने समृद्धी पावोत.. ह्या भ्र.तंत्रस्वामीचे हे आशीर्वादाचे बोल सदैव खरे होतात.. तसे आता ही होतील.. तेव्हा तुम्हा प्रति सदा तंत्रज्ञान - विद्येतून कल्याण असो. कुणी म्हणेल.. इगतपुरी असो किंवा कसारा असो. असल्या फालतू विनोदांनीही आम्ही हसतो आजकाल. अगदी हसता हसता लोटपोट किंवा तांत्रिक भाषेत जमिनीवर लोळण घेऊन हसतो.. त्याला हल्ली आमच्या लिंगोत आम्ही एलओएल तर कधी आरओएफएल म्हणतो.. म्हणतो. ही सारी आम्हाला त्या तंत्रज्ञानाचीच देणगी. आम्ही याच भाषेत कम्युनिकेट करतो कारण आम्हाला त्याची सवय झाली आहे. आणि ज्या तंत्रज्ञानाचे गोडवे आम्ही गातो ना त्याच तंत्रज्ञानाने आम्हाला हे शिकवले आहे.

म्हणजे पहा..

रोज सकाळी आम्ही उठतो तेव्हा आमच्या हातात प्रथम आमचा भ्रमणध्वनी येतो. कराग्रे हल्ली लक्ष्मी ऐवजी त्या भ्रमणध्वनीचा वास असतो. त्याच भ्रमणध्वनीच्या दर्शनाने आमचा दिन आणि दिनक्रम सुरू होतो. सकाळसकाळी उठून चिमण्या आणि इतर पक्ष्यांच्या आवाजाचा गजर ऐकला ना की कसे निसर्गसान्निध्यात आल्यासारखे वाटते. आम्ही त्यामुळे हटकून तो गजर लावतोच!

विचार करा..

सकाळचे साडेपाच सहा वाजलेत. दुधाची गाडी येते, पेपरवाले येतात. आमच्या घराबाहेरच्या रात्रभर झोपलेल्या रस्त्यास लवकर जाग येते. थोडीफार गजबज ऐकू येते. शाळेतल्या पोरांना लवकर उठण्याचे(च!) प्रशिक्षण देणाऱ्या शाळांत जाण्यासाठी लहानगी पोरे पहाटे पहाटे धपाटे खात नि डोळे चोळत उठतात. त्यांच्या शाळेच्या बशांचे कर्णे सकाळसकाळी वाजू लागतात. बाकी गाड्यांचा आवाज येऊ लागतो. वाहनांचे कर्कश कर्णेही वाजू लागतात. अजून कितीतरी सांगता येईल. तुम्हाला वाटेल आम्ही याबद्दल टीकाबिका करतोय की काय! पण नाही. या साऱ्याबद्दल आम्ही काहीच म्हणत नाही. कारण ही सारी लक्षणे प्रगतीचीच. विकास विकास म्हणतात ना तो हाच! तर विकास म्हणता येईल अशीच लक्षणे आहेत ही आजची. आणि नाही म्हटले यांस विकास तर प्रतिगामी म्हणून आमची संभावना होईल! तेव्हा यास दृश्य विकास म्हणायलाच हवे. असो तो एक विकास. पण तरीही आमच्यासारख्याने निसर्ग सान्निध्यापासून दूरच रहावे? का? नाही! आमच्याही मनात येते.. पक्ष्यांनी करावे गोड कूजन. मग त्यांचा सुमधुर आणि मंजूळ आवाजांचे आलापध्वनी ऐकून उघडावे आम्ही नेत्रकमलाचे नेत्रपटल आणि पहावी निसर्गाची कमाल! आणि अजूनही काहीबाही! पण या शहरी भागात हे होणे नाही. तर येथे तंत्रज्ञान आमच्या मदतीस धावून येते. ज्या भ्रमणध्वनीच्या उंच बुरूजांमुळे मूळच्या चिमण्या दूर उडून जातात म्हणे, त्यांचाच आवाज त्याच भ्रमणध्वनीमध्ये ऐकण्यात काव्यगत न्याय आहे! आणि आम्हाला पटलेय हे.. प्रगती प्रगती म्हणतात ती हीच! मग ते पक्ष्यांचे कूजन ऐकून आम्ही उठतो.. दिवसाची सुरुवात कशी आल्हाददायक होते! आहे की नाही तंत्रज्ञानाची कमाल?

तर असा हा सुंदर खगगणांच्या मधुर आवाजाने सुरू झालेला दिन आमच्या त्याच भ्रमणध्वनीवरील त्याहूनही सुंदर अशा विचार परिलुप्त अशा संदेशांनी अधिकच सुंदर होतो. आता तो परिलुप्त वगैरे शब्द कदाचित चुकीचा असेलही किंवा असेलही बरोबर.. पण व्हॉट्सॲप नामक विद्यापीठातून शिकलेला आहोत आम्ही तो. त्यामुळे तो आजच्या भाषेत मान्यता पावू शकतो. आम्ही आमचे सारे ज्ञान.. मगतेधार्मिक..राजकीय.. वैद्यकीय.. शास्त्रीय.. अशास्त्रीय.. सामाजिक.. ऐतिहासिक.. भौगोलिक.. भौतिक.. अभौतिक.. आध्यात्मिक वगैरे वगैरे.. सर्व काही या विद्यापीठातूनच मिळवतो हल्ली. त्यामुळे होते काय की जुन्यापुराण्या जीर्णशीर्ण पोथ्यांसारखे ग्रंथ वाचून हल्ली कोणास वाचस्पती होण्याची गरज उरलेली नाही. म्हणजे आता सकाळ पासून ते दुसऱ्या दिवशीच्या भल्या पहाटेपर्यंत जागून सदा भ्रमणध्वनीवर संदेश वाचून

सामान्यतिसामान्य ही होऊ शकतो विद्वान आणि वाचस्पती. उगाच लांब तोंड करून ग्रंथालयात जाड भिंगाच्या चष्म्यातून जाडीजुडी पुस्तके वाचणारे नि त्याच्या नोंदी काढत बसणारे तेच व्यासंगी म्हणून मान्यता का पावावेत? दिवसाकाठी पाचशे हजाराहून जास्त संदेश वाचून त्यातून आपल्या चक्षूंरूपी सोंडेतून ज्ञानमधुचे तुषार शोषून घेणाऱ्यांना त्याच पातळीवरील व्यासंगी का म्हणू नये? थोडक्यात या तंत्रज्ञानाने आम्हास.. म्हणजे आम्हा सामान्यांसही विद्वज्जनांच्या बरोबरीने खांद्यास खांदे लावून उभे राहण्याची किंवा मांडीस मांडी लावून बसावयाची संधी दिली आहे. याचा पुरेपूर उपयोग न करावा इतके काही आम्ही करंटे नाही! मग यातून आम्ही ज्ञानाची देवाणघेवाण करतो. व्हॉट्सॲप हे एक उदाहरणादाखल. त्या व्यतिरिक्त अजूनही काही याच तंत्रज्ञानाने पुरवलेली व्यासपीठे आहेत. अजून उदाहरणच द्यावे तर कुण्या इंग्रजी नावाचे फेसबुक.. म्हणजे चक्क चेहरा पुस्तक! यावर आम्ही  एखादे पुस्तक खोलून दाखवल्यासारखे आमचे मन उघडून दाखवत आपल्या भावना उघडपणे उघड  करीत असतो. त्या इंग्रजी भाषेत काही तरी म्हणतात ना.. माय लाईफ इज ॲन ओपन बुक.. तसे. आमच्या परखडपणास येथे चेव येतो. म्हणजे साहेबाच्या इंग्रजीत कॉल स्पेड अ स्पेड असे काही म्हणतात तसे आम्ही इथे कुदळीस कुदळच म्हणतो. येथे ही आम्हाला आमच्या आदिमसंस्कृतीचे उमाळे येतात. आमच्या पूर्वजांच्या कर्तृत्वाने आमचा ऊर भरून येतो.. आदिकालीन प्रचंड सांस्कृतिक आणि शास्त्रीय वारसा पाहून आमचे डोळे भरून येतात.. आणि हे सर्व कानाडोळा करत आमच्या सद्यस्थितीकडे सर्वांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करणाऱ्या करंट्यांचा  आम्ही आमच्या खास भाषेत उद्धार करतो. आम्हाला सांगा.. तंत्रज्ञान नसते तर हे सारे आम्ही कसे साधले असते? आता आमच्या पूर्वजकालीन हे सारे अस्तित्वात होतेच.. म्हणजे तसे दाखले हवे तितके उपलब्ध आहेत व्हॉटसॲप विद्यापीठात! अगदी या भ्रमणध्वनी तंत्रज्ञानासकट सारे काही आणि आता तेच.. आमच्या देदीप्यमान ऐतिहासिक पूर्वजांचे तंत्रज्ञान कुणी पाश्चिमात्य आम्हास त्यांच्याकडील म्हणून विकताहेत.. आम्ही घेतो ते.. पण त्यांचा निषेध करीत! तोही त्यांचेच तंत्रज्ञान वापरत! सांगायचा मुद्दा.. तंत्रज्ञान असे आमच्या रोमरोमात भिनले आहे. तसे या भ्रमणध्वनीने आमचे सामाजिक अस्तित्व भरून आणि भारून टाकलेले आहे. आम्ही त्याच्यावर अवलंबून असे राहतो की त्याखेरीज आम्हाला ना झोप लागते.. ना अन्न गोड लागते.. अशा तंत्रज्ञानाशिवाय आम्ही आमचे आयुष्य कल्पू शकत नसताना अजूनही तंत्रस्वामी म्हणून उदाहरण का द्यावे आम्ही?

तरीही दुसरे उदाहरण घ्यायचेच तर..

आम्हाला पर्यटनाची हौस भारी. केल्याने देशाटन हा उपदेश आम्ही अत्यंत गंभीरतेने घेतो. त्यातूनच आम्ही काही एक फार चातुर्य जमा केले आहे. त्या चातुर्याचा उपयोग आम्ही जेथे जातो तेथे केल्यावाचून राहात नाही. म्हणजे काय पहा. आमचे तर्कशास्त्र एका तार्किक विचारातून आम्ही विकसित केले आहे. तर त्याच तर्कशास्त्राच्या निकषावर घासूनपुसून आम्ही या निर्णयावर येऊन पोहोचलो आहोत.. आम्ही कुणी जज्जबिज्जसाहेब असतो तर ये अदालत इस नतीजेपर आ पहुंची है असे काही म्हणण्याचा मोह सोडवला नसता आम्हाला. पण तसे आम्ही नाही. तर आम्ही या नतीजेवर येऊन पोहोचलो आहोत.. आम्ही पर्यटन करीत असतोच.. तर विविध प्रेक्षणीय स्थळे ही आमच्या आवडीची. आम्ही तिथे जातो. आता ही ठिकाणे काय कधीही पाहाता येतात. तिकडे जाऊन तर लोक पाहतातच. आम्हीही जातो. कुणी कवीमनाचा बालक आपल्या शालेय पातळीवरील बाळबोध निबंधात लिहूनही जातो.. तिकडील सृष्टीसौंदर्य आणि आल्हाददायक नि नि:शुद्ध हवा आपल्या नेत्रांत आणि आठवणींच्या कुपीत आम्ही भरून आणि भारून परतलो.. तर असे प्रेक्षणीय स्थळांचे वर्णन कोठे कोठे वाचावयास मिळू शकते. पण आम्ही शब्दातीत वर्णनावर विश्वास ठेवतो. म्हणजे काय..?

जेथे जावे तेथे तू माझा सांगाती म्हणून आम्ही आमचा भ्रमणध्वनी आणि पर्यायाने त्यातील छायाचित्र टिपक घेऊन जात असतो. काही प्रेक्षणीय दिसले की आम्ही आमच्या त्या छायाचित्र टिपकाच्या कुपीत ते बंदिस्त केल्यावाचून राहात नाही. आधी ती छायाचित्रे.. मग जमले तर त्या स्थळाचे प्रत्यक्ष दर्शन! कुणास याच्याबद्दल काही शंका असतील तर.. छायाचित्रांचे फायदे असे..

सर्व प्रथम तर आम्ही आमच्या आभासी मित्रपरिवारास दाखवून देतो.. आज आमच्या स्वारीने अमुक ठिकाणावर स्वारी केली..

मग त्यावर वॉव.. लुकिंग ग्रेट.. क्यूट.. हॅवे नाईस्टाईम.. असली शेरेबाजी नि अंगठे नि टाळया मिळवून आम्ही कृतकृत्य होतो.. याचसाठी केला होता अट्टाहास असे वाटून! जो फोटोतून आपल्या आभासी मित्रांपर्यंत पोहोचत नाही तो कसला आलाय मित्र! आणि या कमेंट्स आम्हाला कुठूनकुठून मिळतात! अगदी जगभरातील आभासी मित्रांकडून! काहींना तर आम्ही कधी पाहिलेही नाही त्यांनाही आमचे कौतुक वाटत असते सदैव अशावेळी! अर्थात आम्ही देखील आमच्या मित्रगणांच्या छायाचित्रांना असेच लाईक करत असतो. एका हाती द्यावे.. तरच आपल्याला

मिळेल.. आपण लाईक्स दिल्याशिवाय आपल्यालाही थोडीच मिळणार आहेत कमेंट्स! आम्हाला आठवते, आमचा एक वर्गबंधू.. त्याच्या फोटोवर 'मित्रा तू इतक्या वर्षात काहीच नाही बदललास' अशी कमेंट टाकलेली आम्ही. म्हणजे तू अजूनही तसाच आणि तितकाच बावळट आहेस हे सांगण्यासाठी! आता हा आमचा आभासी मित्र आमचा जानी शत्रू होता हे कुणास कळणारही नाही.. थोडे विषयांतर होईल.. पण आज सांगूनच टाकावे.. आमच्या कॉलेजच्या दिवसात यानेच आमच्यावर कुरघोडी करत आमच्या कॉलेजक्वीन शिल्पाला पटवून 'दिलवाले दुल्हनिया ले जाएंगे'चे लाइव्ह डेमॉन्स्ट्रेशन दिलेले..अजून विसरलो नाही आम्ही.. तर या आभासी जगानेच आम्हाला इतक्या वर्षांनी त्याचा आभासी बदला घेण्याची संधी मिळवून दिली! ते ही त्याच्या नकळत! तर ते एक असो.

या छायचित्रांबद्दल अजून दुसरे महत्त्वाचे..

ते छायाचित्र टिपकांत कैद केलेले क्षण आयुष्यभर अनुभवता येतात. आम्ही तर परत आल्यावर ती छायाचित्रे पाहातच पर्यटनाचा खरा आनंद घेत असतो! आणि कित्येकदा तर ती पाहतानाच जाणवते त्या जागेचे सौंदर्य. काही ठिकाणी तर आम्ही तिकडे गेलो होतो हे छायाचित्रे पाहिल्यावरच लक्षात येते आमच्या. म्हणजे त्या छायाचित्र टिपकात ती स्थळे कैद करता करता आम्ही प्रत्यक्ष डोळ्यांनी स्थल दर्शनही करत नाही.. तर त्या कॅमेराच्या अंतर्गोल भिंगातूनच पाहात असतो आणि परतल्यावर अंतर्मुख होत असतो. आमची दृष्टीच तशी तयार झाली आहे.. असो. तर तंत्रज्ञान येथे आमच्या मदतीस धावून आले आहे अन्य ही कित्येक बाबींप्रमाणे.

अर्थात आमच्या भ्रमणतंत्राची मोहिनी इथवरच मर्यादित आहे असे नका समजू. आम्ही ते तंत्र आणि ते ज्ञान सदैव उपयोगात आणत असतो. आमच्या भ्रमणध्वनीतील ज्ञानाचा एकही कण आम्ही आमच्यापुरता मर्यादित ठेवत नाही. वाटून टाकतो. ज्ञान दिल्याने ज्ञान वाढते म्हणतात ना ते आम्ही तंतोतंत पाळतो. त्यातून मग दुर्धरातल्या दुर्धर रोगांवर आपल्या वैद्यकीय तज्ज्ञांनी कसा औषधांचा मारा करून त्यांचे उपचार आपल्या आवाक्याबाहेर घालवले आहेत.. साध्या गाजर किंवा काकडीच्या रसाने ते कसे बरे होतात याच्या बहुमोल ज्ञानापासून आंतरराष्ट्रीय सीमेवरील सैन्याच्या धोरणापर्यंतचे ज्ञान आम्ही मुक्त हस्ते उधळत असतो. अगदी अमेरिकेच्या चुकीच्या धोरणांबद्दलची मते आम्ही प्रत्यक्ष अमेरिकेतील कोणास कळण्याआधीच आमच्या मित्रवर्गास कळवतो. आमच्या भ्रमणध्वनीवर कधी एकदा माहिती येते आणि कधी ती सर्वांस

पाठवून आम्ही सकळ जनांस शहाणे करून सोडतो याची आस आम्हाला लागलेली असते. मग त्यातून आजूबाजूला घडणाऱ्या बातम्यादेखील सुटत नाहीत. कुण्या चित्रवाणी वा वृत्तपत्रास लाजवेल अशा वेगाने ही बातमी आम्ही सातासमुद्रापारही पोहोचवतो. यास कुणी नतद्रष्ट अफवा पसरवणे म्हणतात म्हणे! पण लोक काय, काही ना काही बोलतच असतात नाही का? आम्ही सकाळी तो पक्ष्यांच्या आवाजाचा गजर ऐकून उठलो की शुभ प्रभातीच्या चिंतनपर चित्रसंदेशाने दिवसाची सुरूवात करून तोच दिवसाचा प्रवास केव्हा तरी दुसऱ्या दिवशी पहाटे शुभरात्रीच्या संदेशाने संपवतो. दिवसातले अठरा ते वीस तास देण्याइतका भ्रमणध्वनी आमच्या ज्ञानसाधनेतील एक अहम हिस्सा आहे. या मेहनतीतून आम्ही या तंत्रावरली हुकुमत निर्विवाद कमावली आहे आणि या तपाचारणातून आता आम्ही भ्र.तंत्रस्वामी म्हणजे भ्रमण तंत्रस्वामी बनलो आहोत.

असे म्हणतात की तंत्रज्ञान अत्र तत्र सर्वत्र आहे.. आमच्या माहितीत असे एक क्षेत्र नाही जिथे या तंत्रज्ञानाने प्रवेश केला नसेल. तरीही या भ्रमणध्वनी नामक यंत्र तंत्राने प्रत्येकाच्या हाती दिलेली ही विज्ञान आणि तंत्रज्ञानाची भेट आमचे समकालीन आयुष्य बदलण्यास कारणीभूत झालेली आहे. आमच्या सद्यकालीन म्हणजे आजच्या समाजाच्या एकूणच वाटचालीत आणि जडणघडणीत या तंत्रज्ञानाचा वाटा फार मोठा आहे. आम्ही स्वतः तंत्रज्ञानाच्या प्रगतीने थक्क होऊन सदा डोळे फाडून ती पाहात असतो. आजघडीला प्रगती आणि विकास ही समाजरथाची दोन चाके आहेत. खरेतर हे वाक्य आम्ही आमच्याच भ्रमणध्वनीतील शुभप्रभातीच्या संदेशातून साभार घेतले आहे. या दोघांच्या सुरळीत राहण्यानेच हा समाजरथ सुदृढपणे धावणार आहे. ( ही वाक्ये आमचीच! व्हॅल्यू ॲडिशन म्हणा! हीच वाक्ये कुण्या पुढाऱ्याने म्हटली असती तर पुढे टाळया!.. असे लिहावे लागले असते. पण आम्ही सामान्य. आमच्या वक्तव्यावर कोण वाजवील टाळया? ) आणि त्याचबरोबर आम्ही आपल्या पूर्वजांच्या कामगिरीचा विसर पडू देत नाही. आपल्या उज्वल भूतकाळातील ऋषीमुनींना विसरून कसे चालेल? पूर्वी आम्ही स्वतःस एक साधासुधा मानव म्हणवून घेत असू.

पण आता त्या ऋषीमुनींस स्मरून आम्ही देखील आता स्वतःस भ्रमण तंत्रस्वामी संबोधू लागलो आहोत. विज्ञान तंत्रज्ञान आणि अध्यात्म यांची सांगड घालून नैतिक, आध्यात्मिक, राजकीय आणि त्याचबरोबर भौतिक, रासायनिक अन जैविक उन्नयनासाठी सदा सर्वकाळ कार्यरत ते आम्ही. आम्ही भ्र.तंत्रस्वामी आहोत. उगाच भ्र.तंत्रस्वामी म्हणजे भ्रमिष्ट तंत्रस्वामी वगैरे फालतू जोक्स नकोत यावर. त्या भ्रमणध्वनीवर एलओएल म्हणण्याच्याही लायकीचा नाही

तो. तर आम्ही भ्रमण तंत्रस्वामी आहोत.. म्हणजे आता तसे बनले आहोत. ते ही जाणूनबुजून, समजून उमजून अन डोळयांचे कवाड सताड उघडे ठेवून!

असे आहोत आम्ही भ्र.तंत्रस्वामी. कुणीही स्वामी म्हणजे आपल्याकडे परम वंदनीय. आम्ही दिसावयास मात्र तसे नाही. आम्ही अत्यंत साधे दिसतो. उगाच भगवेच कपडे घाला किंवा नुसत्याच अंगठ्याच्या खडावा घाला असे नखरे नाहीत आमचे. त्यामुळे आमच्याकडे पाहून कदाचित आम्ही इतके महनीय व्यकिमत्व असू याचा संशयही येणार नाही कुणाला. पण अति नम्रतेने आणि लीनतेने सांगतो आम्ही, आम्ही या तंत्रयुगातील तंत्रस्वामी आहोत. भ्र.तंत्रस्वामी म्हणून आमचा लौकिक देशेदेशी पसरला आहे आणि पुढेही पसरत राहिल. आमचा महिमा अगाध आहे आणि तसा राहिल ही.

आता खरेतर आमची पुनश्च त्या भ्रमणध्वनीकडे वळण्याची वेळ झाली. आमच्या व्हॉट्स्यापी कित्येक संदेश गेल्या पंधरावीस मिनिटांत येऊन पडले आहेत. त्यात नक्कीच अति महत्वाचे काही असणार. आम्हास सदा सतर्क राहून त्यातील जनहितार्थ माहिती पुढे पाठवावी लागते. लागते म्हणजे.. तसे कायदेशीर बंधन नाही पण आमचे आम्हीच एक नैतिक बंधन घालून घेतले आहे आम्ही. तर पुन्हा आमच्या जीवित कर्तव्याकडे वळतो.

जाता जाता शेवटी एक..

खरे तर आम्ही स्वतः सांगू नये.. पण त्याखेरीज कळणार नाही तुम्हाला आणि त्याखेरीज तुम्ही हे म्हणणार नाहीत..

म्हणा..

जय हो बाबा भ्रमण तंत्रस्वामी..

अर्थात.. बाबा भ्रमण तंत्रस्वामी की जय!

## *माझे चाहित्यिक आत्मकथन!*

नुकताच मला एक शोध लागला. म्हणजे चहाबाज आणि चहाटळ हे विरूध्द अर्थी शब्द आहेत हे मला हल्लीच समजले. चहा पिणारे ते चहाबाज आणि त्याला 'टळ' म्हणणारे ते चहाटळ! असे चहाटळ तसे अल्पसंख्य म्हणजे कमी असले तरी तशी चहाटळपणाच्या खऱ्या अर्थाच्या चौकटीत  बसणाऱ्यांची कमी नाही! अगदी लहानपणी आई आणि वर्गातल्या बाई चहाटळ कार्टी म्हणत मला. तशी ती चहाटळ पुढे चहाबाजी होईल हे कुणास ठाऊक होते! चहाबाजी हे चहाबाजचे स्त्रीलिंगी रूप हे इथे सांगायलाच हवे मी.

तसे माझे पाय पाळण्यात दिसायला हरकत नव्हती. म्हणजे बघणाऱ्यास दिसले असते. माझ्या लहानपणीच्या बाल कहाण्यांमधूनही लक्षात आली असती माझ्या चहाबाजीची लक्षणे.. फक्त बघणाऱ्याची कमी होती. म्हणजे माझ्या वयाच्या तिसऱ्या वर्षापासून मी हा चहाबाजपणा करीत आहे. ( आता.. म्हणजे हल्ली काही लोक मला जहांबाज बाई म्हणतात याचा त्याच्याशी काही संबंध असावा का? नसणार.. लोक काय? काय पण बोलतात )

म्हणजे बघा..दूध पिऊन मनुष्य जन्माची सुरुवात होत असेलही. नाही होतेच. कारण एकच.. त्या वेळीस.. म्हणजे जन्मल्या जन्मल्या.. आधी ट्यॅहँ करून रडण्याचे टेन्शन. जगातल्या पहिल्या एंट्रीतच डायरेक्ट सुरेल गायन. मी आले.. नीट रडले बिडले नाही तर नसती आफत! आणि मी तशी रडले तर आजूबाजूला सारे फिदीफिदी हसले. अजून लक्षात आहे माझ्या. ते असो. पण सांगायचा मुद्दा असा की त्या मुक्या बिचाऱ्या जिवास जे काही मिळेल ते प्यावे लागते! तसे मी पण दूध प्यायले. मला जन्मतः बोलता आले असते तर? तर मी पहिल्यांदा बाटलीतून चहा मागितलाच नसता असे नाही. पण आयुष्यातली पहिली काही वर्षे अशी चहाविना वाया गेली. पण नंतर नाही. मी तर शाळेत जाण्याच्या वयाची झाले त्याच्या आधीपासूनच चहा पिण्यास सुरूवात केली. आणि आजही या क्षेत्रात कार्यरत(!) आहे.

माझे लग्न ठरले ना तेव्हा तीन मुलांना मी फक्त ते 'चहाटळ' होते म्हणून नापास केलेले.

आई म्हणाली होती, 'काय गं कमी आहे त्यांच्यात..'

मी म्हणाले, 'काय आहे गं त्यांच्यात? चहा न पिणारा.. हुं..मुलगा कसा हवा? मेरे जीवनसाथी चाय पिये जा!'

आई यावर मलाच चहाटळ कार्टी म्हणाली! तरी बरे आईनेच त्यांना चाय पे बुलावा पाठवलेला होता! ते चहाटळ निघाले त्यात माझा काय दोष? अर्थात तेव्हा हे चहाटळ आणि चहाबाज विरूद्धार्थी शब्द म्हणून माहिती नव्हते. ते असो. पण मी आईच्या सांगण्यास बधले नाही. बेसिक्स मध्ये कसले कॉम्प्रोमाईज? आई नि बाबा दोघेही वैतागून म्हणाले, 'तुला आसामच्या चहाच्या मळ्यातला मुलगा शोधून काढू का?' खरे तर मला चालले असते पण त्या मळेवाल्याच्या घरातच त्याचा सारा चहा संपला असता तर त्याला चालले असते का.. कुणास ठाऊक! असो. तो कुणी आसामी असामी काही बघण्याची गरज पडली नाही कारण पुढे माझे सूत जुळले ते सूत शी म्हणजे सूतशेखरशी. एखाद्या आयुर्वेदीक जडीबुटी सारखे संपूर्ण स्वदेशी नाव असणारा तो बघायला आला आणि तेव्हाच दोन कप चहा पिऊन गेला! म्हटले ये हुई ना बात! मुलगा हो तो चहाबाज! तर अशा जांबाज चहाबाजाशी चतुर्भुज होऊन मी रीतसर चंदा रमाकांत कुलकर्णीची कुंदा सूतशेखर गाळणे झाले. त्याने नाव बदलले.. म्हणाला, 'तुझ्या बाबांकडे काय मागू? चंदा द्या? उगाच वर्गणी गोळा केल्यासारखे वाटते! त्यापेक्षा चं चा कुं करू!'

मी म्हटले 'चंदा काय चुंदा काय की कुंदा काय!'

सूत त्यावर खूश झाला नि म्हणाला, 'इस बात पर एक चाय हो जाये!'

यासारखा रोमॅन्टिक सूतशेखर असताना मी अन्य कुणास कसे वरले असते?

आज ही आम्ही दोघे चहाबाज जमलो की कमीतकमी चारकप चहा (त्यानेच केलेला) रिचवतो! आम्ही 'कुटुंब रंगलंय चहात'वाले कुटुंबवत्सल आहोत. आजही मी मुबलक चहा मिळेल अशाच ठिकाणी जात असते. जिथे चहा नसेल ती जागा.. 'या वो जगह बता दे जहां पर चहा ही हो' म्हणून टाळते.

जसा जसा विचार करते ना मी तसे वाटते

हे जग हॅव आणि हॅवनॉट्स सारखे चहा हॅव्स म्हणजे चहॅव्स आणि चहॅव नॉट्स म्हणजे चहा हॅव नॉट्स मध्ये विभागले आहे. कुणी चहा न पिता कसे राहू शकते? अरसिकतेचा मेरूमणी जणू! पण इतक्यावर निभावले तर ठीकच. चहाची उगाच बदनामी करणारे खूप आहेत. आम्ही नाही बुवा पीत.. म्हणण्यात अतीव आनंद वाटणारे कित्येक आहेत. जणू हेच ते अपेयपान आहे.

आणि चायपानी! आपल्या सामाजिक विश्वात तर यास वेगळेच संदर्भ आहेत. बिचाऱ्या चहाची असली बदनामी व्हावी ना! तर चहा न पिणारे चहाटळ तो पिणाऱ्यास कमी का लेखतात? त्यांना मी म्हणते .. अरे तू ने तो पी ही नहीं कमबख्त! माझी एक कॉफीबाज मैत्रीण म्हणते मी कॉफी पिल्याने .. इथे मी म्हणजे ती.. माझी.. म्हणजे तिची .. बुद्धी तल्लख राहाते! याचा व्यत्यास मी चहा पिल्याने माझी बुद्धी कमी तल्लख आहे असा होतो का? कुणास ठाऊक! तरी बरे अपेयपान न करणाऱ्यास हुशारांस टीटोटलर म्हणतात.. कॉफी टोटलर नाही! पण कुणी काही म्हणो आम्हा चहाबाज आणि चहाबाजींस काही फरक पडत नाही त्यामुळे. आम्ही 'इस बात पर एक चाय हो जाय' म्हणून तेही साजरे करतो!

चहा अगदी मस्त करायची ती माझी आई. म्हणजे अजूनही करते. पूर्वी रेडिओवरच्या श्रुतिकांत चहा कसा नेहमीच फक्कड असे तसा! पण आता सासरी हे काम मी सूत वर सोपवले आहे. तो सुद्धा मन लावून माझी ऑर्डर आली की चहाचे आधण चढवतो! म्हटले ना आहे किती रोमॅन्टिक! तो पण आता सवयीने चहा चांगला बनवतो. म्हणजे आधी नीट नाही बनवायचा पण तरीही त्याच्या चहाची चहा करणे काही मी सोडले नाही. नवीन होता तेव्हा प्रोत्साहन देणे गरजेचे होतेच. त्याची फळे दिसताहेत आता. म्हणजे हळूहळू शिकलाच! आता बनवतो फक्कड चहा! कधी आलं टाकून तर कधी वेलची टाकून. गवती चहावाला चहा त्याची स्पेश्यालिटी. सकाळी उठून नवऱ्याच्या हातून चहा मिळणे हे म्हणजे स्त्रीवर्गास स्वर्गसुखाहून कमी नाही.. नाही का? तो बनवतो चहाचे प्रकार.. पण सांगते ना काय काय फॅडं निघतात हल्ली. आमच्या वेळी कोरा चहा नि उकाळा याहून व्हरायटी नव्हती. कोरा चहा तांबूस काळा असायचा. बाकी व्हरायटी म्हणजे आलं नाहीतर वेलचीवाला नि मसाला चाय! आता हल्ली काही जण ग्रीन टी पितात. कुणी डिकॅफ! म्हणजे डिकॅफिनेटेड म्हणे! आता चहातले कॅफिन का टॅनिन काढून घेतले तर काय राहिले त्यात चहापण? चहासाठी अगदी आयडेंटिटी क्रायसिस म्हणा ना तो! एक लेमन टी असतो.. दुसरा कुठलातरी जास्वंदी टी तर लाल रंगाचा असतो म्हणे! असे सप्तरंगी चहा म्हणजे मूळ चहाची चुलत चुलत भावंडे असावीत. आपापली बस्ताने बसवण्याचा प्रयत्न करणारी. पण मूळपुरूषास धक्का लावायची ताकद त्यांच्यात नाही. असेही हेल्दी.. या नावावर कुणी, कसे नि काय खपवावे यावर कुणाचेच बंधन नाही! अगदी आरोग्यवर्धक चहा! आता फक्त एक नॉन टी

चहा बघायचा बाकी आहे आणि काय! पण माझ्यासारख्या चहाबाजांस फक्त एकच चहा समजतो.. तो म्हणजे अमृततुल्य चहा!

खरेतर चहा एक ग्रेट social equalizer आहे. अठरा विश्वे दारिद्र्य असलेल्या गरीबाघरीही तोच आणि लक्ष्मी पाणी भरणाऱ्या ऐश्वर्यसंपन्नांच्या घरी ही तोच! दोन्हीकडे बनतो तो तोच चहा! फरक असेल तर तो ज्या कपातून पितात त्या कपात! आणि असलीच बशी कपासोबत तर त्या बशीत! चहाइतके साम्य दोन्हीकडच्या जेवणात नाही दिसणार! तेव्हा हाच चहा टपरीवर ही मिळतो तसा पंचतारांकित हॉटेलातही. पण एखाद्या फाइव्ह स्टार हॉटेलात मिळतो तो 'टी..' चहा नव्हे! त्या इंग्रजाळलेल्या पेयास चहा का म्हणावे? फक्त बाहेर म्हणजे टपरीवर मिळणाऱ्या चहापेक्षा यास येथे शंभरपटीने जास्त दाम मोजावा लागतो. तो ही निम्मा चहा स्वहस्ते बनविल्यानंतर! म्हणजे अशा उंची हॉटेलात चहा येतो काळ्या पाण्याच्या रूपात. मग त्यात दूध टाका, साखर टाका, ढवळा नि प्या! पांढरे शुभ्र कप नि किटली आणि त्याहून सुंदरसे टिशू पेपर सोडले तर कौतुक करावेसे त्यात काही नसते. झालंच तर साखरेचे क्युब तोंडात टाकता येतात शेवटी, मूळ चहाची चव विसरण्यासाठी!

बाहेर मिळतो तो खरा चहा टपरीवरचा. खलबत्त्यात कुट कुट कुटलेले आले टाकून उकळवलेला नि फडक्यातून गाळून घेतलेला. ओतताना तो चहावाला समाधी लागल्यासारखा दोन हात अंतर ठेवून उंचावरून ओततो ॲल्युमिनियमच्या किटलीतून डायरेक्ट ग्लासात. त्या टपरीवर यास कटिंग म्हणतात म्हणे! पण हाच खरा अमृततुल्य चहा! कॉलेजच्या दिवसांत हाच चहा पिऊन किती एक दिल्या असतील परीक्षा. म्हणजे एखादी परीक्षा पास झाल्याबद्दल आभाराचे भाषण करायचे झाले ना तर त्यात तो चहा आणि आमच्या हॉस्टेलच्या खालचा हरिराम चहावाला यांचीही नावे घ्यावी लागतील. ते असो.

टी टाईम म्हणून वेगळा वेळ असतो म्हणे! सकाळी उठले की वाफाळता चहा समोर आला की दिवसाचा शुभारंभ होतो. पण आमच्यासारख्या चहाबाजांसाठी हा फक्त आरंभ असतो. चहाची कसली आलीय वेळ? मला तर हे विचित्र वाटते. आई म्हणायची देवाचे नाव घ्यायला

कसली आली वेळ? तसे हे! माझ्या मते एनी टाईम इज टी टाईम! दोन चहाच्या मधली वेळ ती चहापानाची वेळ! पण तरीही हा टी ब्रेक अति प्रतिष्ठित आहे! कुठल्याही मोठ्या कार्यक्रमाचे वेळापत्रक पहा.. कुणी कॉफी ब्रेक देत नाहीत. देतात ते टी ब्रेक! अगदी क्रिकेटमॅच मध्ये पण तो टी टाईम असतो. अगदी विधीमंडळाच्या अधिवेशनाआधीही चहापान असते. आणि विरोधक कुणी असो त्याच्यावर बहिष्कार टाकायचे नियत कर्तव्य करीत असतात म्हणे! तुमच्या राजकारणापायी त्या चहाचा कशास अपमान? का लोकप्रतिनिधी असल्याने त्यांना फुकटच्या चहाची किंमत नाहीये? मी तर केवळ त्या चहापानास जाता यावे म्हणूनही निवडून यायला तयार आहे!

लग्नाआधी आईने सूतला बोलावले होते ते देखील चहापानासच! 'या कॉफी प्यायला' असे कुणी म्हणतात का? पण तरीही सांगते, चहाची वेळ हा एक विचित्र प्रकार आहे. काही जण दिवसात मोजून दोनदा पितात चहा. काय तर म्हणे ॲसिडिटीहोते! कुणास कशाने काय होईल वा व्हावेना याचा नेम नाही! आणि चहाबरोबर काय येतात ती बिस्किटे! भावाबहिणीची जोडी जणू! कप आणि बशीची जशी जुळते ना तशी! पण मी पाहिलंय .. लोक चहात काय काय बुडवून खातात. बिस्किटच नाहीत.. पाव .. टोस्ट काय.. काहीतर  पोळया बुडवतात.. काही तर चिवडा बुडवून खाताना किंवा खरेतर पिताना पाहिलेत मी. मला आवडतो तो चहा शुद्ध स्वरूपातला. उगाच नसत्या जोड्या कशाला जुळवा?

जोडी म्हटले की कप नि बशीची जोडी आठवते. क्रोकरी ही चहाची देणगी म्हटली पाहिजे. चहा आला म्हणजे पाहुण्यास आपले आदरातिथ्य दाखवणे आले. आपण कान तुटक्या कपात भले पिऊ चहा पण पाहुण्यास खास कपबशी दिसलीच पाहिजे. मग त्यातही किती आकार नि प्रकार आले! कुणाच्या चहाच्या कपाचा आकार किती असावा? अगदी भातुकलीतल्या बोळक्याइतके कप असतात आणि त्याहून दहापटीने अधिक चहा मावणारे राक्षसी कप असतात. सगळयात छद्मी 'पाहुण कप' असतो. बाहेरून मोठा आणि त्याच्या आत छोटा बसवलेला कप. याचा उगम पुण्यातून झाला असावा असा प्रवाद आहे. मोठमोठ्या घरात क्रॉकरी म्हणून चहाचे विविध आकारी नि प्रकारी कप जमवायची हौस असते. आपण चहा पिताना समोरच्या शोकेस मध्ये बाकीच्या कपबशा बघून घ्याव्या! मी पाहिलेल्या एका सेटमध्ये तर बशी चक्क बहुभुजाकृती

होती! चहा ओतून प्यावा म्हटले तर एकी कडून पिताना दुसरीकडून सांडावा! हे कप खास दाखवण्यासाठी! एखाद्याचे दाखवायचे दात वेगळे नि खाण्याचे वेगळे असावेत तशा या कपबश्या फक्त दाखवण्यासाठी! चहा पिण्यासाठी कप अलग! तसे हल्ली कुणी बशीत फुर्र फुर्र करून चहा पीत नाहीत. बशीतून फुंकर मारत चहा पिणे डाऊन मार्केट की काय अशी शंका येते मला. इतकेच काय हल्ली तर क्रोकरी विश्वात मग नामक मोठ्या कपाने कपबश्यांची ताटातूट घडवून आणलीय. नुसताच कप .. मोठाला 'मग' म्हणवून स्वतःस मग मिरवून घेतो! बशीचे यास वावडे! एकूण दिखाव्याच्या दुनियेत जीभ भाजून चहा डायरेक्ट गेला घशात तर चालेल पण बशी मात्र नको!

पुलं 'चहा पिणें पासून फायदे' लिहून गेले. जेम्स वॅट चहाबाज असल्याने वाफेच्या इंजिनाचा शोध लागला म्हणून सांगून गेले. तर चहा पिणे पासून फायदे ची यादी नव्याने बनवावयास हवी. पण कशाला हवी ती यादी न बिदी? उद्या श्वसनाचे फायदे किंवा दोन वेळेस जेवणाचे फायदे सांगून कुणी कुणास श्वास घेण्यास किंवा जेवण्यास प्रवृत्त करील असे होऊ शकते का? अर्थातच त्याची गरज नाही. तसेच या कषायपेयाचे आहे म्हणा ना! पूर्वी पुलं तंबाखू बद्दल लिहून गेले.. 'कृष्ण चालले वैकुंठाला राधा विनवी पकडून बाही .. इथे तमाकू खाऊन घे रे तिथे कन्हय्या तमाकू नाही..' तसेच म्हणावेसे वाटते..

वत्सा! मनुष्य जन्म लाभलाय ना.. त्याचे सार्थक कर. कुणी कुत्रा किंवा मांजर चहा पितात का? चहा पिणे हे मनुष्यत्वाचे लक्षण! व्यवच्छेदक म्हणा ना! तर आपणही चहा पिऊन घेऊ. कारण आज ना उद्या साऱ्यांनाच जायचेय.. तिथे तमाकू नसो.. पण तिथे चहा ही नाहीच ना!

तर आता माझी चहापानाची वेळ झाली वाटतेय. तलफ म्हणा ना! तेव्हा थांबवते हे चाहित्यिक आत्मकथन! चहाबद्दल बोलू तितके कमीच आहे. तर या कधी जमले तर चहा प्यायला.. मस्त गप्पा मारू.. चाय पे चर्चा.. क्काय!

फक्त तुम्ही चहाटळ तर नाहीत ना?

## *नाट्यभैरव अनंतरामांचे मनोगत*

मित्रांनो..

आज या आयुष्याच्या सायंकाळी सारे लिहून बोलून हिशेब संपवावा म्हणतोय..

तसा प्रश्न पडेल तुम्हाला.. मी कोण?

तरमी अनंतराम रावळे ऊर्फ रावळ्या! आता तर रावळ्या म्हणजे कोण हाही पडणार प्रश्न.. प्रश्नच नाही! अगदी रंगमंचावर होतो तेव्हाही कित्येकांना पडलाअसता आणि आतातर रंगमंचाहून दूर गेलो त्यालाच किती वर्षे उलटून गेलीत. तेव्हा कोण कशाला ओळखणार नि कोण ठेवेल आठवण माझ्यासारख्या नटाची?

तर मी रावळ्या.

कुणासही वाटेल.. अनंतराम रावळे.. नाव कधी ऐकले नाही? नाटकात होतात? तरी देखील ऐकल्यासारखे वाटत नाही.. कुठल्या नाटकात होता तुम्ही..? असे काही विचारतील कोणी. विचारतील म्हणजे.. विचारणारच..

पण यावर काय उत्तर देणार मी?

रंगभूमी गाजवणाऱ्या दिग्गजांपैकी मी नव्हतो कधीच. 'कमी तिथे आम्ही' या तत्वावर आयुष्य काढले. आज काय कोण आला नाही.. चढवा रावळ्याला स्टेजवर.. आज काय या साईड रोलसाठी कुणी मिळत नाही.. रावळ्या आहे ना! मॉब सीन पडद्यावर.. त्यात रावळ्या 'हवाच'! आता हे 'रावळ्या हवाच' वगैरे माझ्या ॲडिशन्स.. इंप्रोव्हाईजेशन म्हणा हवं तर.. नाहीतर हा रावळ्या 'छोटे तर छोटे पण काहीतरी रोल द्या' म्हणून ज्याच्या त्याच्या मागे लागायचा हे काय कुणास ठाऊक नाही? पण असल्या छोट्या रोल्सना ही नाही नाही म्हणालो कधी. महिन्यातल्या

पंधरावीस दिवसांत तरी मिळायची नाईट ज्यावर ओढला मी संसाराचा गाडा. नाही म्हणायला जोडधंदे केले पण ते संसाराची नड भागवायला. मन रमले ते मात्र त्या स्टेजवरच.

तर सांगावी म्हणतो माझ्याही जीवनाची थोडीकथा.. जीवनगाथा म्हणावी असे काही नाही त्यात.. त्यामुळे जीवनकथाच. आणि फार काही सांगायला पण नाही तसे.. माझ्यासारख्या नाट्यसृष्टीतील छोट्यामाश्याच्या आयुष्यात असून असून काय असणार रोमहर्षक गोष्टी. पण तरीही माझ्यासारखे असंख्य असणार.. डोळे दीपवणाऱ्या रंगमंचावरील आघाडीच्या अभिनेत्यांसमोर आमचे काजवे कोणास दिसणार? पण आम्ही आहोत.. असतो आणि आमचेही ह्या रंगभूमीवर तितकेच प्रेम असते नि आम्हासही तितकाच लगाव असतो. आणि आमचाही हातभार लागतो या रंगदेवतेच्या पूजेत.

तर का नसावी आमची नोंद..

आणि का नाही सांगू माझ्यासारख्याने आपली कहाणी?

थोडक्यात मोठमोठ्या नटांची यावीत चरित्रे किंवा आत्मचरित्रे.. लोक वाचताततही आवडीने. पण म्हणून या मॉब मधल्या आर्टिस्टाने आपली कहाणी कोणास सांगूही नये की काय? भले कुणा वाचकास नसेल त्यात रस पण सांगावयास काय हरकत? हो की नाही?

म्हणजे रंगदेवतेस स्मरून पडदा वर गेला की माझ्यासारख्याच्या अंगात नाटक संचारते. देवदयेने नाटकाचे वेड लाभले. थोडाफार अभिनय दिला. पण रंगमंचावर उठून दिसायला देवाने रूप नाही दिलं. पाठीचा बाक आणि वेडंवाकडं नाक घेऊन कुठला रोल नायकाच्या रूपात गाजवणार होतो मी? पण त्याबद्दल तक्रार नाही काही..कारण कित्येक रूपवानांस तर अभिनयातील ओ की ठो कळत नाही.. की त्यांना रंगभूमी खुणावत नाही. तेव्हा माझ्या या देवदत्त वेडाबद्दल त्या भगवंताचे आभार मानावेच लागतील मला.

तर देवदयेने मी या स्टेजवरचा एक आर्टिस्ट.. नटखट किंवा खट नट .. म्हणजे खरेतर मीच! मी थोडाफार खटपणा केला मान्य आहे मला. पण शारीरिक मर्यादांना कदाचित ओव्हरराईड करायला मी करत असणार तसे. अर्थात हेच कारण असावे.. माझे मलाच नाही कळत की कित्येकदा मी असा खट किंवा खवट का वागलो असणार. पण लोक तेव्हा म्हणायचे.. खट आहे रावळ्या.. माझ्या मागे तर यापुढे घातलेले वाक्य ही आठवते.. 'पाठीला बाक आणि चोचीसारखे नाक.. आणि म्हणे मला हीरो म्हणा!' पण ते ऐकून सोडून देत असे मी. नाही म्हणायला खटपणा केला मी.. आता गंमत वाटते सगळी. पण नटाने कसे खट नसावे याचे मी जिवंत उदाहरण!

जिवंत म्हणजे अजून तरी! आजकाल कसा त्यामोबाईल मध्ये बॅलन्स असला तरच त्यात धुगधुगी असते तशी धुगधुगी टिकवून आहे मी.. म्हणजे जोवर त्या ललाटरेषेवर बॅलन्स बाकी आहे तोवर. म्हणजे कसेय पहा..त्या जगन्नियंत्याच्या दरबारी कसली म्हणून पारदर्शक व्यवस्था नाही. कुणाला जगाच्या रंगभूमीवर प्रवेश मिळणार की कुणी या जगातून एक्झिट घेणार.. कुणाचे कुणास नाही ठाऊक. पहिला अंक कधी.. मध्यंतर कधी नि तिसऱ्या अंकाचा पडदा कधीपडणार.. आहे कुणास ठाऊक? ही माझ्याच एका गंभीर नाटकातली वाक्ये.. नटवर्य भैय्यासाहेब जोशी म्हणायचेत ती किती सुंदर. मी फक्त पाठ करून ठेवलीत. तर या दुनियेच्या भव्य दिव्य स्टेजवर मी पहिले पाऊल टाकले त्यास आता कित्येक दशके लोटली. पहिल्या अंकात फक्त काही चिमणी पाऊले खुणा उमटवून गेली! हे वाक्यही माझ्याच एका नाटकातल्या विनोदी पात्राचे. आणि माझ्या बाबतीत तितकेच विनोदी! कारण आजकालची पोरं कशी नशीबवान. त्यांचे लाड काय होतात नि वाढदिवस काय होतात.. कसली म्हणून ददात नाही. आणि माझ्या लहानपणी? वंशपरंपरागत किंवा वारसाहक्काने म्हणजे मोठ्या भावंडांकडून त्यांना होत नाहीत म्हणून मिळणाऱ्या चड्ड्या नि सदरे आणि वाढदिवशी शाळेत मिळणारा एक अख्खा खडू.. तोही पांढरा.. रंगीत नव्हे.. अशा अवस्थेत लहानपणीची कसली आलीत ती चिमण पावले! पण हलाखी म्हणावी तर तीही नव्हती. खाण्यापिण्यास तसे कमी नव्हते. पण त्याकाळी पोरांचे कौतुक करावे

असला काही मामलाच नव्हता. उगाच लाडकौतुकाने पोरास नव्या कपड्यांत सजवावे किंवा त्याचे लाडकोड करावेत अशी व्यवस्था अलिकडची. त्याकाळी आई आणि त्याहून बाप पोरांस नाचवीत असे. बाप म्हणेल ती पूर्व दिशा आणि पित्याच्या उगवत्या सूर्यास नमस्कार! आता तर पोरंच आईबापास नाचवतात. मी पाहतो ना माझ्या नातवंडांना. त्यांना पाहून वाटते किती नशीबवानही पिढी. तर कौतुक म्हणून आमच्या लहानपणी काही नव्हते. अशा लहानपणीच मीकेले ते स्टेजवर पदार्पण. पण माझ्या पहिल्यावहिल्या नाटकातील रोलनंतर कौतुकाऐवजी बापूंचा प्रसाद मिळालेला आठवतो. 'नाटकं करतोयस.. अभ्यासाच्या नावाने बोंब..' म्हणून उद्धार झालेला बापूंकडून. बापू म्हणजे आमचे वडील. त्या मोठ्या खटल्यात माझा नंबर पाचवा. आणि माझा पाळणा माझ्यानंतर अजूनतिघांनी वापरला. खरे सांगतो त्याकाळी एकेका चीजवस्तूची क्वालिटीच तशी. नाहीतर माझ्या नातवाचा मयूरचा.. पाळणा.. कसाबसा तो सातेक महिन्याचा होईतोवर टिकला आणि त्यापाठी आलेल्या नातीसाठी.. म्हणजे प्रियासाठी.. नवा गुलाबी पाळणा आणला गेला. आणि तोही न कुरकुरता! तर सांगत होतो माझ्या रोल बद्दल. गणपतीच्या दिवसांत त्याकाळी होत असत अशी गल्ली गल्लीतून नाटके नि पोरंपोरीत्यात भाग घेत असत. उगाच कलागुणांना वाव वगैरे गोंडस नावे नसायची तेव्हा. पोरं आपल्याआप नाटकात नाहीतर गाण्यात पडायची आणि घरी आल्यावर अभ्यासाबद्दलओरडा खायची. तसाच मी देखील खाल्ला. पण नाटकाच्या भुताचा वेताळ काही मानगुटीवरून उतरला नाही. तो तसा चढून बसलाय तो आजवर. अर्थात गेले काही वर्षे प्रकृतीमान साथ देत नाही त्यामुळे त्या समंधास शांत व्हावेच लागले आहे गेली काही वर्षे. पण आजवर ते भूत काही न काही काम करवून घेत होते माझ्याकडून.

काम म्हणजे.. भले असोत छोटे छोटे रोल्स.. नाटकांतून.ऐन भरात नि त्यानंतर मोजून एकूण अठ्ठ्याऐंशी नाटकं केली मी. तसा काहीसिनेमातून मॉबमध्ये झळकलो. कुठे शिपायाचे नाहीतर भिकाऱ्याचे 'गेस्ट रोल्स' केले.. अगदी नटसम्राटात शेतकरी म्हणून नटसम्राटांपुढे.. म्हणजे अप्पाबेलवलकरांसमोर काही प्रयोगांत उभा राहिलो.. पण एवढ्यात संपत नाही हे..पूर्वी कधीतरी

रुपेरी पडद्यावर आलो होतो मी.. नायक म्हणून. एक नव्हे तर दोन चित्रपटांत. त्यातील एक आल्या आल्या कोसळला नि दुसरा डब्यातून बाहेरही नाही आला. या फिल्मी ईल्मी जगतात अशा गोष्टीना महत्त्व फार. म्हणतात ना यशासारखे दुसरे काही नसते. पण मला वाटते ना की खरेतर अपयशासारखे ही दुसरे काही नसते. खरे सांगतो. अपयशी वा अपशकुनी शिक्का बसला की गुण अवगुण बाजूला पडतात इथे. त्यावेळी यांची रंगदेवतेची सेवा वगैरे मागे पडते नि उरतात निव्वळ हिशेब! चित्रपटात तर काय.. बोलून चालून पैशाचा खेळ. हरत्या घोड्यावर कोण लावील एकही दिडकी? तसा फार कडवट नाही मी पण काही अनुभवांतली कडूपणाची चव अजूनही गेली नाही. इतक्या वर्षांनीही.. तेव्हा त्यातील धग लक्षात यावी. असल्या मायावी दुनियेत असले अनुभव येणारच. आणि नाटकांचे काय.. बोलून चालून नाटकीच दुनिया ती! तरी पण मनोरम.. तोंडाला रंग लावल्याशिवाय सुखाने चार घास घशाखाली जाऊ नयेत इतकी मोहमयी दुनिया ती. रंगभूमी.. रंगमंच.. रंगभूषा.. रंगदेवता.. अशी सारीच रंगमय दुनिया ती. आपले रंगढंग या दुनियेतले लोक जरूर दाखवोत पण माझ्यासारख्यालाही आसरा देणारी ही रंगभूमी. तिची सेवा केली आयुष्यभर याहून भाग्य ते कुठले?

कुणी म्हणेल.. रावळ्या आयुष्यभर छोटेछोटे रोल्स करीत बसलास.. आणि बाता मोठ्या.. रंगभूमीची सेवा नि कायकाय.. पण मी म्हणतो.. आणि रोल छोटे काय नि मोठे काय..मी काय म्हणतो की ही रंगभूमीची सेवा काय फक्त मोठमोठ्या रोल्सनीच होते? माझ्यासारख्या एक्स्ट्रा गणलेल्यांकडून नाही? आणि स्टेज झाडणारा नि पडदा पाडणारा.. आपल्यापरीने करतच असतात ना रंगभूमीची सेवा?

लहानपणी नाटकाची भारी हौस.गणपतीच्या दिवसात दिवसेंदिवस तालमी चालायच्या. मग प्रत्यक्ष रात्री नाटक गाजवून सोडायचो आम्ही पोरं. एकदा का वेशभूषा झाली नि तोंडास रंग लागला की अंगात नाटकाचा संचार होई. मग ती धुंदी दिवसेंदिवस राही.

पाठोपाठ येणाऱ्या सहामाहीत मग आमची दांडी गुल होता होता वाचत असे. त्याचे विशेष काही वाटत नसे फक्त आता पुढच्या वर्षापर्यंत वाट पाहावी लागणार नाटकाची याचीच हुरहूर लागून राही. घरी अभ्यासाच्या नावाने बोंबाबोंब होई. ती बोंबाबोंब सोडली तर सारे कसे स्वप्नवत होते. अजून आठवतात ते दिवस.. स्टेज आपल्या परीने गाजवत होतो. आग्र्याहून सुटकेतला शिवाजी.. आणि देव चालले म्हणून एका नाटकात तुकाराम.. दोन्ही स्वप्नवत रोल्स माझे. लोकांच्या टाळयांचा कडकडाट म्हणजे एखाद्या नटाचे टॉनिक. ते मिळाले की नटप्रकृती गुटगुटीत व्हायलाच हवी.. तशी होत होती.. आणि मग कोणाची तरी दृष्ट लागावी तसा अपघात.. एका गणपतीत स्टेज कोसळून पाठीस गंभीर इजा झाली. अंथरूणात खिळणे आले. डॉक्टर म्हणाले, पाय दोन्ही हलताहेत हेच नवल नाहीतर अशा अपघातात पंगुत्व येण्याचीच शक्यता जास्त. तर त्या दोन पायांच्या बदल्यात पाठीच्या कण्याचा बाक परवडला. आणि तुटलेल्या नाकाच्या हाडाचा वक्राकारही. कायम अंथरूणात खिळून राहण्याहून हे बरे.. किमान स्टेजवर उभा तर राहू शकत होतो मी. त्या पाठीच्या नि नाकाच्या बाकाने माझ्या अर्ध्याहून अधिक भूमिका कटाप झाल्या हे खरे.. पण बाकी अर्ध्या तर वाचल्या याबद्दल मी सदा कृतज्ञ राहिलो आयुष्यभर.. म्हटले पांव सलामत तो भूमिका पचास! हळूहळू रंगमंचावर परत पोहोचलो. साऱ्या मर्यादांसकट. पुढे काय.. त्याच छोट्या छोट्या भूमिका नशिबी येत राहिल्या. पोटापाण्यासाठी थोडा फार उद्योग केला मी. लोक उद्योग सांभाळून नाटक करतात.. मी नाटक सांभाळून उद्योग केला! त्याबद्दल लहानपणी आईबापाची अन पुढे तो वारसा चालवल्यागत बायकोची मनमुराद बोलणी खाल्ली या नाटकापायी. पण आज कशाबद्दल ना खेद ना खंत.. रंगभूमीवर येत राहाणे हे जन्माचे ध्येय असावे असा जगलो.. शक्यते आणि शक्य तितके मी रंगभूमीस दिले.. रंगदेवतेची पूजा समजून. आणि आजविचार करतो तर या रंगभूमीने मला काय दिले? कित्येक नटश्रेष्ठांना याचि देही याचि डोळा पाहिले मी. याहून अधिक मागणे काय असावे? ज्या रंगमंचावर बालगंधर्वांसारख्या दिग्गजांची पावले पडली, त्यांच्या चरणधुळीने जो रंगमच पावन झाला त्यावर पाय ठेवायला मिळणे.. याहून दुसरे भाग्य कोठले? आणि एक..  मी राहतो त्या ठिकाणी पूर्वी मला नाट्यभैरव म्हणत असत.

एका आळीतल्या काही इमारतींतच का होईना..पण ही पदवी मिळावी मला याहून भाग्य ते कोणते? पोरं यायची.. अनंतकाका जरा स्टेज शो साठी मार्गदर्शन करा म्हणत दर गणपतीत. मी देखील उत्साहाने नाटके बसवायला मदत करायचो त्यांना. आमच्या चाळीतली नाटके त्यामुळे एकदम फेमस होती. मोठ्या स्टेजवर असेनही मी कुणी एक्स्ट्रा पण आमच्या गल्लीत मी नाट्यभैरव होतो. आणि चांगलाच लोकप्रिय होतो. ही देखील माझी कमाईच म्हणावी की नाही?

लिहिताना जाणवतेय.. आजवर नुसती लेखकाने लिहिलेली वाक्ये उच्चारली मी. पाठांतर चोख. पण आज प्रथमच आपल्या मनचे काही सांगायला बसलोय. तेही या वयात. समोर आहेत की नाहीत श्रोते .. काय फरक पडणार आहे आता? पण पदरची भाषा वापरायची सवय नाही. काही नट घेतात आपल्या पदरच्या ॲडिशन्स.. पण असला मूळ नाटकाच्या ताजमहालास विटा लावण्याचा अगोचरपणा नाही केला कधी मी.. तर सांगायचे इतकेच की लिहायची सवय नाही..त्यामुळे होणार काही वरखाली. थोडे सुटणार संदर्भ. पण गोड मानून घ्यावे निवाचावे. आयुष्यभर मला रंगमंचावर सहन केलेत.. मायबाप प्रेक्षक तुम्ही.. आताही शेवटची कृपा करावी. म्हणजे एवढेतरी ऐकून घेण्याची कृपा या एकेकाळच्या नाट्यभैरवावर करावी.. तसं लई मागणं नाही.. तिसरा अंक खेचत आहे देवदयेने. आता ना शरीर साथ देत ना स्मरणशक्ती. वयाचा दोष हा. नटसम्राट गणपतराव बेलवलकरांची झाली तशी शोकांतिका नाही झाली याचेच अप्रूप वाटावे असे दिवस माझे. परतीच्या प्रवासास सुरूवात झाली आहेच कधीची पण तसे म्हणावे तर कित्येक वर्षे वाट पाहून ही त्या यमराजाच्या रेड्यास माझा पत्ता मिळाला नाही अजून. म्हणून खेचतोय गाडी. अजून तिसरा अंक सुरू आहे. आयुष्यात तोंडास रंगफासून रंगमंचावर बागडायला मिळाले.. अजून काय पाहिजे? खऱ्या लढाईतही कित्येक अनामवीर लढतात.. काही आपल्या शौर्यकथा स्वतःच्या हृदयी जपत जगतात.. काही आपला देह धारातीर्थी ठेवत अमर होतात.. ठाऊक असूनही की न तेथे तेवणार पणती न उभा राहणार कुठला स्तंभ.. त्या जानबाजांचे शौर्य मोठेच.. आणि माझ्या सारखे जीवन समरातले शिपाई.. तसेच अनामवीर आम्ही.. आम्ही देखील कुठल्या

कौतुकाची अपेक्षा न करता स्टेजवर रमलो आयुष्यभर. आम्ही म्हणजे मी आणि माझ्या सारखेच अनाम अजूनही कित्येक जण.. ज्यांची या जगास ओळखदेख नाही.. आणि त्या रंगमंचाहून वेगळे त्यांना अस्तित्वही नाही. आपली अस्तित्वाची लढाई लढतालढता आता वार्ध्यक्याकडे झुकलो.. आणि आता रवंथ करत बसलोय त्या सोनेरीरूपेरी आठवणी.. असेही आयुष्याच्या संध्याकाळी ते जुने क्षण फार मोहक वाटतात..स्मरणरंजनात जुन्या दिवसांच्या चांगल्याच आठवणी राहतात आणि बाकी साऱ्या अंधुक अंधुक होत जातात. माझ्या सारख्या एका सामान्य नटभैरवाचे चार शब्द ऐकलेत तर कुणीतरी कधीतरी अनंतराम रावळे म्हणून होऊन गेला याची दखल घेतल्याचे एक समाधान राहिल जाता जाता..

शेवटी एकच..

या अनंतराम रावळेस चित्ती समाधान आहे. रसिकांनी नसतील वाजवल्या फक्त माझ्यासाठी टाळयापण नाटकाच्या शेवटी तर उभे राहायचो सारे आम्ही टाळयांच्या गजरात. त्या नाटकातला खारी इतका वाटा तर माझा म्हणून खारी इतक्या वाट्याच्या टाळया कानात साठवून मी निघत असे. बाकी काही नाही..

तुम्ही हे सारे शेवटपर्यंत वाचलेत याचेच समाधान आहे. या वक्रपाठी नि वक्रनाकी नटाची एवढी दखल ही पुरेशी आहे त्याला समाधानाने डोळे मिटावयास! आणि काय लिहू? पुढचा जन्म असलाच तर मिळो परत हा नटाचाच .. एवढी त्या ईश्वरचरणी प्रार्थना करून इथेच थांबतो..

## *गिरीशरावांचे गु-हाळ*

आमच्या बाबांनी आत्मवृत्त वा आत्मचरित्र लिहून ठेवले किंवा त्याला आठवणी म्हणा. त्यांच्या सांगण्यात भूतकाळ आणि त्यांच्या वर्तमानातील वर्णने होती.

मी मात्र हे जसे जमेल तसे सांगतोय. च-हाट म्हणाना..

बाबा भले म्हणाले असोत 'असा मी असामी', पण मी 'कसा मी' आहे कोणास ठाऊक? फक्त बाबांच्या नंतरच्या पिढीतल्या दिव्याने काय दिवे लावले याची उत्सुकता असणा-यांसाठी हा प्रयत्न. थोडक्यात थोड्याफार आठवणी नि लावलेले दिवे नि पाडलेला प्रकाश ! पूर्वी चिमणराव च-हाट लावून गेले, तर हे तसेच गिरीशरावांचे गु-हाळ म्हणाना !

*****

नमस्कार..

मी शंक-या..म्हणजे शंकर..म्हणजे गिरीश. तुम्ही मला असे नाही ओळखणार. माझे पूर्ण नाव जी.डी.जोशी, म्हणजे गिरीश धोंडोपंत जोशी. म्हणजे धोंडो भिकाजी जोशांचे ज्येष्ठ चिरंजीव.

धोंडो भिकाजी म्हणजे..तेच.. 'असा मी असामी' वाले. बेन्सन जॉन्सन मधून रिटायर झालेले. काही वर्षांपूर्वी ते निवर्तले आणि मागे आपले आत्मचरित्र सोडून गेले.

आता माझी लागली असेल ओळख. तर तोच शंकर मी. लहानपणी चौपाटीवर 'दिल मेरा तूने पकडा..'वगैरे गाणे बाबांना ऐकवणारा. काय सांगू? त्या काळी चौपाटी नि शहाळ्याचे काय कौतुक ! शहाळे म्हणजे पर्वणीच. हे गाणे म्हणालो तर 'गळा चांगलाय शंक-या तुझा' म्हणून कौतुकाने शहाळे खाऊ घातले बाबांनी. बाबा कधी मूडमधे आले ना तर उसाचा रसही पाजीत. त्या गु-हाळातून आम्ही मग तृप्त होऊन बाहेर पडत असू. आता आमचे चिरंजीव बघा ! 'हूंss शहाळे? माला थम्सप' हे त्याचे ठरलेले, कोका कोला नि थम्स अप खेरीज नाव नाही दुसरे. उसाचा रस नको, हे नारळ बिरळ नको म्हणे. म्हणो बापडा! त्याची काय चूक? आमच्या लहानपणी ना

टीव्ही होता ना जाहिराती त्या कोल्डड्रिंकाच्या. म्हणजे पहा ते थम्स अपचे काळे पाणी आले तेव्हा मी कॉलेजात होतो. आमच्या शहाळयाच्या पाण्यावर वाढलेल्या पिढीला त्याचे कसले आलेय कौतुक? तशी चौपाटीपण आमच्या लहानपणी सुंदर होती. एकूणच माणसे तशी कमी होती. साफसूफ चौपाटीवर समुद्राच्या पाण्यात पाय बुडवून खेळण्यातली मजा काही और होती. सांगायला हरकत नाही... आता काय लपवायचे? पण कुसुमला घेऊन चौपाटीवर कित्येक संध्याकाळी जायचो मी. आणि शहाळीही खायचो आम्ही. एकदा आम्ही असे बसलो असताना बाबांना ऑफिसातून परत चालत जाताना पाहिलं मी. चालत जात होते बसचा एक रूपया वाचवायला. नशीब त्यांनी नाही बघितले. नाहीतर 'या साठी जातात का साहेब कॉलेजात?' असा उद्धार झाला असता माझा. बाबा रागावले की मला साहेब म्हणायचे ! वर कुसुम समोर असताना आणि काय काय बोलले असते कोणास ठाऊक ! तुम्हाला सांगतो तेव्हाच्या प्रेमविवाहात एक वेगळी गंमत होती. म्हणजे अशी लग्नं फार कॉमन नव्हती म्हणाना ! अर्थात हिंदी सिनेमा तेव्हा जोरात चालायचे. आणि त्यात पोरं नि पोरी कॉलेजात लग्नं जमवायलाच जातात की काय असं वाटायचे. ते एक असो पण राजेशकुमारच्या सिनेमातला रोमॅंटिकपणा आमच्या अंगात भिनला असे तेव्हा. तर सांगत कुसुमबद्दल होतो.. काय आहे आम्ही भेटलो ते बी.कॉमच्या माझ्या दुस-या वर्षात आमच्या वार्षिक स्नेहसंमेलनात. ती मला एक वर्ष ज्युनियर. मग दिल मैंने उसको फेका झाले.. उसने झटसे पकडा ही झाले.. असो. तर चौपाटीवर तेव्हा आम्ही जायचो. काळयापाण्याची म्हणजे थम्सअपची सजा आता मिहीरला. मिहीर म्हणजे माझा मोठा.. तसा एकुलताच. आम्ही पाच भावंडे, दोघे भाऊ नि तीन बहिणी.. पण काळ सरता सरता 'हम दो हमारा एक' कधी झाले कळले देखील नाही. त्यामुळे एकुलता एकच राहिला मिहीर! मुलाचे नाव आजोबा नाहीतर पणजोबांवर ठेवायचा प्रघात होता म्हणे आमच्या घराण्यात. आता पोराला भिकाजी नाव ठेवावे लागले असते तर? कल्पनाच नाही करवत ! तसे बाबा थोडे मागे लागलेले, 'रीत पाळायला हवी, काय समजलास शंक-या?' म्हणे मोठ्याला नाव पणजोबांचे ! नशीब आईनीच घातला मोडता. 'असले कसले ते नाव? भटुरड्यांचे!' आईच्या इतकी वर्षे टिकलेल्या नाविन्याच्या हौसेपुढे बाबांचे काय चालते? चांगले नाव ठेवले.. मिहीर! गिरीशचा शंकर आणि शंकरचा शंक-या होतो तसा मिहीरचा मिहि-या होत नाही एवढाच काय तो प्रश्न!

तसा मिहीर गुणाचा. म्हणजे आमचे बाबा.. बिड्या फुंकायचे.. म्हणजे ओढायचे. नंतर नंतर खोकला बळावला. आजारी पडायला लागले तेव्हा मिहीरच म्हणाला, 'आजोबा ती बिडी

सोडा!‘ मला वाटले पुढे ती सोडून सिगरेट ओढा म्हणतो की काय. कारण मी त्याला पेपरातील ‘मार्लबोरो मॅन‘ची जाहिरात निरखून पाहताना पाहिले होते. पण नाही. बेटा आला आपले पुस्तक घेऊन, त्यात ‘धूम्रपानामुळे नुकसान‘ असा परिच्छेद वाचून दाखवला की आजोबांना त्याने. पण त्याच्या आजोबांची बिडी सुटली ती त्यांच्या जाण्याबरोबरच. पण मिहीरचे कौतुक मात्र वाटल्याशिवाय राहिले नाही.

तसा मिहीर मधल्या पिढीतला म्हणायला हवा. म्हणजे आता एकजात सारी मुले इंग्लिश शाळेत वाघिणीचे दूध पितात तसा तो नाही. माय मराठीची गोडी अजूनही अवीट वाटणा-या पिढीतला तो. तसा त्याच्या शाळेत जायचो मी तो लहान असताना. बाबा आमच्या शाळेत आलेले आठवतात मला. तसा मी कधीमधी जात असेही पण एकूणच ते डिपार्टमेंट कुसुमचे. आणि तसेही त्याच्या शाळेत आमच्या खरे बाईंसारखी मुख्याध्यापिका नाही तर मुख्याध्यापकांचे राज्य! मी म्हणालो, ‘येतो गुरूजींना भेटायला तुमच्या‘ तर हा म्हणतो,‘ गुरूजी काय म्हणता? सर म्हणा! फातरफेकर सर‘ तर ते फातरफेकर सर यांचे हेडमास्तर. पण काही म्हणा, आमच्या वेळी सत्तर मार्क मिळताना मारामार तर यांची नव्वदीखाली बात नाही. पोरे हुशार झाली की परिक्षा सोप्या झाल्या कोणास ठाऊक!

तरीपण तुम्हाला सांगतो, एकदा पाचवीच्या परिक्षेत मिहीर गणितात कसाबसा पास झाला होता. काय त्याचे बिनसले कोणास ठाऊक पण मार्क्स किती मिळावेत? तर पन्नासपैकी सतरा! त्याला मी घेतला फैलावर. तर कुसुम मध्ये पडली. त्या प्रकरणानंतर मिहीरने काय भोकाड पसरले म्हणता! मी तसा एरवी चिडत नाही तुम्हाला सांगतो पण त्या दिवशी माझे डोके आऊट झालेले. म्हणालो, ‘बस! चुप्प अगदी. बंद कर ती नाटके!‘ तो चुप्प तर नाही झाला पण परत म्हणजे अगदी त्याच्या डिग्रीपर्यंत असा काठावर नाही पास झाला कधी.

नाटकावरून आठवले. माझी नाटकाची आवड नानूकाकाकडून आलेली. आता हा नानूकाका काही सख्खा काका नव्हता. पण तो माझा लाडका होता लहानपणी. मला आठवतेय माझ्या लहानपणी आम्ही गेलो होतो एकदा नाटकाला. मिहीर लहान होता तेव्हा आमची वरात निघायची अशी सिनेमा पहायला. लहानपणी आम्हा पाचांना सांभाळत निघालेली वरात नि बाबांची तारांबळ आठवते. अगदी ऑरेंजसाठी मी केलेला हट्टही आठवतो. मिहीरला मात्र ते काळे पाणीवाले कोल्ड ड्रिंकच आवडते, तशी ह्रिला सिनेमाची हौस. त्याकाळी तीन आणि पाच रूपयांत

जायचो आम्ही सिनेमाला कॉलेजचे तास बुडवून. लेक्चर बुडवून पिक्चर ! मराठी आणि हिंदी. इंग्लिश सिनेमे त्याकाळी फार नसत. असते तरी आम्ही काय गेलो थोडीच असतो ते पहायला? तरी नशीब कोणी ओळखीचे नाही भेटले कधी कोणी. मिहीरलाही घेऊन जायचो आम्ही सिनेमाला. पण त्याला मराठी सिनेमे बंडल वाटायचे वय झाले नि आमचा सिनेमाचा खेळ बंद पडला. तशी ही जाते तिच्या भिशीच्या गृप मधल्या मैत्रिणींबरोबर. मी आपला टीव्ही वर सिनेमाची हौस नि चैन करून घेतो झाले. तसे माझे बाबा सांगायचे, बरं कारे शंक-या, आमच्या लहानपणी सिनेमे म्हणजे संत तुकाराम नि ज्ञानेश्वर बरे! परत तो पाहून आलो की लिहा निबंध त्याच्यावर ! मी विचार केला आताच्या सिनेमावर निबंध लिहावा लागला तर काय होईल? बाबा म्हणायचे, ‘आणि बरं कारे शंक-या कधीमधी तुझ्या आजोबांना लहर आली तर रात्रभर मिळायची बघायला संगीत नाटकं, ती ही भक्त प्रल्हाद नाही तर सीता स्वयंवर! तुला सांगतो एकजात सगळा गंभीर मामला शंक-या!’ तेव्हा विनोदी नाटक हा प्रकार नसावा. नसणारच. पण आमचे आजोबा मात्र अस्सल कोकणी. तिरकस विनोदात त्यांचा हात कोण धरू शकला असता? बाबा मुंबईत आल्याने असेल, त्यांचा तो तिरकसपणा थोडा पातळ झाला असावा. मी मात्र राहिलो तसा..गंभीर नाही म्हणता येत, पण बिन विनोदी म्हणायला हरकत नाही. तर सांगत काय होतो, की त्या काळी सगळीकडे देवादिकांचे चांगलेच प्रस्थ होते.

देवादिकांची गोष्ट निघालीयच तर सांगतो. आमचे बाबा...ते कधी या फंदात नाही पडले. सांगायचे,‘खणखणीत वाटोळा रूपाया हाच देव हो, असे म्हणायचे, तुझे आजोबा!‘ पण आई मात्र पूजाअर्चा नि व्रतवैकल्यांत गुंतलेली. माझ्या नि उल्हास..उल्हास म्हणजे माझा धाकटा भाऊ..साठी दर सोमवारी नि शनिवारी अभिषेक नि उपास करी नि संध्याकाळी अंगारा लावी. कधी तिला चिडवले यावरून तर, देवादिकांची चेष्टा नको म्हणून दटावे. याबाबतीत मी मात्र माझ्या बाबांबरोबर. एकूणच हे देव देव करणे माझ्या स्वभावात बसत नाही. पण ही, म्हणजे कुसुम करते सारे...‘आमच्या प्रभूंच्या घराण्यात करतात हो सारे रीतीप्रमाणे‘..अरे हो सांगायचे राहिले, आमची ही, म्हणजे कुसुम, लग्नाआधीची प्रभू..तर असे म्हणून सारे उपासतापास करते. मिहीरसाठी. तसा सर्वात जास्त वेळ मी पूजेला बसलो असेन तर तो आमच्या लग्नात. किती साग्रसंगीत पूजा..मग डोक्यावर अक्षता! बाबांनी तो हिंदमाता कोनाड्यात उभी राहिलेल्या

उखाण्याबद्दल लिहिलंय ना तसे काही कुसुमने नाही केले पण तिलाही इंटरनॅशनल उखाण्याची भारी हौस! त्यात तिने ‘देशात देश बाई जपान..आणि गिरीशरावांवाचून नाही हालत पान‘...असला उखाणा घेतला नि सगळया बायका आ वासून पाहात राहिल्या. मी मात्र मेथीच्या भाजी ऐवजी भाजीत भाजी शेपूची असा स्टॅंडर्ड उखाण्यात बदल करून थोडे नाविन्य आणले.

हनिमूनची पद्धत आमच्यावेळी निघालेली. हल्ली काय इंटरनॅशनल टुर घेऊन जातात म्हणे. आमचा जवळात जवळ म्हणजे महाबळेश्वरचा हनिमून. बाबा तेव्हाही थोडे बोललेच..’आमच्या वेळॊ आम्ही हनिमून शब्द जरी काढला असता तर तीर्थरूपांनी पाच बोटे उमटवली असती गालावर.. काय समजलास शंक-या?’ परत आमची आईच आली मदतीस ! ‘काय तो तुमचा जमाना.. हौस म्हणून नाही मौस म्हणून नाही, नुसते आपले ऑफिस नि घर..घर नि ऑफिस.. आणि विड्या फुंकत लोळत पडायचे. जाऊ द्या पोरांना!‘ बाबा काय बोलणार? थोडक्यात काय आमचा ‘हनिमोर इन महाबळेश्वर’ झालाच!

कुसुम लग्नानंतर घरी आली त्यानंतर नवलाईचे दिवस नवापेक्षा जास्त चालले. याला कारण आमची आई. शरयू नि वृंदा म्हणजे माझ्या दोघी बहिणी सासरी गेल्या नि ही एक मुलगी घरी आली तर आईला तिचे काय कौतुक. त्या नादात आईने तिचे लाड केले ते मिहीरच्या जन्मापर्यंत. नंतर आई अंथरूणाला खिळली वयानुसार पण बोलणे मात्र खणखणीत राहिले. बाबा गेले तर जरा खचली पण सावरली लवकर. पण तिच्या वेळेनुसार तिनेही निरोप घेतला. थोडक्यात काय बाबा गेले, आई गेली नि मी मोठा झालो. मग नूतनचे लग्न लावून दिले. गुणी आहे पोर. माझी शेंडेफळवाली बहीण आहे म्हणून नाही म्हणत. पण खरी कामसू. तिचा नवरा पण माझ्या बॅंकेतला.

तिच्या लग्नाची पण झाली गंमत. म्हणजे मी बी.कॉम नंतर चिकटलो ते बॅंकेत. चिकटायचेच स्टॅंपसारखे तर पोष्टापेक्षा बॅंक बरी! पण कारकून म्हणून नाही. तसा मी जात्याच हुशार. आईकडून घेतलेला गुण असेल. त्यामुळे परीक्षा पास होत होत ऑफिसर झालो.बाबा खाजगी कंपनीत वर्षानुवर्ष टिकले ते आजोबांच्या सांगण्यानुसार. म्हणजे, सगळया बायका नि सगळया नोक-या इथून तिथून सारख्या म्हणून! पण मी नाही सोडली आमची घेना बॅंक त्याला हे कारण नाही. बॅंकेत मला हळू हळू प्रमोशन मिळत गेले नि मी तिथेच फिक्स डिपॉझिटसारखा फिक्स झालो. आमच्या बॅंकेत माझ्या हाताखाली नवीन पोरगा आला, वेंकटेश पै नावाचा.

हरहुन्नरी. नाटकातून कामे करायचा. मुलगा चांगला वागणूकीत. पुढे त्याचीही गंमत झाली. म्हणजे आमची नूतन..तिलाही नाटकाचे वेड. त्या नादात तिची जोडी जमली ती नेमकी या वेंकटेशाशी. मला त्याचा पत्ता नव्हता. एकदा बँकेत आली ती दोघे बरोबर. चुकून असणार. कारण नूतनला मी त्याच बँकेत आहे ते ठाऊक असणारच. मग त्या रात्रीच त्यांचे ते प्रकरण जगजाहीर झाले. मग ते वेंकटेश स्तोत्र म्हणत ती सासरी गेली. प्रत्यक्ष जावईराजा मात्र माझ्या हाताखाली..गुलाम! दुनिया किती छोटी हे अशावेळी पटते. आजोबा एक गाणे गात ते आठवते मला

'असू दे तुझीच छाया

ही भोळी भक्ती नको वाया

सांभाळ रे विठुराया

हा भवसागर तराया'

चाल अर्थात 'सुखकर्ता दुखहर्ता'चीच. तर त्याच भवसागरात पोहतोय झालं सगळ्यांना घेऊन!

पोहण्यावरून आठवले, लहानपणी आम्ही पोहायला जायचो. डालडाचा डबा घेऊन. बाबा ढकलायचे विहीरीत, धपकन आवाज यायचा पडल्याचा. गावी गेलो की नदीवर रोज हुंदडायचा कार्यक्रम व्हायचा. मला आठवतेत नूतन पाण्याला जाम घाबरायची तर बाबा तिला पोटाशी धरून विहीरीत उतरायचे स्वत:च. हळू हळू तिची भीती गेली. कोकणात गेलो की ही धमाल असायची. बोरे, करवंदे, आंबे खात फिरायचो. परत पाण्यात डुंबण्याची मजा औरच. मिहीर शिकला पोहायला तो म्युनिसिपालिटीच्या तलावात. कारण तोपर्यंत आपल्या प्रगतीपथावरील महाराष्ट्राने सगळ्या विहीरी बुजवून टाकायचा कार्यक्रम राबवलाय सगळीकडे. बोरे, चिंचा खातात पोरं ती गाडीवर विकत घेऊन. आणि तसे आता कोकणात जाणे नाही होत हल्ली. सुट्टी मिळाली की, 'बाबा नो कोकण, गोवा नायतर मनालीला जाऊया' असे मिहीरचे वाक्य ठरलेले. मग कुसुमही त्याची री ओढायला तयार. 'कुठेही जायचे तर तुमचे आपले एकच.. कुडमुड्याला जाऊया.. कशाला कडमडायला? अगदी मामंजीसारखे बोलतात..' त्या सगळ्या भानगडीत कोकणात जाणे राहिले म्हणून माझी हुरहूर नि कुरकुर बाकी राहते. नि मन मी

निमूटपणे सामान बांधायला घेतो आणि निघतो..पर्यटनाला! आता मिहीर झालाय मोठा. तर करतोय सिंगापूरला जायचे प्लानिंग. त्याची बायको मोनी नि तो चक्क इजिप्तला जाऊन आले हनिमूनला.

किती दिवस बदलतात! कुठे ते भटजीचे घर, ट्राम नि बस नी येणारे वा पैसा वाचवण्यासाठी चालत येणारे बाबा नि आता विमानातून उडून जाणाऱ्या बाता करणारी आजची पिढी. मधल्यामधे आम्ही! धोतरातले बाबा पुढे कोट नि पँट घालायला लागले. आमची प्रगती शर्ट पँटवर अडकली. नि आता मिहीर जातो दर शुक्रवारी टी शर्ट नि जाड्याभरड्या जिनच्या विजारी चढवून ऑफिसात, काहीतरी फॉर्मल का इनफॉर्मल फ्रायडे असतो म्हणे. आजोबा कोकणातले, बाबांचे कोकणीपण मुंबईत येऊन जरा पातळ झालेले. आणि मी? षठी सहामासी कोकणात जाऊन आपली मुळे धरून ठेवायचा प्रयत्न करतोय. हिला मात्र या कोकणीपणाचे नाही कौतुक. मिहीर मात्र...अस्सल मुंबईकर झालाय तो. चार पिढ्यात स्थलांतरानंतर झालेले हे स्थित्यंतर! बदल हाच स्थायी भाव असतो म्हणतात. बदल तर झालाच काळानुसार. तो चांगला की वाईट काळच ठरवेल. पण तोल सांभाळून बदलायला बाबांनीच शिकवले आम्हाला. खरे सांगतो आमचे बाबा करीत असतील नुसती कारकुनी पण न सांगता त्यांनी खूप काही शिकवले. एक दोन धपाटे घालायचे पाठीत पण लाडही न बोलता करायचे. आई मात्र सगळ्या आयांसारखीच. आता कुसुमला पाहिलं की वाटते आई नावाची गोष्ट सगळीकडे सारखीच. आता बालमानसशास्त्राचे धडे गिरवतात म्हणे पालक. आमच्या पिढीत बिघडणारी मुलं नव्हती असं नाही पण अपवाद म्हणून. आज डोळ्यात तेल घालून लक्ष ठेवावे लागते म्हणे..मूल बिघडू नये म्हणून. तशी आजची पोरे आमच्याहून हुशार आहेत हो. थोडी इंग्रजाळलेली असली तरी.

आधी म्हटले ना त्याप्रमाणे नुकतेच मिहीरचे लग्न झाले. बापाच्या पावलावर पाऊल टाकून स्वत:च ठरवलं बेट्याचे. हिनी केला विरोध आधी पण एकदा हिला एकटीला गाठून आमचाच पूर्वेतिहास ऐकवला नि ही तयार झाली. आमच्या पिढीचे राज्य संपले. अगदी खालसा झाले नाही म्हणा पण चाव्या दिल्या पुढच्या मालकाला. अजून काही मोडीत निघण्याएवढे म्हातारे नाही झालो आम्ही. मिहीरची बायको म्हणजे मोनी..तिचे खरे नाव मोनिका..सकाळी आठाला घर सोडते ती सात वाजता थकून येते. यातच दिवस जातो बिचारीचा. माझ्या आईने कुसुमला वागवले मुलीप्रमाणे म्हणून असेल ही सुद्धा मोनीला प्रेमाने वागवते. कुसुमला मुलीची भारी हौस. पण हम दो हमारे एक मध्ये मिहीरचा नंबर लागला नि हिला मुलगी मिळायला इतकी वर्षं थांबायला लागले. थोडक्यात काय सगळा आनंद आहे.

बाबा म्हणायचे काळासोबत रहा. बदलायला शिका. पण खरे सांगतो. काळाबरोबर बदलल्या त्या बाह्य गोष्टी. बाकी एकूण कुटुंबाची गोष्ट नाही बदलली. तेच रूसवे फुगवे, तीच भांडणे, तेच प्रेम नि तोच जिव्हाळा. म्हणतात ना जेवढ्या गोष्टी बदलातात तेवढ्या त्या तशाच राहतात. थोडक्यात काय तर हे असे आहे. डीबी जोश्यांची पुढची पिढी जीडी जोशी..त्यांचे राज्य खालसा नि आता एमजी जोश्यांचे सुरू झाले...

...काही गोष्टी बदलल्यात

....नि खूपशा अजून तशाच टिकून आहेत !

येणाऱ्या पिढीतल्या मुलांची चिंता वाटते मला. म्हणजे काय आहे ना.. आमच्या वेळी आम्हाला भाऊबंद होते.. बहिणी होत्या. आमच्या मुलामुलींना त्यामुळे काका आहेत.. मामा आहेत.. वेगवेगळे आजीआजोबा आहेत.. चुलत नि मातुल घराण्यात कित्येक नातेवाईक आहेत. आज ती सोय नाही. आमच्या आधीच्या पिढीत आठ नऊ भावंडे असायचीच. त्यामुळे आपसूक आम्हाला सात आठ काका- मामा- मावशी नि आत्यांची सोय व्हायची. जेवढे काका तेवढ्या काक्या.. तेच मामा नि माम्या.. मावश्या नि आत्यांबाबतीत. त्यांच्याकडून मिळणारी चुलत .. मावस .. मामे.. आणि आते भावंडे..! वंशवृक्षाच्या अशा वटवृक्षासारख्या फांद्या नि पारंब्या असत. आजच्या पोरांना ही सोय नाही उरली. एकुलत्या नि एकट्या मुलास कुठून येणार अशा नातलगांचा गोतावळा?

आज हे सारे सुचले त्याला कारण म्हणजे आमचा बॉस! ऑफिस आणि घर.. दोन्हीकडे आमच्या माथ्यावर कडक बॉस आहेत. घरचे सोडून देऊ कारण सध्याच्या स्थितीस ..म्हणजे सरकारी भाषेत आपत्कालीन परिस्थितीस .. जबाबदार आहे तो म्हणजे माझ्या सरकारी ऑफिसातला बॉस.

झाले काय की..

नेहमीप्रमाणे आजही ऑफिसात पोहोचलो खरा.. तर तिरसट साहेब अधिकच तिरसट आणि तिरकसपणे म्हणाला, क्काय.. आज कोण गेला?

हार्टलेस! कुणाच्या मृत्यूची वाट कशी पाहवते या साहेबाला कुणास ठाऊक! त्याला आम्ही सारे वाकडेसाहेब म्हणतो ते उगीच नाही. तर घड्याळाच्या काट्यावर चालणारे आयुष्य माझं. खरेतर घड्याळाचे काटे ही कित्येकदा वात्रटासारखे मागेपुढे होत असतात. त्यांनाही कित्येकदा वेळेची नसते पर्वा.. तर माझ्यासारख्या साध्यासुध्या मनुष्यास तर थोडेफार मागेपुढे होणारच नाही का? म्हणजे रोज होतोच मला थोडा उशीर पोहोचावयास.. तसा आजही झाला. खरेतर साहेबाची चूक. आजवर इतक्या वेळेस उशीर झालाय मला. त्याची सवय साहेबास व्हावयास हवी होती. पण नाही! दरवेळी लाल लेटमार्कासोबत या लाटसाहेबाची लागट बोलणी आहेतच! साहेबही असला चिटकू की दरवेळेस घालूनपाडूनच बोलणार तो. आता तर माझ्या

उशीरा येण्याची कारणेही पुरवतो तो. आजवर माझ्या कित्येक नातलगांस देवाज्ञा झालीय मी ऑफिसात नोकरीस लागल्यापासून. काही खरोखरीच गेले.. त्यांपैकी काहींस मी पोचवले रीतसर.. काहींस आभासी मृत्यू घडवून आणला. खऱ्या काका की मामाच्या मृत्यूचे दु:ख कुणीही करेल. खऱ्या नातेवाईकांस पोचवणारेही कित्येक असतील. पण आपल्याशी संबंध नसलेल्याच्या मृत्यूबद्दल अश्रू ढाळणाऱ्या कुणास तुम्ही पाहिलेय कधी? म्हणजे इतके विशाल हृदय माझे. जाणारा जातो. या विशाल जगात दर क्षणी जाणारे कित्येक.. हजारो असतील. त्यांच्याबद्दल शोक वाहत त्यांना श्रद्धांजली वाहत ऑफिसात जाण्यास कुणास थोडाफार उशीर होत असेल तर त्यास मानवतेच्या अत्युच्च पातळीवरील मनुष्यप्राणी मानले पाहिजे.. ते सोडून माझ्यासारख्या मरे एक त्याचा सदा शोक वाहणाऱ्या दुज्यास साहेबाचे टोमणे खावे लागावेत? याहून दैवदुर्विलास कोणता?

.. तर म्हणून मला नव्या पिढीबद्दल चिंता वाटत राहाते.

माझ्यासारखेच काही त्या पिढीत निपजतील त्यांना दरवेळी उशीर होण्याचे कारण सांगावयास किमान इतके नातेवाईक असू शकतात याची तरी कल्पना नको का? एकदा ती सवय झाली की मग हळूहळू माझ्यासारखे त्यांना कुणा अज्ञाताच्या परलोक प्रवासाबद्दल वाईट वाटू लागेल की नाही? तर या हमारा किंवा हमारी एकच्या जमान्यात या बिचाऱ्या पिढीतील पोराटोरांनी नि पोरीबाळींनी कुणाच्या तोंडाकडे पाहावे?

तर हे आहे हे असे आहे म्हणा!

म्हणजे काय आहे ना की माझा स्वभावच असा. कनवाळू! मी नेहमी इतरांचा विचार करत असतो.

म्हणजे बघा..

आज उशीर झाला मला.. नेहमी इतकाच.. जास्त नाही काही. तर साहेबाचे टुमणे.. काय आज कोण वारले तुमचे? कुठल्या आजोबांचा लावलात नंबर? की काका?

काका नि आजोबा म्हणे!

कुणी अशा अवस्थेत अस्वस्थ झाला असता.. हो की नाही? पण मी नाही. मी सुहास्य वदनाने कामास लागलो. साहेबास दुरूत्तर नाही की काही नाही. साहेबाच्या गोष्टी निमूटपणे ऐकून कोण घेतो सांगा आजकाल? उदाहरणार्थ तो परांजप्या.. उगाच अरे ला कारे करत असतो. मी निमूटपणे ऐकून घेतो.. कारण उद्धटपणा माझ्या रक्तातच नाही. ते एक राहू द्या. नम्रपणा हा सद्गुण खरा. पण उगाच त्यामुळे मी एक नंबरचा न बोलून शहाणा असले काही टोमणे ऐकावे लागतात मला. ते तर ऐकतोच मी! परत चिंता करतो विश्वाची! त्यामुळे साहेबाची बोलणी खाऊन निमूट बसण्यावर भागतंय थोडीच माझे! म्हणजे इतक्यावर थांबतो थोडीच मी. मी करतो ती चिंता! आणि चिंतन भावी पिढ्यांना भेडसावणाऱ्या प्रश्नांचे! थोडक्यात हे आहे हे असे आहे. कारण माझे व्यक्तिमत्वच असे.

खरे सांगू ना तर माझे हे असे होण्यास माझे बालपण जबाबदार आहे. मानसशास्त्रात म्हणे अशा थियऱ्या आहेत. म्हणजे आपल्या आयुष्यात आपण पुढे कसे वागतो हे आपल्या बालपणातील दिवसांवर अवलंबून असते म्हणे! म्हणे कशाला.. आहेच. म्हणजे निदान माझ्या बाबतीत तरी असणारच तसे. लहानपणापासूनच मी असा. मला आठवतात ते संस्कारक्षम दिवस. बालमन नावाचे मन होते तेव्हा माझे. कोवळे! त्यावर त्यावेळी झालेले ते संस्कार.. त्यांना खरेतर ओरखडे म्हणालात तरी चालले असते.. पण तशी पद्धत नाही आपल्याकडे. सगळ्या बालवयीन बाबींना आपण संस्कारच म्हणतो. मातीच्या गोळ्याचे उदाहरण तर सर्वांना ठाऊक असेल. म्हणजे जसा आकार देऊ तसे मडके बनते म्हणे. आणि काही राहात असावेत नुसतेच.. गोळे!

अजून आठवतेय..

मी लहान होतो तेव्हा.. चिमुकल्या देहात फिट झालेले मन .. तेही चिमुकले होते.. बालमन म्हणून त्याला वेगळी ओळख होती. तर तेव्हाची गोष्ट! समजा मी शाळेत गेलो नाही एखाद दिवस. येतो कंटाळा एखाद्या दिवशी. त्यात काय एवढे? मोठी माणसंही मारायची कधी कामाला दांडी. तर आता दुसऱ्या दिवशी काय होईल? शिक्षक विचारणार.. का नाही आलास?

तर कंटाळा हे खरेखुरे कारण सांगितले तर शिक्षकांनी कान पिरगळलाच म्हणून समजा! त्यापेक्षा कुठलातरी अवयव दुखावलेला चालतो.. डोकेदुखी .. ताप.. अंगदुखी .. ही कारणे चालतात. खरीखुरी नसली तरी. म्हणजे खऱ्या कारणापेक्षा खोटे जास्त पटतेय शिक्षकांस.. पटते म्हणजे.. तेच कारण सांगावे जे पटू शकते. मग ते सत्य असण्याची गरज नाही! हे पाहून जे शिकायचे ते मी लहानपणीच शिकून घेतले! आता ऑफिसमध्ये हेच संस्कार कामी येत नसल्यास नवल! म्हटले ना बालपणीच्या या गोष्टी महत्त्वाच्या नि त्यांचा ठसा मिटता मिटत नाही.

बालपणीचा काळ सुखाचा म्हणतात ते खरेच. लहानपण देगा देवा म्हणतात.. अजून काय काय म्हणतात त्या निरागस बालपणाबद्दल ऐकून आहे मी तेव्हापासूनच. पण महत्त्वाचे म्हणजे आपण लहान असल्याने त्याबद्दल काय कोणी बोलावे यावर आपला थोडीच काही उपाय असू शकतो? हे सारे बालपणाबद्दल बोलतात नि काय काय म्हणतात त्याबद्दल.. ते वयाने मोठेच असतात! आणि आपण? मोठेपणी आपलेच बालपण आठवत बसतोय! असो.

तर त्याचवेळी त्याच बालपणाने मला त्या 'चिंता करतो विश्वाची' याचीही शिकवण दिली. म्हणजे आज कशी चिंता आहे मला माझ्या पुढच्या पिढीची तशी. व्हायचे काय ना शाळेत मी अत्यंत हुशार गणला जायचो. अभ्यासात नव्हे. चार पुस्तके वाचून कोणीही हुशारी दाखवू शकतो.. कदाचित गाजवूही शकतो. त्यात मोठेसे काय? पण माझी हुशारी अत्यंत ओरिजीनल. म्हणजे व्हायचे काय की माझ्या शिक्षकांना माझ्यासाठी उघड्यावरील शिक्षण उत्तम असे वाटत असावे. कारण ठरवून मी नेहमी वर्गाच्या बाहेर असायचो. बहुधा वर्गातले शिक्षण माझे आधीच झाले असावे. जात्याच हुशार ना मी! मी असे ओपन क्लासरूम शिक्षण बरेच घेतलेय. गणिताचे शिक्षक तर आले की मी स्वतःच विचारायचो त्यांना, सर बसू की निघू? उगाच नाहीतर मध्ये वर्गास डिस्टर्ब कशाला करावे? माझ्या मनात हा दुसऱ्यांचा विचार प्रथमपासूनच. गणिताचे निम्मेअधिक तास मी वर्गाबाहेरच काढले आहेत. म्हणजे पन्नास टक्के! गणितात शिकलो नसलो तरी आता नोकरीत टक्केवारी शिकलो मी छान! ते एक असो.. तर, त्यातही वर्गातील इतरांना त्रास होऊ नये इतकाच एक चांगला हेतू. तशी

वर्गाबाहेरील दुनिया जास्तच आकर्षक होती. माझ्यावरच्या वर्गातील ही काही माझ्यासारखे कायम 'आऊटस्टॅंडिंग' विद्यार्थी माझ्याबरोबर असत. अर्थात हा शब्द मी हल्लीच शिकलो. नाहीतर शाळेत इतके इंग्रजी यायचे कोणाला? तर अशा मुलांची माझी मैत्री जुळली.. त्यातील काहींशी तर अजूनही टिकून आहे. तर त्या आकर्षक दुनियेत कित्येक नवनवीन गोष्टी शिकावयास मिळत. उदाहरणार्थ चिंचेचा पाला! चिंचेचे झाड आमच्या वर्गाबाहेर आहे हेच खरेतर कित्येकांना ठाऊकही नसेल तेव्हा! तर त्या चिंचेवर चढून चिंचेचे आकडे काढायला शिकलो ते या वर्गबाह्य वेळातच. पण आकडे काढता काढता चिंचेचा पालाही चवीला किती आबंट असतो हे आमच्या वनस्पतीशास्त्रात कुणीच शिकवले नसेल!

तर वर्गाबाहेरील ही गंमत बाकी मुलांची चुकू नये म्हणून मी एक दोन अजून मुलांना तेव्हा भरीस घातलेले आठवते. त्यांनादेखील तो पाला आवडला होताच. आमच्याबद्दल काही पालक काही वाईटसाईट बोलत म्हणे. मतामतांचा गलबला आणि काय! तर माझे परोपकारी मन सांगे मला.. बाकी मुलांनाही या कोंडवाड्यातून सुटका दे.. आणि ती मिळावी म्हणून मी वेळेअगोदर हळूच घंटा वाजवून येत असे. हे काम मोठे हिकमतीचे. एक तर शिपायाचा डोळा चुकवायचा.. घंटा देऊन सुमडीत असे निसटायचे की कोणस कळू नये! या क्षणासाठी मला कित्येक दिवस वाट पाहावी लागलेली मला आजही आठवते. म्हणजे एकतर मुले आधी बाहेर बऱ्यापैकी असली पाहिजेत.. एखादा दुसरा असेल तर कसे चालेल? मग मीच पकडला गेलो असतो. शिपायाकडे नीट लक्ष ठेवणे भाग.. मग घंटी तो कशी वाजवतो ते पाहाणे.. ती सुद्धा वेळेच्या खूप आधी न वाजवणे.. आणि त्यातही तो शिपाई थोडा कामचुकार अशी ख्याती असलेला असेल याची काळजी घेणे.. म्हणजे काय की कुणास संशय यावयास नको.. आणि तो शिपाई पण कसला तोंड उघडेल.. कारण तिकडे हातावर तंबाखू मळून खात होतो..तितक्यात कुणी तरी बेल वाजवली हे तो कोणास कसे सांगेल? थोडक्यात असा नामानिराळा राहून खोड्या केल्या मी तरी त्यांच्यामागे उद्देश एकच.. वर्ग बंधूभगिनींना वर्गाच्या कैदखान्यातून मुक्ती देणे! म्हणालो ना मी.. असे उदात्त विचार तेव्हापासूनच होते माझे.

.. आणि तेच विचार अजूनही डोके वर काढत असतात. आणि त्या सगळयांची मुळे अशी बालपणात रूतलेली दिसतात मला! त्यावरच हा माझ्या जीवनाचा वटवृक्ष उभा आहे..

पांथस्थांस छाया देत..! हे असे काही म्हणायचा मोह होतो पण राहू देत.. अतिशयोक्तीची पण किती अतिशयोक्ती करावी?

तर माझी ही सरकारी नोकरी. ग्रॅज्युएट झालो. शाळेत ओवाळून टाकलेला मी कॉलेजमध्ये सुधारलो असणार. असणार म्हणायला हवे कारण जाणूनबुजून काही मी सुधार करण्यामागे लागलो नव्हतो पण अभ्यासात प्रगती होत होती नि डिग्री झोळीत पडली. त्याकाळीही त्या डिग्रीच्या भेंडोळयांना किंमत होती थोडीच? तरीही त्यामुळेच तर नोकरी मिळाली. सरकारीच ती! आता नोकरीला चिकटण्यासाठी कुठे कुठे गोंद लावावा लागतो हे सुज्ञांस सांगणे न लगे. तर तो मुद्दा महत्वाचा नाही. तरीही सांगायचे हे पण.. की आमच्यावेळी देखील दिवस असेच होते. कागदावर वजन ठेवावेच लागे.. आणि काही मिळवण्यासाठी काही गमवावेही लागे.. तर तसे करून मी नोकरीस चिकटलो.

आजकाल पोरे कशी कपडे बदलावेत तशा नोकऱ्या बदलतात. आमच्या वेळी असली थेरं चालायची नाहीत. कुठे तरी वाचलेय ना ते.. सगळया बायका नि सगळया नोकऱ्या.. सारख्याच! तसे चालायचे तेव्हा. तर नोकरीस चिकटलो मी. तेव्हापासून आजवर लौकिक टिकवून आहे.. लोक म्हणतात.. ह्या साहेबांनी म्हटले काम होणार म्हणजे होणार! मी स्वतःचा उल्लेख साहेब म्हणून का केला? कारण आपल्याकडे कुठल्याही माणसास कुठलीही थोडीफार का होईना पॉवर मिळाली की त्याचा साहेब होतो. माझ्यावरही माझा साहेब आहे.. त्या साहेबावर त्याचा साहेब! तर अशी साहेबी उतरंड आहे! मुद्दा हा की मर्यादित अधिकारांतही मी एक साहेब गणला जाऊ शकतो. आणि त्याच अधिकारात आपले अधिकार नि ॲथॉरिटी गाजवू शकतो! तर माझा तो लौकिक.. त्याच 'चिंता करतो विश्वाची'चा परिपाक! म्हणजे काम तर केलेच पाहिजे. उगाच अडलेल्यास अजून नाडावे कशास? गरजू कोणीही समोर उभा ठाकला की माझे 'चिंता मीटर' सुरू होते! या गरजवंताची गरज किती गरजेची.. हे ठाऊक होणे गरजेचे!

मग मी गरजतो.. 'पाहू.. उडतील पेपर! पाहिलेत ना आपले ऑफिस इतक्या उच्च दर्जाचे आहे.. इतक्या वरच्या मजल्यावर  आहे आणि इकडे पंखे फिरतात तेही इतके फास्ट.. सगळे पाचावर!'

मग गरजूची धारण बसते पाचावर नि समजते त्यास.. की इथे खरे पेपरवेट गरजेचे! पण खरे सांगतो.. माझ्या आढेवेढे न घेता डायरेक्ट अॅप्रोचमुळे ना गरजूच्या डोळयांत पाणी येते अगदी. बहुधा इतका जलद आपल्याला मार्ग दिसेल याची अपेक्षा नसते त्याची. पण मी ती मदत त्यांना पुरवतो. कारण एकच.. या गरजवंताला किती चिंता भेडसावत असतील याची चिंता मला भेडसावत असते. मग त्यातून काही उत्पन्न वगैरे म्हणजे बायप्रॉडक्ट आणि काय!

वर सांगितले ना तसे .. शाळा काही आपणास जास्त शिकवत नाही. उदाहरणार्थ टक्केवारी! मला ते टक्केवारी काढणे शाळेत जमता जमत नसे. आता आमचा एक दोस्त त्यास ठक-के वारी म्हणतो. म्हणो बापडा. बोलणारे काय काहीही बोलतात. पण खरे सांगतो.. हे टक्केवारी काढणे वगैरे मी इथेच शिकलो. तर खरे म्हणजे खरे जीवनच आपल्याला खरेखुरे शिकवत असते हेच खरे! खरे की नाही?

रामदासस्वामी अशी विश्वाची चिंता करीत म्हणतात. असणार. ठोसरांचे घराणे ते. वंशपरंपरागत असणार. म्हणजे मी.. माझे नावही नारायण ठोसर.. त्यास कसा अपवाद असणार? ही विश्वाची चिंता पडलीय माझ्या मागे. अजून किती काय काय सांगावे? उगाच आपल्या उदाहरणार्थ म्हणून चार दोन गोष्टी सांगितल्या.

पण तुम्हाला सांगतो..

याहून जास्त सांगता येईलही. म्हणजे गोष्टीवेल्हाळ स्वभाव माझा. काही मला बडबड्या म्हणतात.. तर काही वटवट्या! तोच.. मतामतांचा गलबला!  मला तरीही वाटते.. उगाच माझ्या गोष्टी ऐकताना कोणी कंटाळू नये. सांगायला काय भरपूर आहे. पण थांबावे लागेलच मला. इतक्या वर्षांत मी इतरांच्या बद्दल विचार करतच जगलो. तर कथन करण्यास कथा कितीतरी असणारच. पण हा मोह टाळला पाहिजे.. एकतर स्वतःच स्वतःची किती स्तुती करावी..प्रशस्त वाटत नाही ती.. कितीही सत्य असली तरी! आणि त्याहून महत्त्वाचे.. तुमची

काळजी! तुम्ही कंटाळाल.. तुमच्या जिवास मग चैन पडेनासे होईल.. मग तुम्ही म्हणाल.. आता अजून किती ऐकून घ्यावे लागेल कुणाला ठाऊक.. वगैरे वगैरे. आणि इतक्यावरच थांबलात तर ठीक. म्हणजे त्याचे काय आहे.. कुण्या थोरामोठ्याचे काही ऐकले ना की मला स्वतःला स्वतः कस्पटासमान वाटायला लागते माझे आयुष्य. तर तुम्हाला माझे कथन ऐकून तसेच वाटू लागायला नको. म्हणून थांबावेच आता! म्हणजे बघा येथेही तुमचीच चिंता! त्या चिंतेपायीच सारे होत आहे हे! चिंतेच्या चुलीत किंवा खरेतर चितेत चिरंतन जळणारे चित्त माझे.. सदैव! तुमच्या जीवास लागणाऱ्या घोराचा घोर मला!

म्हटले ना.. चिंता करतो विश्वाची!

तेव्हा आता थांबावे.. हे बरे!

## *एक मूलभूत मूलगामी मागोवा!*

कोणाला संशय येवो वा न येवो..

आणि कोणास पटो अथवा न पटो..

आम्ही विचारवंत आहोत.. तेही मूलभूत.. तेव्हा..

मुळात आम्हा मूलभूत विचारवंतांचा स्वभाव कोणत्याही गोष्टीच्या मुळापर्यंत जाण्याचा. या गोष्टीच्या मुळात गेलात तर तुमच्या लक्षात यावे.. मुळात ही सवय आम्हाला का लागली?

तर त्याचे कारण झाडाचे मूळ!

म्हणजे असे झाले की झाड बुंध्यापासून कापले तर परत उगवते, मुळे उपटली की नाही उगवत. या शास्त्रीय सत्यावरून आम्ही लहानपणी खूप काही शिकलो. म्हणजे आमच्या मुळापर्यंत जाण्याच्या सवयीचे मूळ त्या झाडांच्या मुळांत आहे हे लक्षात यावे. म्हणजे कोणत्याही गोष्टीच्या मुळाशी गेल्यावरच त्या गोष्टीचा पूर्ण थांग लागू शकतो हे आम्ही शिकतो.

पण ऋषीचे कूळ नि नदीचे मूळ शोधू नये म्हणतात. नाही शोधत आम्ही.

तसेही ऋषिचे कूळ शोधण्याचा प्रश्नच नाही.. कारण ही जमात नामशेष झालीय डायनोसॉरसारखी. पूर्वीच्या काळासारखे कुणी चौदा वर्षे तप करतोय.. कुणाच्या अंगावर वारूळ तयार झालेय.. किंवा कुणास प्रत्यक्ष शंकरभगवान प्रसन्न झालेत.. हिमालयात जातात कित्येक पण कुणी एक तपभर एका पायावर उभे राहून करायच्या हिमालयीन तपासाठी अर्ज करून नि पासपोर्ट व्हिसा वगैरे घेऊन नेपाळात गेलाय.. असे काही ऐकलेय कुणी आजच्या जमान्यात? तर ही ऋषी मंडळी नामशेष झाली आता.. फक्त आता ऋषीतुल्य म्हणावीत अशी काही उरलीत.. आणि नदीचे मूळ?

ते कदाचित शोधले असते. पण आम्ही राहतो या मुंबापुरीत आणि येथे सगळया नद्यांचे बनवलेत नाले. आणि या उरलो कचऱ्यापुरता नद्या कम नाल्यांचे मूळ शोधण्याचाही त्यामुळे प्रश्न नाही. थोडे.. कसले .. चांगलेच विषयांतर आहे हे .. पण थोडक्यात मुळापर्यंत जायचे ही आमची

मूलभूत सवय आहे ती येथे उपयोगी नाही एवढे आम्हास आमच्या मूलभूत चिंतनातून कळले. अन सांगायचा मुद्दा, आमच्या चिंतन पद्धतीच्या उंचीचा आणि वैचारिक खोलीचा अंदाज यावा इतकाच आहे. असो.

आता मुळात आम्ही हे सांगावेच का?

तर हो.

का ते मूळ गोष्ट मुळापासून ऐकली तर कळेल..

आम्हा विचारवंतांची गोष्ट वेगळी. आम्ही सारे काही अति गांभीर्याने करत असतो. जडजंबाल पुस्तके.. अर्थात ग्रंथ वाचतो.. आमचा व्यासंग मोठा.. तर बाकी जनसामान्यांची गोष्ट वेगळी. त्यांस हे ग्रंथबिंथ पचनी पडत नाहीत. गोष्टीरूप समजावले तरच समजले तर समजते. तर ही एक गोष्ट ऐका.. उदाहरण म्हणून..

समजा असे झाले, की रस्त्यावर एक वाहन दुसऱ्या वाहनावर ठोकले गेले. म्हणजे अपघात झाला.

कसा?

अपघातच तो.. अपघातानेच होणार!

तर एक चालक, क्ष समजू त्यास.. तर हा विविक्षित क्ष विविक्षित गाडी घेऊन एका विविक्षित ठिकाणी उभा आहे..नुसताच. म्हणजे या अपघातात त्याची चूक शून्य असे आपल्याला वाटेल. दुसऱ्या चालकाने म्हणजे य ने वेगात येऊन गाडी ठोकली.

का ठोकली?

कारण तो दारू पिऊन गाडी चालवतोय. आता सामान्य विचार असा की गाडी मद्यपान करून चालवू नका. ( या ठिकाणी सहज माहिती म्हणून द्यायला हरकत नाही : सामान्य जन पेल्यातून पितात ती दारू, हाय फाय लोक उंच ग्लासातून घेतात ते मद्य आणि अति उच्च वर्गातील नक्षीदार उंची चषकातून सेवन करतात ती वारूणी असे एक वर्गीकरण आहे म्हणे.

याबाबतीत आमचे ज्ञान शून्य. तेव्हा गरजूंनी शहानिशा करावी!) तर अपघातानंतर पोलिस येईल. त्याच्या त्या मशिनीत य ला फुंकर मारायला लावेल. रीतसर खटला होईल. ठोकक म्हणजे ठोकणारा य किती श्रीमंत वा उच्चपदस्थ आहे यावर अवलंबून त्याची सुटका होईल. ती होईल तेव्हा होवो. पण मुळात या ठोककास या सर्व खटल्याचा त्रास का व्हावा?

आमचे मूलभूत चिंतन सांगते की चूक ही क्ष चीच आहे..

कसे ते पहा.. मद्यपान हा वयाच्या एकविशीनंतर मूलभूत हक्क असलेल्या या देशात हा अन्याय?

आता अधिकच मुळापासून विचार करू.

.. य हा मुळात दारू का प्यायला?

.. या देशात मुक्त वातावरण असताना य ने दारू का पिऊ नये?

.. य प्यायला असल्यासही गाडी चालवण्याचे स्वातंत्र्य य ला का असू नये? .. कोणाला ठोकेल म्हणून य ने मद्य पिऊच नये?

.. आणि य ने आपलीच गाडी चालवू नये?

.. चालवली तर ठोकू ही नये?

.. मद्यपानाने य च्या अंदाजावर परिणाम होतो हे शास्त्रीय सत्य आम्ही मान्य करणार की नाही?

.. असे असताना य ने त्या अमलाखाली गाडी चालवण्याचा निर्णय घेतला तर ती त्याची चूक कशी म्हणता येईल?

.. ही चूक त्या शास्त्रीय सत्याची नव्हे काय?

आमच्या मूलभूत विचारात याला एकच उत्तर दिसते, दारू पिऊन गाडी चालवणाऱ्या य बद्दल अधिक सहानुभूतीने विचार व्हावयास हवा.

.. त्या बिचाऱ्यास दारू का प्यावी लागली?

.. त्याला कोणते असे दु:ख आहे जो तो बिचारा एकेका घोटाबरोबर गिळत असेल?

.. याला दुसरा कोणी मदत नाही करत  गाडी चालवण्यास एवढा एकाकी हा कसा झाला?

एवढ्या साऱ्या प्रश्नानंतर नक्कीच हे लक्षात येईल की चूक ती दुसरी गाडी तिथे उभी करणाऱ्या क्ष ची आहे.

.. मुळात चाके ही चालण्यासाठी असताना ही गाडी उभी करून याने मूलभूत चूक केली आहे

.. एखाद्या थांबला तो संपला या गतीचा कायदा पाळणाऱ्याने ती ठोकली तर त्यास गुन्हा मानावा?

.. गतीच्या कायद्याबद्दल ही अनास्था?

.. इतका अन्याय कोणी कसा करू शकतो?

तर चूक क्ष ची आहे. पण प्रत्यक्षात त्या ठोकक य ला शिक्षेस सामोरे जावे लागावे? त्याची चूक काय.. फक्त गाडी ठोकून कुणास इजा पोहोचवली हीच?

मध्ये कोण्या ईश्वराच्या लाडक्या लोकप्रतिनिधीने कोणा य:कश्चित विमान  कर्मचाऱ्यास मारहाण केली म्हणे. का करू नये? आला असेल राग तर त्याने तो मनात कोंडून ठेवावा नि आपले ब्लडप्रेशर वाढवून घ्यावे? आपल्या रागास वाट देण्यास त्याला नसतील सुचले शब्द म्हणून त्याने मूग गिळून गप्प रहावे? मनात कोंडलेल्या भावनांनी हृदयावर विपरीत परिणाम होतो हे शास्त्रीय सत्यही आम्हाला मान्य होऊ नये? आणि तसा परिणाम झाल्यास त्यास जबाबदार कोण? आणि आपल्या भावनांचा निचरा करण्यास त्याने दिले कोणाच्या श्रीमुखात

ठेवून तर त्याचा एवढा बाऊ का करावा? शास्त्रीय दृष्टीकोनातून रागादि भाव भावनांचा निचरा आवश्यक असताना आम्ही एवढे अशास्त्रीय का वागू लागलो आहोत?

एक संत सांगून गेले..

क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे.

तर आता क्रियेची गोष्ट पाहू.

साधे रस्त्यावरील नॉन लोकप्रतिनिधी अतिसामान्य माणसाचे भांडण पहा. रागाच्या भरात एक दुसऱ्यास म्हणतो..

मैं तुमको देख लूंगा..

दुसरा म्हणतो, क्या करेगा रे? मारेगा तू?

यावर पहिला बाणेदारपणे म्हणेल .. थोबडा फोडेगा..

आता पहिल्याने जर ते फोडले नाही तर ती क्रियेवीण वाचाळता नाही का होणार? तेव्हा अशी क्रिया करणे हे संतवचनाचे पालन आहे. हे मूलभूत चिंतन सर्वांपर्यंत पोहोचावयास हवे. बोले तैसा चाले हे वचन पहिल्याने पाळत थोबाड फोडताना दिले दोन ठोसे तर त्याची पाऊले वंदणे सोडून त्याला पोलिस चौकी दाखवणार आहोत का आपण?

आणि दोन व्यक्ती भांडतात तेव्हा दोघांच्या मनाची तपासणी नको करायला आपण? जो मारका..म्हणजे मारणारा..आहे त्याच्या मेंदूचे आलेख तपासा.. त्याच्या पूर्वेतिहासाची तपासणी करा.. जो मारखा.. म्हणजे मार खाणारा.. आहे त्याने या मारकास उद्युक्त केले त्याचाही अभ्यास नको?

तर आपल्याकडे काही बोलून दुखावले तर चालते .. म्हणजे मानसिक इजा चालेल पण प्रत्यक्ष शारीरिक जखमा करून चालत नाही. हिंसा म्हणे. तरी आपणच म्हणत असतो.. शारीरिक जखमा भरून येऊ शकतात पण मानसिक जखमा जीवनभर टिकतात. तेव्हा हिंसा हिंसा म्हणून नक्राश्रू ढाळत बसणार आहोत का आपण?

आपल्या सवयीप्रमाणे अजून मुळापासून विचार करूया.

या साऱ्यांच्या मुळात आपले हेच अहिंसा धोरण आहे असे आमचा मूलभूत अभ्यास सांगतो.

कसा ते पाहू..

खरे म्हणजे आपण अहिंसा परम धर्म म्हणून अकारणच अहिंसेस डोक्यावर घेतले आहे. आमच्यातला मूलभूत विचारवंत म्हणतो, अहिंसेइतकी हिंसक गोष्ट जगात दुसरी नसेल.

का ते मुळापासून सांगितल्यास पटेल.

..हिंसा हा मानवाचाच नव्हे तर प्राणिमात्राचा स्थायी भाव आहे.

..जीवो जीवस्य जीवनम एकदा म्हटले आणि मान्य केले तर या हिंसेबद्दल उगाच गळे काढायला नको.

..आपले प्राचीन ग्रंथ घ्या.. पुराणे.. पुराणकथा.. इतिहास वगैरे.. सगळ्यात दुष्ट निर्दालन आहे.. कधी गदा, कधी चक्र..कधी तलवार..कधी अजून काही. संहार आहे.. विनाश आहे.. काहीही करून संहार महत्त्वाचा.

..ही आपली संस्कृती आहे.

तर आपल्या संस्कृतीलाच विकृती म्हणण्याची ही विकृती समाज प्रकृतीत कोठून आली?

कधीपासून आम्ही हिंसेचा निषेध करावयास लागलो?

हिंसा ही मूळ प्रवृत्ती आणि प्रकृती आहे. तिचा निषेध करणे हीच खरी हिंसा नव्हे काय? त्यामुळे आम्ही मूलभूत चिंतनातून बनवलेले मत.. अहिंसे इतके हिंसक जगात काही नसेल हे चिंत्य नाही का? लक्षात घ्या.. बोलण्याआधी मानव हिंसा शिकला. आदि मानव हिंसेतूनच

आपले पोट भरीत असे. त्यातूनच तो उत्क्रांत झाला आणि या स्थितीस पोहोचला. तेव्हा हिंसा ही मूळ प्रवृत्ती असताना उगाच गोडवे अहिंसेचे गावेत?

आमचे असे स्पष्ट मत आहे की आपल्याकडे असा मूलभूत विचार जेव्हा होईल तेव्हाच आपल्याला कळेल की मूळ प्रश्न कोणता आहे. पण मुळात कोणाला मूलभूत विचारांची चाड आहे का हाच कळीचा नि मूलभूत प्रश्न आहे इथे! तसे विचारवंत म्हणून आमचे चिंतन अ पासून ज्ञ पर्यंत सर्वच जीवनव्यापी विषयांचे आहे. आमच्या सर्वच चिंतनातून आम्हास या विश्वाची चिंता वाटत असते. पण आमच्या चिंतेची चिंता आम्ही नाही करत. कारण अशा मूलभूत बाबींचा मागोवा घेण्यासाठीच जन्म आमुचा याची खात्री आहे आम्हास. त्यामुळे ही एक चिंतनिका हिंसेबद्दल. त्यातून हाती काय लागते?

हेच की..

या सर्वाचा विचार करून हिंसेला मूलभूत हक्क म्हणून राज्यघटनेत जागा द्यावी. तशी मागणीच करण्याचा आम्ही विचार करीत आहोत. आणि या पुढे या प्रश्नाच्या मुळाशी जो जाईल त्यालाचा आम्ही आमचे मत देऊ पुढील निवडणूकीत.. पेटीत पडे पर्यंत बहुमूल्य असे.

कोणास हे विचार पटणार नाहीत. कोणास थोडे आगाऊ वाटतील. कुणी आमच्याकडे हेटाळणीने पाहिल. आम्हास या सर्वांची कल्पना आहे.

पण खरी गोष्ट ही आहे..

कसेही असले तरी  असले मूलभूत विचार मांडायला आम्ही विचारवंत मुळीच कचरत आणि घाबरत नाही मुळात!

एखाद्या मूलभूत विषयाचा मुलगामी मागोवा आम्ही नाहीतर कोण घेणार..? नाही का?

## *मी (असा) कसा घडलो?*

नमस्कार.

मीच तो विनोदी अभिनेता म्हणजे मराठीतला प्रसिद्ध कॉमेडियन राजीवकुमार. मला ठाऊक आहे मला तुम्ही ओळखणारच. तसा मी आहे प्रसिद्ध. आणि लोकप्रिय. झालेय काय की नुकताच पार पडला तो 'टिंब टिंब आंतरराष्ट्रीय मराठी नाट्यचित्र पारितोषिक वितरण सोहळा.' कधी नव्हे ते मिळाले होते नामांकन मला. मी मोठ्या अपेक्षेने गेलो तेथे. एवढ्या वर्षांतले हे पहिलेवहिले बक्षिस. मिळाले असते तर आनंद झाला असता हे खरे. पण नाही. बहुधा कंपॅशनेट ग्राऊंडवर मी अजून झालो म्हातारा की मिळेल एखादे जीवनगौरव पारितोषिक! पण मी आज ठरवलेय. बक्षिस मिळो न मिळो.. आज माझ्या मायबाप प्रेक्षकांशी संवाद साधायचाच. कमीतकमी माझ्या मनची बात तुम्ही ऐकाल. बक्षिस मिळणाऱ्याचे पानभर इंटरव्ह्यू येतील छापून. त्यात ते काय म्हणणार हे ही ठरलेले असते.. तीच सेवा रंगभूमीची किंवा कलेची आणि मायबाप प्रेक्षकांचे आभार वगैरे.. तेव्हा या रनर अपचे मनोगतही कुठे यावयास हवे की नाही?

तर आज मनास येईल तसे सांगून टाकतो.. मी कसा घडलो ते. मी कसा घडलो याची गोष्ट सांगावीच का? कुणी घडलो नाही तर बिघडलो म्हणायचा! तर कुणी म्हणेल.. मी कसा घडलो ऐवजी असा कसा घडलो का लिहित नाही? तर हे ही खरेच! असा कसा घडलो!

अगदी लहानपणापासूनच मला ही सवय.. ज्यात त्यात तोंड घालायची.. आणि नाक खुपसण्याची. शाळेत असताना बाईंची पाठ वळली फळ्यावर काही लिहायला की क्षणार्धात माझे चाळे सुरू होत. असे की आजूबाजूला खसखस पिके. त्या क्षणापुरता किंचितही आवाज न करता मी तोंडे वेडीवाकडी करीत असे. बाकी पोरे हसत सुटत. हसण्याचा आवाज ऐकून बाई मागे पाहत

तोवर मी चेहऱ्यावरचे सारे काही पुसून गंभीरपणे लिहित असलेला दिसे.. आणि ते हसणारे.. त्यांच्यापैकी कुणी पकडले जात. या साऱ्यामागे माझा हात.. खरे तर माझे तोंड.. आहे हे कुणास सांगूनही पटणार नाही असे भाव असत माझ्या चेहऱ्यावर. त्यामुळे अपराध मीच केला.. तरी शिक्षा इतर कुणाच्या तरी कपाळी असे! ह्यास पाळण्यातले तोंड.. असे म्हणायची पद्धत नाही म्हणून.. पाळण्यातले पाय म्हणावे का? नाही म्हणायला कुणी माझे नाव सांगत ही असे, पण माझ्या चेहऱ्यावरचे साळसूदपणे आणलेले निरागस भाव.. त्यास कुणीही फसत असे. ही माझ्या अभिनयाची .. मुद्राभिनयाची म्हणा.. चुणूक म्हणावी.. अर्थात हे आता मागे वळून पाहताना. कॉलेजमध्ये देखील याचे असेच हातखंडा प्रयोग करीत असे मी. पाळण्यात दिसण्याइतके आता पाय लहान नसले तरी कॉलेजमध्ये एकंदरच या प्रकारास म्हणजे टारगटपणास वाव ही मोठा. कुणास वाटेल मी त्यामुळे कॉलेजच्या नाट्यवर्तुळात प्रवेश केला असेल तिकडून. पण तसे नाही. माझ्यातल्या अभिनयाची चुणूक मलाच कळली नव्हती तर इतरांना काय कळणार! पण मी नाटकाच्या तालमीच्या आजूबाजूला नुसताच फिरकत असे.. किंवा घिरट्या घालत असे. नाटकात काम मात्र कधी करावेसे नाही वाटले. अशात अगदी शेवटच्या वर्षात असे झाले की स्टेजवरचा मुख्य ॲक्टरच ऐन वेळी आजारी पडला. तेव्हा 'शो मस्ट गो ऑन' वगैरे काही ठाऊक नव्हते. पण अगदी शेवटच्या क्षणी.. आणि तेही कॉलेजच्या शेवटच्या दिवसांत.. स्टेजवर उभा राहिलो मी. नाटक विनोदीच होते आणि माझ्या तेव्हा मलाच ज्ञात नसलेल्या अभिनयास पोषक होते. ते नाटक मी गाजवले. आता प्रथेप्रमाणे मला पहिले बक्षीस मिळायलाच हवे.. त्या नाटकास कुणी दिग्गज नाट्यकर्मी यायलाच हवा.. मग त्याने मला हेरले.. नि पुढे माझे रंगमंचावर पदार्पण झाले.. हे असले काही व्हायला हरकत नव्हती. किंबहुना कित्येकांच्या मुलाखती वाचल्या तर हेच घडत असते असे वाटते. पण नाही! हे असले काही झाले नाही. कॉलेजातून बाहेर पडताना हाती फक्त दोन गोष्टी होत्या.. एक डिग्री होती आणि एक नाटकातली ट्रॉफी! फक्त त्या नाटकातून मलाच माझ्यातल्या या कलेचा शोध असा लागला नि पुढे छोटेमोठे रोल मिळत गेले. खरेतर छोटेमोठे रोल्स ही म्हणण्याची नुसतीच पद्धत. खरेतर सारे रोल्स छोटेच. कुठे विनोदी नोकर तर कुठे

कॉमेडी पोलिस वगैरे. चार दोन सीन्स मध्ये काम संपे माझे. पुढे विनोदी नाटकांची लाट आली. त्यात कुठे न कुठे वर्णी लागायची ती लागली. नाटकाचे काहीसे क्रिकेटसारखे असते. पीच म्हणजे प्रेक्षक चांगला हवा. लिखाणात दम हवा.. तो असेल तर मग कॅप्टन म्हणजे दिग्दर्शक चांगला हवा! आजूबाजूला आपल्याला साथ द्यायला चांगले नटनट्या हवेत.. चांगले नेपथ्य हवे.. संगीत हवे.. थोडक्यात हा ही एक क्रिकेटप्रमाणेच टीम गेमच आहे म्हणायचा. फक्त नाटकातले मुख्य पात्र म्हणजे त्यातला आधीच घोषित झालेला मॅन ऑफ द मॅच! तसे रोल्स मिळायला काही वर्षे जाऊ द्यावी लागली. तोवर घरची चूल.. खरेतर घरचा गॅस म्हणायला हवे काळानुसार बदलत.. पेटवायला केली नोकरी. मात्र ऑफिसात एक नट म्हणून वट होती! बाटलीबॉय साहेब तसा दिलदार होता. पण ऑफिसातले काम करायलाच हवे ना कुणीतरी? मग नाटकाचे दौरे व्हायला लागले. साहेबाचा ही नाइलाज झाला. नोकरी सोडली.. पण बाटलीबॉय साहेबामुळे सन्मानाने. मग पूर्ण वेळ रंगभूमीस वाहून घेणे आले! काय आहे ना.. एखादा नट नुसता काम नाही करत.. तो रंगदेवतेची पूजा करतो.. आणि नटास अन्य काही कामधंदा नसला तर तो रंगभूमीस वाहून घेतो! असेच बोलण्याची पद्धत आहे आपल्याकडे! तर काही असो.. मी वाहून घेतले रंगभूमीस आणि केली रंगदेवतेची पूजा आपल्या मगदुरानुसार.

तर हसवण्याचा माझा धंदा! कुणी निंदा कुणी वंदा! कुणास आपल्या चेहऱ्यावरच्या आठ्या घालवून हसण्यास भाग पाडणे मुश्किल. त्यात परत हास्यास्पद आणि हास्यकारक दोघांत महदअंतर! ते सारे सांभाळून हास्यरेषा फुलवण्याचे काम. कॉमेडीमॅन म्हणून प्रसिद्ध झालो. पण माझे रोल राहिले ते साईड रोलच. एक कुठला गंभीर रोल केला चुकून तर त्यातील अभिनयाचे झाले कौतुक! म्हणजे विनोदवीरास फक्त जसे टायमिंग हवे.. अभिनयाच्या तागडीत त्याची कामगिरी नाही तोलली जात! कारण गांभीर्यासच फार गंभीरपणे घ्यायची पद्धत आहे आपल्याकडे. आणि विनोदवीरास कुणी गांभीर्याने घेते का? खरा अभिनेता तोच जो अत्यंत गंभीर

प्रसंगी आपले अभिनय कौशल्य दाखवीत रसिकांस मंत्रमुग्ध करून टाकतो. त्याउलट आम्ही. कधी खळाळणाऱ्या हसू आणणाऱ्या अभिनयानंतर कुणी म्हटलेय कुणाला.. वा! अभिनयसम्राट! तर तशा सम्राटपदासाठी वेदनाच हवी. अगदी साहित्यातही.. आयुष्यावर लिहू काही म्हणत गंभीर लिहिणारा किंवा जड तत्वज्ञानावर अतिगंभीर आणि भाष्य म्हणावे असे काही लिहिणारा तोच मोठा! निखळ हसवणारे काही लिहिणारा अभिजात साहित्यिकांत क्वचितच गणला जातो. कधी त्याने त्यातून जीवनावर भाष्यबिष्य केलेच तर त्याला मान मिळतो तो. म्हणजे परत घुमून फिरून गांभीर्य आलेच. उगाच विनोद म्हणूनही विनोदी साहित्यास कुणी श्रेष्ठ मानत नाही.. त्यास लोकप्रियता मिळेल ही पण मानमरातब आणि प्रतिष्ठा मिळणे नाही. आणि आमच्या लायनीत तर.. विनोदवीरांस तोंडी लावणे म्हणूनच वापरतात. नाही म्हणायला तसे निखळ विनोदपट असतात ही.. ते लोकाश्रयावर चालतातही पण श्रेष्ठ चित्रपटांत कुणी त्याची गणती करते का? थोडक्यात काय.. माझे जीवनगौरवाचेही भाषण कधी कुठेही व्हायची शक्यता नाहीच.. कारण तसा जीवनगौरव वगैरेच होणार नाही कधी!

मुद्राभिनय नि शारीरिक अभिनय.. वाचिक आणि कायिक अभिनय.. आवाजाची फेक आणि अचूक टायमिंग इत्यादीच्या जोरावर माझे नाव झाले.. विनोदी अभिनेता म्हणून. असे माझ्याबद्दल लिहिलेले वाचले आहे मी. आता त्यात मी घडलो कसा नि मी अभिनय शिकलो कसा नि कुठे नि कधी हे माझे मलाच ठाऊक नाही.. तर मी त्याबद्दल काय सांगणार? ह्या साऱ्या अभिनय पद्धती मला ऐकूनच माहिती. काही गंभीर अभिनेते या ॲक्टिंग पद्धतींवरही गंभीर भाष्य करतात.. त्यात विनोदी अभिनयावरही चिंतन असते. असेलही काही पद्धत.. पण असले मेथॉडिकल ॲक्टिंग कधी जमले नाही. तसला अभ्यास.. मनन नि चिंतन वगैरे जमायचेच असते तर कॉलेजातला अभ्यास पण नसता का जमला? तिथला माझा परीक्षेतला रेकॉर्ड म्हणजे फॉलोऑन करायला लागू नये इतपत स्कोअर आणि काय!

थोडक्यात मी कसा घडलो त्याची ही कहाणी! कर्म कहाणी म्हणालो असतो ही. काय आहे करूण कर्मकहाण्यांना वाचक वर्ग मिळतो.. तोही प्रेमाने. एखाद्या छान छान आणि साध्यासुध्या गोष्टीत कुणाला असणार इंटरेस्ट? पण जन्मभर हसवणूक करणाऱ्याने उगाच आपल्या कहाणीस असा कर्म कहाणीचा का बाज द्यावा? नाही म्हणजे सारे काही सुरळीत आणि सरळसोट नाहीच झाले आयुष्यभर. अगदी हसवण्याच्या धंद्यातही अडवणूक आणि रडवणूक झाली. त्यातून मी जन्मजात शहाणपणाने करून घेतली स्वतःची सोडवणूकही. तरीही स्ट्रगल म्हणतात ज्याला आजकाल.. तो कुणाला चुकलाय? पण त्याच स्ट्रगलमुळे आपली मुळे खोलवर रूजतात नि आपआपले झाड ताठ उभे राहते हेही नको लक्षात घ्यायला? स्ट्रगल नंतरच नंतरच्या यशाची किंमत कळते.. तेव्हा त्या उमेदीतल्या दिवसांतल्या उमेदवारीची खंत नाही मनात. आणि त्याचे तुणतुणे वाजवायची इच्छाही नाही आता. अर्थात त्या स्ट्रगलच्या दिवसांत उमेद टिकवणे सोपे नव्हते हे खरे. पण लागली नाव पैलतीरी!

राज कपूरचा 'मेरा नाम जोकर' पाहून सर्वांना खात्री आहे.. हसवणारे सारे अंतर्यामी दु:खी असतात. कधी तर वाटते की आतून दु:खाच्या कढीला ऊत आल्याशिवाय कुणाला हसवता येणारच नाही की काय? अंतरातील दर्दरूपी लाव्हा असा हास्यरूपात ज्वालामुखीच्या स्फोटासारखा इतरांच्या मुखातून बाहेर पडावा हा नियम आहे की काय? खरे सांगतो.. म्हणजे माझ्यावरून सांगतो.. इतकी वर्षे केली कॉमेडी त्यानंतर. म्हणजे उगाच आपले अंदाज बांधून सांगतोय असे नाही.. तर पर्वताएवढे दु:ख तर साऱ्यांच्याच वाटे येते.. ते आले माझ्या वाटचे माझ्या वाटेला. आपल्या वाटेने आले.. चार दोन हृदयद्रावक प्रसंग आले.. अश्रुपात झाला काही वेळेस.. आणि तरी मी हसविण्याचा वसा सोडला नाही! हे वसा न सोडण्याचे वाक्य माझ्या जीवनगौरव समारंभात म्हणता यावे असे! तर सांगायचा मुद्दा एवढाच.. कॉमेडीवाला बाकीच्या

लोकांहून काही जास्त दु:खी बि:खी नसतो.. फक्त तो बाकीच्या वेळी इतरांना हसवत असतो एवढेच. आपापल्या वाटेची वाटून दिलेली दु:खे आपापल्या मगदुराप्रमाणे मी देखील भोगली. पण रंगमंचावर नि पडद्यावर मात्र सदा हसवत राहिलो सर्वांना.

तर असले हसवण्याचे उघडून बसलो आहे दुकान. इतकी नाटके झाली. पुढे रूपेरी पडद्यावर आलो. हिंदी चित्रपटात कधी जायची संधी नाही तर नाही. तसा प्रयत्नही नाही केला. मोठमोठी नट मंडळी मॅनेजर नेमतात.. सारे काही तोच करत असतो मॅनेज.. म्हणूनच तर म्हणतात त्याला मॅनेजर! ते मोठे झाल्यावर त्यांचा मॅनेजर येतो की मॅनेजर आल्यावर हे मोठे होतात.. हे गणित काही मला नाही सुटले. तितके हिशेब आले असते तर आजवर काही तरी बक्षिसाच्या बाहुल्या दिसल्या नसत्या माझ्या शोकेस मध्ये. पारितोषिकांचे अप्रूप नाही असे नाही.. पण मिळत नाही म्हटल्यावर त्याची हौस नाही म्हणणे.. किंवा त्याहूनही चांगले म्हणजे.. प्रेक्षकांचे प्रेम हेच माझे बक्षिस म्हणणे चांगले नाही का? तसे ते अगदीच खोटे नाही. प्रेक्षकच आमचे मायबाप. तेच नसतील तर सारा पसारा मांडायचा तो कोणाच्या जिवावर? ते डोंबारी किंवा रस्त्यावर खेळ करणारे म्हणतात ना लोकांना.. मेहरबान.. कदरदान.. तेच खरे. मेहरबान प्रेक्षकांची मेहरबानी असल्याशिवाय कोण म्हणू शकेल.. माझा खेळ मांडू दे? आणि तो प्रेक्षक कदरदान असल्यानेच तर हुरूप येतो कलावंतांस.. तेव्हा प्रेक्षकांच्या टाळयांतून फुलतो कलाकारातला कलावंत. कुणी म्हणेल टाळयांसाठी काम करू नये.. कलाकाराने आपल्या स्वतःसाठी काम करावे! पण स्वतःतला स्व शोधून काढावा म्हटले तर त्याला लागतेच प्रेक्षकांची साथ. त्याच्या प्रतिसादातूनच फुलतो कलावंत. तेव्हा प्रेक्षक हा मायबाप हे खरेच. आणि माझ्यासारख्या विनोदी कलाकारास तर हशा आणि टाळयांच्या टॉनिकशिवाय दुसरे आणि काय हवे? थोडक्यात काय तर .. हेच.. मेहरबान कदरदान.. असेच प्रेम ठेवा.. हसा आणि हसत रहा.. दु:खाला कमी नाही आयुष्यात.. पण त्यास हास्याची किनार लावा.. त्यासाठी ह्या राजीवकुमाराचे

प्रयत्न. हसलात ना.. आणि हसताहात ना.. मग सारे प्रयत्न सफल माझे .. सार्थक म्हणावे असे झाले या नटाच्या कारकीर्दीचे. आता हे मनापासून.. हेच माझे बक्षिस. त्यासाठी हाती एखादी बक्षिसाची बाहुली नसेल ही.. पण तुमच्या चेहऱ्यावरच्या हास्य रेषा तर आहेत!

अगदी शाळेत असताना मी म्हणायचो.. परीक्षेत किती मार्क मिळतात यापेक्षा डोक्यात काय शिरते ते महत्वाचे. परीक्षा महत्वाची पण त्याहूनही शिकणे महत्त्वाचे. त्या भानगडीत कधी चांगले मार्क्स नाही मिळाले. परीक्षा आणि तिचे तंत्र कधी शिकलो असतो तर कदाचित पोहोचलो नसतो परीक्षेत शिखरावर? पण हा जन्मजात वेडेपणा. बायको म्हणते, राजमान्यता हवी आहेना.. मग हलवा की थोडे हातपाय. मी म्हणतो.. नाही.. हेच लोकांचे प्रेम मला पुरेसे. तीच माझी ट्रॉफी. आज माझ्याकडे आहेच खऱ्या ट्रॉफ्यांची वानवा.. पण तरीही मी आतून समाधानी आहे. कुणी म्हणेल कोल्ह्यास द्राक्षे आंबट! म्हणोत बापडे. कुणी अल्पसंतुष्ट म्हणेल मला. तसा मी आहेच. विचार करताना म्हणूनच वाटते नि पटते देखील.. मी 'कसा' घडलो यापेक्षा मी 'असा कसा' घडलो.. हेच शीर्षक योग्य आहे! फक्त या धंद्यात राहून मी असा जरूर घडलो पण बिघडलो नाही एवढे नक्की!

## *म्हातारा इतुका..*

एखादा दिवस कसा उगवतो सांगू ..

त्या दिवशी एक कवीमित्र भेटला. तसा चांगला आहे पण घरी गेलो त्याच्या तर कविता ऐकवल्याशिवाय काही सुटका नाही. फक्त मसाल्याचा चहा वहिनी मस्त बनवते म्हणून त्याच्या कविता सहन करत बसतो. तुम्हाला सांगतो, वय झाल्याचे बेट्याने फारच मनाला लावून घेतलेय. पांढरे केस काय नि तोंडाचे बोळके काय.. मला तरी या गोष्टी या वयात शोभून दिसतात असेच वाटत आले आहे. त्या दिवशी काय ऐकवावे त्याने? तर आपली रडकथा.. खरे तर रडकविता! गेलेल्या दिवसांचे काय कौतुक?

ती ऐकाच म्हणजे कळेल कसा उगाच रडत.असतो तो! गेले ते दिन म्हणे! त्याच्या शब्दाशब्दात विषाद भरलेला! वाचाच ती.. गेले ते दिन गेले म्हणे!

गेले ते दिन गेले !

डोक्यावरती होते छप्पर

केसांचे होते जंगल

काळे काळे गर्द रेशमी

जावळ करी असली दंगल

हाय उसासा असा सोडिशी

गेले दिन ते आता आणिक

झाले बोळके अन् दातांचे
गेले पाचू गेले माणिक

हवा बदलते थोडी जरतर
नाकही करते आता सुरसूर
दाब रूधिरा अन् रक्त शर्करा
खातो गोळ्या भरपूर भरपूर

अंगामध्ये होती रग अन्
लाथेने निघत होते पाणी
म्हणायची ती मजला आणि
तू राजा अन् मी राणी

झालो झाले असा सावली
आठवीत ते गेलेले दिन
तळमळ ऐसी मनात होई
जळाविना तडफड जणू मीन

फायदा एकच दिसतो मजला

तिकीटामध्ये मिळे कन्सेशन

जेष्ठ म्हणे कुणी सिटिझन सिनियर

नव्या दिनांचे शब्द कलेक्शन!

## काय पण रडगाणे!

तुम्हाला म्हणून सांगतो.. असे प्रसंग नेहमीच येत नाहीत.. पण त्यादिवशी आला. असे प्रसंग.. म्हणजे मी रस्त्यावर पाहिलेला प्रसंग नाही.. तर मीच रस्त्यावरून जाण्याचा प्रसंग. हल्ली फारसे बाहेर जाणे होत नाही.. तर रस्त्याने चाललो होतो. पुढे कसलासा गलका कानावर पडला. मी प्रत्यक्ष जाऊन पाहिले तर भांडण जोरात चालले होते..

कुणीतरी ओरडला भांडणात.. "अरे.. बूढा होगा तेरा बाप!"

हे ओरडून सांगताना बिचाऱ्याची कवळी सटकली. म्हाताराबाबानी ती झटकन बसवण्याचा प्रयत्न केला. ते करताना त्यांच्या थरथरत्या हातांना अजून कंप सुटला.. कपाळावर घाम सुटला. म्हातारबा सात्विक संतापाने तळपू लागले. हातातली काठी आपटत ते पुढे बोलू लागले पण तोंडातून शब्द फुटेनात. नुसतेच तोंड हलतेय.. हातवारे होताहेत.. पण म्युट केलेले टीव्ही वरचे दृश्य दिसावे तसे दिसायला लागले ते. मी अजून पुढे होऊन पाहिले.. कसले तरी भांडण सुरू होते. ते ही चक्क दोन वयोवृद्ध जणांत. कुणी जास्त म्हातारा तर कुणी कमी. म्हणजे जख्खड आणि वृद्ध यांच्यात असावा तसा फरक होता दोघांमध्ये. मी काठी टेकत पुढे झालो. माझी कवळी, खरे सांगतो, अगदी फिट बसते. उगाच ऐनवेळी खाली सरकून दगा देत नाही. फक्त डोळयांवरचा जाडजूड काचांचा चष्मा थोडा सैल आहे तो नीट पकडत म्हणालो, "काय हो उगाच भांडण? गोडीगुलाबीने रहावे.."

"तुम्ही कोण? मी काही सांगायला गेलो तर हे रामराव म्हणतात, वय झाले तुमचे.. तरी बरे.. यांच्याहून चांगला तीन वर्षे लहान आहे मी.. म्हणून म्हणालो.. बूढा होगा तेरा बाप.." हे बोलताना परत त्या सात्विक संतापाला उकळी फुटली!

"रामराव तुम्ही?"

मी त्या दुसऱ्या म्हातारबाकडे पाहात म्हणालो. खरेतर हे तीन वर्षे सीनियर असूनही फिट वाटत होते. "नमस्कार! आणि तुम्ही कोण?" रामराव मला म्हणाले.

ते दुसरे.. नाव माहिती नाही.. शामराव म्हणू.. तर शामराव अजूनही थरथर कापत होते. उगाच काही बोलायला जावे आणि फट म्हणता ब्रह्महत्या व्हावी.. असे काही होऊ नये म्हणून त्या शामरावांना फक्त म्हणालो, "असू देत.. एवढा संताप बरा नव्हे!"

पुढे मी 'या वयात' म्हणणार होतो. नशीब नाही म्हणालो. नाहीतर शामरावांची जवानीची असते तशी 'बुढापे की आग' चेतवली गेली असती.. आगीत पामोलिन पडले असते! मी मग माझ्या काठीस आपटत उभा राहिलो. चष्मा घट्ट पकडत म्हणालो, "उगाच रागावलात तर ब्लडप्रेशर वाढेल.."

याचा अनुभव बराच होता मला. मागच्याच महिन्यातली गोष्ट. आमचा डॉक्टर म्हणाला मला, 'ऐंशीवे वरीस धोक्याचं' म्हणून. बीपी अजून वाढतेय म्हणे! मग अजून एक गोळी त्या बीपीवर रोज नेम धरून सोडावी लागते. त्याआधीच्या शुगर आणि किडनीच्या गोळयांत ही भर! आधीच बीपी जास्त असायचे, त्यात अजून जास्त! तरी मी दम्याची औषधे मोजत नाही नाहीतर दर दिवशी गोळयांचा रौप्यमहोत्सव साजरा करावा लागतो म्हणालो असतो. त्या वाढलेल्या बीपीची आठवण आली मला, आणि म्हणालो, "जास्त रागावलात तर बीपी शूट होईल!"

माझेही तेच झालेले..

म्हणजे माझ्या पोराने त्यादिवशी काय बोलावे? म्हणे "अप्पा.. जरा कमी मारा गप्पा.. जरा वयाचे ठेवा भान!"

खरे सांगतो.. तळपायाची आग गेली वर डोक्यात. मी पण म्हणणार होतो, बूढा होगा तेरा बाप! मनात असूनही नाही म्हणू शकलो हे स्वतःच्या पोरास! वयाचे ठेवा भान म्हणे.. अरे तुम्ही ठेवा आमच्या वयाचा मान! पण काही असो बीपी मात्र शूट झाले त्यामुळे. त्या गोष्टीची आठवण होऊन मी म्हणालो, "शामराव.. बीपी बहुत खतरनाक बरे!"

त्याबरोबर ते शामराव कडाडले, "असेल.. ते त्याच्या घरी! असले छप्पन आजार कोळून प्यायलो मी.. बीपी म्हणे.. त्याला फाट्यावर हाणेन मी.. आणि शामराव कोण? शामराव होगा तुम्हारा बाप!"

काय गंमत पहा ना, ते शामराव म्हणून नामकरण मी मनातल्या मनात केलेले.. तेच खरे वाटू लागलेले मला!

"मी शामराव नाही.. मी देखील रामराव!"

म्हणजे हे दोघेही रामरावच निघाले. आजकाल कित्येक हृतिक दिसतात तसे आमच्या लहानपणी कुणी रामराव बऱ्यापैकी प्रसिद्ध असावेत. आता पंचाईत झाली. कुठल्या रामरावास बोलावे.. सांगावे नि कुणी ते कोणासाठी उद्देशून बोलले हे कसे समजावे? दोघेही रामराव म्हणे! पण खरी गंमत तर यातच होती की माझेही नाव रामरावच! चव्हाण मी. हे दोघे आडनावाने कोण कोणास ठाऊक! म्हणजे इकडे एक रामराव त्रिकुटाचे संमेलन भरलेले म्हणावे! काही असो. मी गोंधळलो. कुठल्या रामरावास उद्देशून बोललो हे कसे कळावे? बोलावे एकास आणि 'लेका बोले जावयास लागे' न्यायाने टोचावे दुसऱ्या कुणास! त्यात त्याने ते फारच मनास लावून घेतले तर आणखी कठीण काम! डॉक्टर म्हणाले ते खरेच.. ऐंशीवे वरीस धोक्याचेच! कुठे कुणाची शुगर तर कुणाचे बीपी शूट व्हायचे.. माझ्या ओळखीच्या एका सत्तरीतल्या तरूण वृद्धाची अशीच एक

मेंदूतली नस भांडभांड भांडण करताना ताडकन फुटलेली पाहिलेली मी डोळयांसमोर. तर एकास हार्ट्यार्ट्याक आलेला बोलता बोलता.. म्हणजे भांडता भांडता. एवढे सारे आठवले मला नि मी त्या रामरावांना रामराम न करताच निघालो पुढे. बघतील दोघे काय ते. मी निघालो पण त्यातून झाले इतकेच.. की काय आणावयास घरून निघालेलो तेच विसरलो. त्यातून झाले इतकेच की सूनबाई म्हणाली घरी गेल्यावर, "अप्पा, इतके कसे झालात विसराळू?"

आजकाल असे होते. कित्येक वर्षांपूर्वीच्या स्मृती ताज्या आहेत पण काही क्षणांपूर्वीचे स्मरत नाही. त्यासाठी मी घरात एक बोर्डच बनवून घेतलाय. रोजचे एकेक काम आटोपले की मारायची फुली. म्हणजे दात घासले.. मारा फुली. सकाळचे औषध घेतले.. चहा पिऊन झाला.. अंघोळ उरकली.. दुपारचे जेवण झाले.. वामकुक्षी.. अशी सगळी हेडिंग्ज बनवलीत मी. रोज उठून त्या त्या तारखेस मारत असतो फुल्या. फक्त कधी त्या फुल्या मारायच्याच राहतात. म्हणजे तेच  विसरतो! एकदा त्यामुळे एके दिवशी दुपारी मी दोन वेळा जेवलो! हे अर्थात मला नाही समजले पण माझ्या सुनेने सांगितले तेव्हा कळले.

थोडक्यात हे असे आहे! म्हातारा इतुका झालो तर हे व्हायचेच! पण 'म्हातारा इतुका न..' कुणी तरी कधी तरी गाताना ऐकलेले मी.. 'अवघे पाऊणशे वयमान' म्हणे! तसा मी ही सहस्त्रचंद्र दर्शन झालेला. तेव्हा अधिकाराने.. म्हणजे सगळयाच.. वय अनुभव इत्यादिंच्या.. हे सांगतोय. सांगतो म्हणजे काय.. लिहितो आहे. थरथरत्या हातांनी लिहायची गंमत तुम्हा तरूणांच्या ध्यानात नाही यायची. काय आहे, भले हात तुमचे कापत नसतील पण सांगण्यासारखे आमच्या पोतडीत जसे आणि जेवढे आहे तसे तुमच्याकडे आहे का? आठ दशकातील बदलांचे आम्ही साक्षीदार. तरीही सांगायचे आहे ते फक्त या ज्येष्ठत्वाबद्दल. म्हणजे आमच्या लहानपणी असे होते.. तसे होते.. किंवा आज सारे किती बिघडत चाललेय वगैरे राहू द्यात बाजूला. काळ

कुणासाठी थांबत नाही आणि बदल कुठे झाल्यावाचून राहात नाहीत. बदल आणि बदल.. हाच स्थायीभाव आहे म्हणतात. काय गंमत आहे पहा ना.. भाषा बदलाची आणि गोष्ट स्थायीभावाची! मी लहान होतो तेव्हा कुण्या ऐंशीवर्षीयास तेव्हाचा काळ ही किती बिघडलाय असे वाटले असते! कुणी त्यादिवशी म्हणाले, टाइम्स आर चेंजिंग फास्ट! म्हणजे काय? आता चोवीस तासांत एकाऐवजी दोन दिवस संपतात की काय? उगाच काहीतरी! बदल घडतच असतो. नाहीतर आजही माणूस वल्कले घालून शिकार नसता का करत? कल्पना करा.. एक पुरातन कालीन माणूस आहे.. त्याचे सारे आयुष्य अशाच शिकारी शोधण्यात नि गुहेतून राहण्यात गेलेय.. काळ बदललाय.. त्या माणसाची पुढची पिढी.. गुहा सोडून घर बांधून त्यात रहायला आलीय.. आजूबाजूला शेते पिकवून त्यातले धान्य घरात शिजवून खातायत.. शिकार कधीकधीच करताहेत त्याची मुले बाळे.. आता त्यातला तो आजोबा आपले जंगलातले रमणीय दिवस आठवत बसलाय.. आपल्या वल्कलांचे कौतुक सांगतोय.. गुहेतले दिवस आठवतोय किंवा शिकारीच्या रोमांचक आठवणी रवंथ करत बसलाय! आणि म्हातारबाबाचे कुणी ऐकेना झाले की लिहितोय.. 'दिवस असे होते' 'गुहेतले दिवस' 'काळया काळवीटाची शिकार आणि मी' किंवा 'माझी वल्कले' .. त्याकाळी असे लिहायची पद्धत नव्हती.. म्हणजे नसावी.. नाहीतर त्याने पण तेव्हाच्या बिघडत्या दिवसांबद्दल तक्रारच केली असती. थोडक्यात काय तर दिवस बदलतात.. बदलत राहतात.. अगदी आदि काळापासून.. हे चक्र काही थांबत नाही. आणि थांबणार नाही. उगाच तक्रारी करत का फिरावे? तर सांगायचा मुद्दा.. नो कम्प्लेंट्स.. फक्त सांगायचेय.. जे येईल मनात ते!

तसे सांगायचे ते काय काय?

उगाच बोलत रहावे.. कुणी त्याला म्हातारचळ म्हणेल.. तरीही बोलत रहावे.. मग कशाला कशाचा संदर्भ असो की नसो. ऐकून घ्यायला कुणी नाही.. कोणाला वेळ आहे सांगा. या गतिमान सशांच्या जगात आमच्यासारखे कूर्मगती.. कासवाचे काय काम? आणि काय आहे की..

कवळ्या बाहेर काढल्या की बोळके होते तोंडाचे. मग बोललो काय तेच कळत नाही कुणास. कधीकधी कळलेच कुणास तर ऐकायला वेळ आहे कुणास इथे. आणि ऐकायला वेळ असला तरी ते ऐकण्यात रस कोणाला आहे इकडे? त्यातल्यात्यात नातू आणि नात अंगाखांद्यावर खेळतात नि ऐकतात गोष्टी लहर आली तर. त्यांना हसताना पाहिले की पोट भरते हे खरे. देवाघरून नुकत्याच आलेल्या त्या फुलांना या पैलतीरी नयन लागलेल्याशी दोस्ती करावीशी वाटावी याहून या वयातले सुख ते काय?

पण खरे सांगतो.. या वयाचे दिसायला खूपच तोटे दिसतात पाहणाऱ्यास. लहानपणी कुणालाच लहान राहायचे नसते. आणि वय उलटल्यावर ते उलटल्याचे इतरांना कळू द्यायचे नसते! सर्वांना हवे असते ते लाथ मारून पाणी काढता येईल असे तारूण्य! मग हे वार्धक्य म्हणजे कारुण्य वाटायला लागते! पण सारे काही आपापल्या चष्म्यावर अवलंबून आहे. खरेतर नाण्याची दुसरी बाजू पाहिलीच पाहिजे. पण ती मीच दाखवावयास हवी! म्हणजे तुम्हाला सांगितले नाही तर कळणारही नाही. या वयाचे तसे फायदे आहेत. म्हणजे बघा की.. सगळयांना दात घासावे लागतात.. माझ्याकडे सोय अशी की मी ते काढून घासू शकतो! नि परत लावू शकतो. आहे तुम्हाला अशी सोय? परत त्या कवळया काढल्या की त्या तोंडाच्या बोळक्याचे वेगवेगळे आकार करून नातवंडांना हसवता येते हा अजून एक फायदा! हातातल्या काठीने चालण्यात एक रूबाबदारपणा येतो. मी तर मूड प्रमाणे वापरण्यासाठी वेगवेगळ्या मुठी आणि डिझाईनच्या काठ्या ठेवल्या आहेत जवळ! हाती काठी घेऊन गेलो की कुत्र्याला हाकलवायला ती उपयोगी पडते हा अधिकचा फायदा! अशी सोय सामान्यांना नाही. वार्धक्यातील विस्मरण हा वेगळाच विषय. त्याचे फायदे कुणाला सांगूनही नाही कळणार. उगाच काहीबाही आठवण्यापेक्षा विस्मृतीचे वरदान मिळालेय मला. उगाच अमक्याने ढमके का केले किंवा ढमक्याने अमके यावर रात्रंदिवस विचार नको! मुदलात अमके नि ढमकेच विस्मरणाच्या पिंजऱ्यात बंद असतील तर पुढचा प्रश्नच येतो कुठे? या वयातले कवळी - काठी सोडून बाकीही अलंकार आहेत. झालेच तर हा जाडजूड चष्मा आहे.

कानात कायमच्या वस्तीला आलेली श्रवणयंत्रे आहेत.. अडचणीच्यावेळी ऐकून न ऐकल्याची सोय तुम्हा तरूणांना नाही.. किंवा बघून न बघितल्यासारखे करण्याचीही नाही. हे कमी की काय.. छातीच्या पोकळीत एक पेसमेकरची डबी देखील आहे! झालेच तर जातायेता.. म्हणजे कुठे गेलोच तर.. ज्येष्ठ नागरिक म्हणून मिरवण्याची सोय आहे! दिसायला दिसू देत थोडा खप्पड चेहरा.. आयुष्याच्या एकेक थपडा खात पडलेल्या एकेक सुरकुत्या.. चेहरा बावळा म्हणावा असा. पण हवे तेव्हा बावळा चेहरा.. अंतरी नाना कळा बाळगत.. करण्याची सोय या वयाने कशी करून दिलीय हे जावे त्यांच्या वंशा तेव्हाच कळेल कुणाला. सांगायचे ते हेच मला!

तुम्हाला हे सारे वाचून वाटेलच, नाही कळत बुवा या आजोबांना काय म्हणायचेय नक्की ते. कशाला कशाचा ताळमेळ नाही.. अहो, आमची ही गेली देवाघरी पुढे.. त्यानंतर ताळमेळीचा नि माझा संबंध सुटला. ही गेली नि एकाएकी मी वयाची दहा वर्षे एका दिवसात पार केली. हिला जाऊनही आता काही वर्षे उलटली. पोरगा आहे, सून आहे. नातवंडे आहेत. सारे त्यांच्या त्यांच्या जागी चांगलेच आहेत. पण ठिकाणा माझाच नाही. 'वृद्धत्वी निज शैशवास' एखाद्या कवीने जरूर जपावे पण माझ्यासारख्यास ती सोय किंवा चैन शक्य नाही.. आणि परवडतही नाही ते. उगाच वयाचे भान ठेवण्याच्या सूचना मिळत राहतात. त्यात काही बोलताना उगाच डोळे भरून येतात. त्या रडण्याला 'वेड्यांचा कारभार' म्हणताना ऐकलेय मी. त्यात चूक कोणाची नाही. एकेक वयाचा महिमा.. आणि काय! घरात सारे आपापल्या कामात मग्न. त्यांचे योग्यच आहे. त्यांना जबाबदाऱ्या आहेत पार पाडावयास. माझ्या अंगावर जबाबदारी म्हणाल तर एकच.. स्वतःची कामे स्वतः उरकून घेणे.. तेही कोणाच्या मध्ये मध्ये न येता. यात मग कुणास बोलत बसायला सवड कोठून मिळणार? मग म्हटले आता लिहित बसावे. हात कापले तरी अजून काम देतात. असावा या वयात तितका मेंदू तल्लख आहे अजून. पण या वयात असावा तितकाच! त्यामुळे लिहितोय खरा पण त्यामुळे यातील काही कळत नसेल तर दोष त्या वयाचा आहे. हा ही

वयाचा एक फायदा.. म्हणजे गंमत बघा.. हवे तेव्हा हे वय असे वापरून घेता येते. आपल्या सोयीसाठी! वयाच्या आड लपण्याची सोय म्हणा! म्हटले ना या वयाचे हे फायदे आहेत.. कुणाला कळणार देखील नाहीत सांगितले नाहीत तर.

कुणी म्हणेल.. वय झाले.. आता उरलात उपकारापुरता! खरे सांगू तर कुणाच्या उपयोगी पडण्याची नाही तरी स्वतःवर अवलंबून रहाण्याइतपत क्षमता शाबूत रहावी या वयात.. हेच त्या भगवंताचे उपकार म्हणावेत. आणि तो दयाळू दयाघन माझ्याबाबतीत अजून तरी ते दयेचे दान द्यायला विसरलेला नाही! स्वतःचे काम स्वतः करता यावे.. दुसऱ्या कुणास करावे लागू नये.. इतपत उपकार करण्याच्या अवस्थेत त्याने अजूनतरी ठेवलेय हेच भाग्य!

तर मूळ मुद्द्याकडे येऊ.. उगाच कुणी गात असेल.. 'म्हातारा इतुका न अवघे पाऊणशे वयमान'.. तर मी म्हणतो छट.. 'म्हातारा मी इतुका.. आहेच पाऊणशे वयमान!' उगाच वय कशास लपवा? होय.. आहे आता वयाच्या नवव्या दशकात! आहेत थोडेफार वयाचे फायदे ते करू देत एंजॉय. बाकी आहेच आता पैलतीर वाट पाहात! जोवर बोलावणे येत नाही तोवर मी आहे इथे मिटक्या मारत जसे आहे तसे आयुष्य जगणार आहे!

### *दंत पुराण :*

प्रथम आणि अंतिम अध्याय

आम्ही लहान असताना आमच्या मातोश्री आम्हास सुनवीत.. दात काढू नकोस उगीच.. त्यामुळे आम्ही दात काढणे बंद केले. पण दात न काढावेत तर करावे काय? काही असो. ते दिवस निघून गेले. पण मग असे दात न काढताच आम्ही मोठे झालो आणि आजूबाजूचा धांडोळा घेतला तेव्हा हे लक्षात आले की मनुष्यजात ही - लहानपणापासून दात न काढल्याने की काय - पण दंत समस्यांनी चहूबाजूंनी वेढलेली आहे.

आमच्या विचक्षण नजरेस हे लक्षात आले की दात दुखी या जगात कुणाला चुकली आहे? साधुसंत सांगून गेले.. आमचे श्री श्री समर्थ स्वामी पण सांगतात.. या जगी दु:ख हेच एक शाश्वत.. तर दु:ख कुणाला चुकले आहे? कबिराने पण एका ठिकाणी म्हटले आहे.. काय ते आठवत नाही.. पण नक्कीच असे म्हटले असणार. सगळीच मोठी माणसे हे म्हणत असणार.. प्रत्यक्ष राम आणि कृष्णास दु:ख चुकले नाही ते सामान्य मनुष्यास टाळता येईल? अर्थात दु:ख हा आपला करंट विषय नाही.. दात आणि त्याच्या दुखण्याने बसणारे करंट हा आहे! तर दंत समस्या राम कृष्णास होत्या का याचा प्रत्यक्ष उल्लेख त्या महाकाव्यांत नसेलही पण त्या नव्हत्या असेही सिद्ध करता येणार नाही! ( कुण्या होतकरूस पीएचडी साठी प्रबंध विषय: रामायण महाभारतातील दंत समस्या.. कल्पना करा.. दंडकारण्यात अचानक सीतेची दाढ ठणकते.. सीता म्हणतेय.. त्या कांचनमृगाच्या शिंगास उगाळून लेप लावा नाथा माझ्या दुखऱ्या दाढेवर. राम आणि लक्ष्मण त्या मृगाची मृगया करायला निघालेत.. त्यावरून खरे घडले ते रामायण! त्या सोनेरी मृगाजिनाच्या

चोळीपेक्षा हे जास्त तार्किक म्हणजे लॉजिकल वाटत नाही का? महाभारतातही असे दंतद्रावक प्रसंग नसतीलच असे नाही. संशोधन केल्यास सापडतील.. प्रश्न पीएचडीचा आहे!)

तर ज्याचा आयुष्यात कधी दात दुखला नाही असा मनुष्य विरळा. अगदी विरळा शब्दाचा वापर जितका विरळा आहे आजकाल तितका विरळा! तेव्हा मनुष्यप्राण्यास हैराण, परेशान नि बेजार करणाऱ्या नि वेळीअवेळी आपले दात दाखवणाऱ्या दंत समस्या नि त्यावर उपाय योजणारे दंतज्ञ यांचा धांडोळा घेण्याचे आम्ही ठरवले. वरील धांडोळा हा शब्द आम्ही विविध पाहणी अहवालांच्या वाचनातून शिकलो आहोत! त्यामुळे दोनदा वापरून हलवून खुंटा बळकट करावा तसा आमच्या मस्तिष्कात अर्थात मेंदूत बसवून घेत आहोत. पुढे उपयोगी पडेलच. कारण आमच्या सारख्या संशोधकास असे शब्द लागतातच.

पाहणी करणे एकदा ठरले नि आम्ही कामास लागलो. कठोर परिश्रमास पर्याय नाही हे आम्ही खूप पूर्वीच बिंबवलेले आमच्या मनावर. त्यामुळे कठोर मेहनत घेऊन आम्ही ही पाहणी केली आहे विविध दंतज्ञांची. हा त्याचा पाहणी अहवाल म्हणावयास हरकत नाही. अहवाल म्हटले म्हणून दचकण्याची गरज नाही.. कारण हा सरकारी अहवाल नाही. त्यामुळे वाचावयास हरकत नसावी! त्याची भाषा समजावयास हरकत नसावी आणि सरकारी नसल्याने त्यावरील निष्कर्षांवर विश्वास ठेवावयास ही हरकत नसावी!

सर्वप्रथम आमच्या नजरेस (तीच.. विचक्षण) हे दिसून आले की माणूस आणि प्राणी यांच्यात मूलभूत फरक कुठला असेल तर तो आहे दातांत! म्हणजे दातांच्या किडण्यात! म्हणजे

कित्येक प्राण्यांना म्हणजे कीडा, मुंगी, झुरळे यांना मुदलातच दात नाहीत. त्यामुळे दंतरोग नाहीत. आणि बाकी कित्येक दातवाले प्राणी आहेत ते कधी आपल्या दंतवैद्यांकडे आल्याचे ऐकिवात नाही! म्हणजे सकाळसकाळी एखादी मिसेस सिंह फोन करून अपॉइंटमेंट घेतेय.. 'हॅलो.. डॉ. दातवाला.. यस्स.. आय नीड ॲन अपॉइंटमेंट फॉर मि. सिंह.. त्याचा किनाही दात रात्रीपासून दुखतोय खूप.. हरीणाचे शिंग खाऊ नका सांगितलेले मी पण ऐकणार नाहीत ते.. हो.. पाठवते.. शिकार सध्या मीच करतेय.. आणि मऊ मांस फक्त देतेय त्यांना.. पाठवते अकरावाजता..' असे कधी घडलेले.. अगदी ऐकावे ते नवलच मध्येही कुणी वाचले नसेल! कुण्या गाई.. म्हशी.. घोडा नाहीतर अगदी जिराफाचे दात गवताच्या काड्या अडकून किडलेले ऐकले आहेत?

तर माणूस आणि इतर प्राणी यांच्यात व्यवच्छेदक फरक कुठला असेल तर दंतरोग अशा निष्कर्षाप्रत आम्ही अभ्यासाअंती आलो आहोत! अर्थात आमचा अभ्यास इतक्यावरच सीमित नव्हता खरेतर! तर प्राण्यांच्या दंत समस्येबद्दल आम्ही प्रत्यक्ष मिस्टर आणि मिसेस वाघ यांनाही भेटण्याचा घाट घातलेला. पण अपॉइंटमेंटच्या वेळी मिस्टर वाघांची डरकाळी ऐकून आणि त्यांच्या उघड्या जबड्यातले अणकुचीदार दात पाहून आमचीच दातखीळ बसली! खोटे का बोला? त्यानंतर आम्ही तो प्राणीमात्रांतील दंत समस्यांचा नाद सोडला आणि स्वजातीय दंत संशोधन सुरू केले. (जाता जाता.. कुण्या होतकरूस.. परत एक पीएचडीचा विषय पुरवल्याचे समाधान.. 'प्राणी प्रजातीतील दंत समस्या.. एक विचार, आचार, प्रचार आणि उपचार' .. या 'चार' शब्दांचा एकमेकांशी आणि मूळ विषयाशी संबंध नसेलही पण कित्येक पीएचडीच्या विषयांचाही आपल्या आयुष्याशी वा जगण्याशी संबंध कुठे असतो?)

तर प्राणीशास्त्र सोडून आम्ही मनुष्यजातीकडे वळालो. दंतज्ञांचे दरवाजे खटखटवण्याचे ठरवले. सर्वप्रथम दरवाजा ठोठावण्याआधी आम्ही आजूबाजूला पाहून घेतो. ही

आमची..  म्हणजे आमच्यातल्या एका.. मुरलेल्या संशोधकाची सवय. बारकाईने पाहाणे. मग ती गोष्ट कुठलीही असो. निरखून पाहाणे. आम्हाला ही सवय तशी आमच्या कॉलेज कट्ट्यावर लागली. पण तिचा इथे असा उपयोग करून घेत आहोत आम्ही. कुठे बत्तीस मोती नावाची पाटी होती तर कुठे परफेक्ट हास्य नावाची! कुणी म्हणे आय स्माईल.. कुणी ई- स्माईल! पुणेरी पाट्या प्रसिद्ध आहेत तशा या देखील व्हायला हरकत नाही!

तर ठरवल्याप्रमाणे एका दातकेंद्रात पोहोचलो आम्ही. हे दातकेंद्र अगदीच आलिशान नव्हते पण गेलीशान ही नव्हते. दंतज्ञ येणे बाकी होते. काही दंतरूग्ण जीव मुठीत घ्यावा तसे जबडा मुठीत घेऊन बसले होते. कुणाच्या गालावर सूज होती तर कुणाच्या गाली लाली.. दाढदुखीने आलेली. आतल्या रूममध्ये खुर्ची मात्र आलिशान होती. गुबगुबीत गादी. मान टेकवायला वेगळी जागा. हवी तशी वरखाली खुर्ची करण्याची सोय. बाजूला पिण्याच्या पाण्याची सोय. समोर येणारा ट्रे. कुणी ठरवले त्या खुर्चीवर रहायचे तर जेवणखाण.. जलपान.. आणि निद्रा.. साऱ्या सुखसोयींनी युक्त अशी ती खुर्ची.. ऐसपैस पाय पसरून झोपण्यासाठी. अर्थात अशा स्पेशल खुर्चीचा मान दंतज्ञाखेरीज फक्त नाभिकास. ती एक वेगळीच खुर्ची. पण खुर्ची हा काही आपला विषय नाही.. तेव्हा तो 'किस्सा कुर्सी का' वेगळा!

आमच्या या पाहणीत आम्हाला कितीतरी प्रकारचे दंतज्ञ आणि त्याहूनही जास्त प्रकारचे दंतरूग्ण भेटले.

दाताच्या नि टूथपेस्टच्या जाहिराती पाहून आमच्या मनात एक दात तज्ञांची प्रतिमा तयार झाली होती. म्हणजे बहुतेक सारे दंतज्ञ टूथपेस्ट नि ब्रश विकत असावेत अगदी ॲप्रन वगैरे घालून. पण आमच्या पाहणीत असा एकही दंतज्ञ नाही निघाला. म्हणजे बहुतेक सारे किंवा साऱ्या बिना ॲप्रनच्या. आणि कुणीच ना पेस्ट विकतोय ना ब्रश. नाही म्हणायला एक दंतज्ञा भेटल्या.

मिस चांदीवाला. त्या ब्रश कसा धरावा नि सुपर सॉफ्ट ब्रश का वापरावा हे त्यांच्या सुपर सॉफ्ट आवाजात समजावून सांगत होत्या. आम्ही ते मन लावून आणि बारकाईने (मिस चांदीवालीकडे) पाहात ऐकले. बारकाईने पाहण्याची आमची सवय हे आम्ही सांगितलेच आहे ना आधी. एका माणसास बत्तीस दात. त्यातील एकाच्या जरी असंतोषाचा उद्रेक झाला तरी तो माणसास स्वस्थ कसला बसू देतोय? त्यामुळे बहुतेक दंतज्ञांकडे आपल्या दंतोद्धाराची वाट पाहणाऱ्यांची रांग होती. बहुतेक दंतज्ञ ड्रिल करण्यात बिझी होते. रस्ते खणणे नि परत भरणे हा जसा म्युनिसिपालिटीवाल्यांचा आवडता उद्योग तसाच दंतज्ञांचा ही असावा. कारण बहुतेकांच्या रूममधून हा ड्रिलिंगचा आवाज येत होता. दातात खड्डे खणून ते सिमेंटने भरले जात होते! आणि जो कुणी येईल त्यास त्या डॉक्टरकडे पाहात आ वासणे भाग पडत होते. अर्थात एकूणच आ वासण्याहून दुसरा पर्याय नसतो कुणा रूग्णास. अडला पेशंट डेंटिस्टापुढे आ करी आणि काय! तर असे खड्डे खणत नि बुजवत असणारे दंतज्ञ आणि त्यांच्यापुढे आ वासून बसलेले रूग्ण.. आ.. ऊ.. आई.. आई गं वगैरे विव्हळणारे. त्यात लहान मूल असेल तर त्याच्या हातापाया प(क)डणारे त्याचे आईबाप. आणि त्यात आपला कार्यभाग साधणारे डॉक्टर.

रूग्णांचेही कित्येक प्रकार पाहिले. लहान मुलामुलींतही किती व्हरायटी. किडलेल्या दातांची बालके आणि पडले तरी परत येतील अशा बेफिकिरीत त्यांची पालके.. नव्हे पालक! या उलट अगदी लहानपणापासूनच दातांना शिस्त लावून लायनीत कवायत करत उभे रहायला लावण्यास उत्सुक असलेलेही काही मॉम डॅड. आपल्या मुलामुलीची फेस व्हॅल्यू वाढवण्यासाठी दातांना तारांचे कुंपण घालायला तयार. पण बहुतांशी अडले नारायण. 'दातदुखीसे परेसान.. इधर है समाधान' म्हणून आलेले. मोठ्यांच्या पण नाना तऱ्हा. दुखरे दात उपटण्याला घाबरणारे कित्येक. त्यात एक आला.. नुकतीच दिवाळी झालेली.. म्हणाला.. 'दोन दात हलताहेत.. पहिला हिने केलेले शंकरपाळे खाताना हलायला लागला.. आणि दुसरा.. तिला ते सांगायला गेलो तर..'

एका कॉस्मेटिक डेंटिस्टकडे एक मध्यमवयीन पण तरूण (म्हं. स्वतःस तसे समजणाऱ्या!) अशा बाई आल्या.. 'तुमच्या इकडे कुंदकळयांसारखे दात करून मिळतील का हो..' विचारत. कुणी 'एका दातावर एक फ्री काढून मिळेल का?' विचारत आलेला. एक राजकीय नेता तर त्याच्या विरोधकांचे 'दात घशात घालून हवे' म्हणून आलेला! कुणी 'दात की सफाई' करून घ्यायची म्हणून हाथ की सफाई म्हणून नाव असलेल्या एका डॉक्टरकडे आलेला.. तर कुणी बसलेली दातखीळ सोडवून घ्यायला! एकाच्या दंतोजीचे ठाणे उठलेले.. त्यांचे बस्तान परत बसवायला आलेला. एकाने तर त्या दंतज्ञासच सांगितले.. 'दात काढायचे एवढे पयशे? काहून.. मारा येक हातोडी.. आन तोडून टाका!' त्यावर त्या डॉक्टरनी काय सांगितले ठाऊक नाही पण हातोडी ऐवजी बुक्क्यांनी दात तोडण्याची हातोटी असणारा कुणी त्या रूग्णास अधिक स्वस्त पडला नसता का? उगाच हातोडीचाही खर्च कशाला? एक दंतदुखीने ग्रस्त आणि त्रस्त आपल्या सुजलेल्या दाढीवर हात ठेवत म्हणाला, 'ठणकतोय दात.. जावंच लागंल दाताड्याकडे!' दाताड्या म्हणजे दंतज्ञ! आपली मराठी भाषा अशी कमीतकमी शब्दात जास्तीतजास्त पाणउतारा करण्यासाठी उपयुक्त असावी. तर असे अनेक दाताडे पाहिले.. काही बाताडे तर काही कमी बोलणारे पाहिले. खुर्चीमागे उभा राहिला की नाभिकास कंठ फुटतो म्हणतात. इकडची बातमी तिकडे .. ये वदनीचे त्या कर्णी म्हणजे.. कर्णोपकर्णी केली जाते. तसा काही बाताड्या दंतज्ञांना फुटतो. अर्थात ते असली  बातमीदारी करीत नाहीत! त्यातले एक दंतज्ञ साहित्यिक होते.. एका रूग्णास सांगताना ऐकले मी, 'तुम्ही असे करा.. दाखवायचे दात वेगळे आणि खायचे वेगळे करून घ्या!' त्यांच्याच खुर्चीत एक समीक्षक बसलेले म्हणे एकदा. समीक्षक जातीचे लोक काय.. कधी काठी हाणतील तर कधी कासेची लंगोटी (स्वतःच्या) बाकी राहिल इतकी स्तुती करतील! तर हे समीक्षक रूग्ण बिचारे जबडा दाखवत आ वासून बसले त्या खुर्चीवर. तर या साहित्यिक अंग असलेल्या डॉक्टरने अचूक निदान केले.. म्हणाले, 'एखाद्याची तोंड फाटेस्तोवर स्तुती केलीत.. तर असेच होणार!' थोडक्यात बत्तिशीची चौसष्टी होणार! दुसऱ्या अशाच साहित्यिक अंगाने दात काढणाऱ्या दंतज्ञाची म्हणे 'दात उपटताना' .. आणि 'उपटलेल्या दातांच्या दंतकथा' असली

ग्रंथसंपदा प्रसिद्ध आहे. असेल नाहीतर काय! लोक काय.. अमेरिकावारी करून आले की लिहितात 'पश्चिमरंग' नाहीतर 'ट्रंपच्या देशात'.. असे काहीबाही. कुणी पूर्वेस जाऊन लिहितो.. 'जा जरा पूर्वेकडे!' चिनी देशातून 'चिनीमाती' यायलाच पाहिजे! कुणी बाली देशात जाऊन आला तर वाचक बालीदर्शनाच्या वर्णनास बळी पडतो.. तर कुणी सिंगापूरास जाऊन आला की तिकडील वर्णनास पूर येतो. थोडक्यात काय अगदी दिसामाजी नाही तरी काही तरी लिहित जावे हे सगळेच पाळत असतात इकडे. तर असंख्य मुखदर्शन.. शब्दशः अंतर्बाह्य .. करणाऱ्या दंतज्ञाने का लिहू नयेत काही दंतकथा? कुणाच्या तोंडात डोकावणारे मनुष्याच्या अंतरंगातही डोकावून त्याबद्दल लिहिणारच की नाही? त्यामुळे आमच्या पाहणीत असे साहित्यिक दिसले.. कुणी 'पडक्या दाताचे रहस्य' अशी रहस्यकथा लिहिलीय तर कुणी.. 'अडकलो तुझिया दाती' अशी प्रेमकथा. एका दंतज्ञाने तर 'आलो दाती तृण धरूनी शरण.. अता नच येई मजला मरण' असे काव्यच म्हणून दाखवले आम्हाला! उपटलेल्या दातांच्या नवरस दंतकथा लिहिणाऱ्या दंतज्ञाने आम्हाला त्याचे कथानकही कथन केले.. स्थलकाल संकोचास्तव ते पूर्ण सांगत नाही पण त्यातील एका भयकथेने आमची दातखीळ बसली तर एका हास्यकथेने आमची कवळी बाहेर येता येता राहिली. त्यातील एक कथा तर एका दंतज्ञाची दात काढता काढता तुटलेली नि नवीन बसवता बसवता परत जुळलेली तरल प्रेमकथा आहे! त्यात चक्क 'तोंडात वाकून बघतोस काय.. तुझ्या चिमट्यात दाढ माझी गावायची नाय' असले गाणे ही होते!

थोडक्यात मुखातील रसनेवर पाच चवी कळत असतील.. पण त्याच जिव्हेच्या शेजारील दंतपंक्तींच्या भंजनातून नवरसांचा परिपोष होऊ शकतो! फक्त तेथे पाहिजे जातीचे आणि काय! तर दंतसाहित्याची वानवा नाही आपल्याकडे!

आता आमचे काय.. दंताजीचे ठाणे पूर्णपणे उठत नाही तोवर दात दाखवत फिरू. मग खुशाल कुणी म्हणो.. हसतील त्याचे दात दिसतील. असतील तर दिसतीलच! नाहीतर हसतील त्याच्या कवळया दिसतील! काय गंमत आहे पहा.. एका दंतज्ञाकडे पोहोचलो आम्ही.. तर काय

ऐकावे? वेटिंगरूम मधल्या एकास ते दातवाले बोलावत होते.. 'मिस्टर कवळी, तुमची कवळी तयार आहे!' आणि मिस्टर कवळींनी आपली (त्याच दंतज्ञांच्या कृपेने) नसलेली बत्तीशी दाखवणारे दंतविहीन हास्य करत त्यांच्या केबिन मध्ये प्रवेश केला. आता यापुढे हे कवळीबुवा हसतील तेव्हा त्यांच्या कवळया दिसतील. मागे एका दंतज्ञाकडे मी कुणी दंतरूग्ण कवळीतलाही दात किडल्याचे सांगत आलेला पाहिला होता. कुणी कडाक्याच्या थंडीत कवळया बाहेर काढल्या तर त्याही कडकड कुडकुडतात असली तक्रार घेऊन आलेला ही आम्ही पाहिला आहे. दातवाले बिचारे काय बोलणार.. आपलीच दंतपंक्ती दाखवत हसले यावर! यावर 'हे मंद मंद सुंदर दंतपंक्ती' असले शीघ्र आणि लघुत्तम काव्य आम्ही तितक्यात आणि तितक्याच गंभीरपणे करूनही घेतले!

तसे आम्ही आजवर गांभीर्याने काही केले नाही. एक हा अहवाल लिहिणे सोडून. मग आमच्या ध्यानात आले.. जोवर काही गंभीर आणि आयुष्याचे मर्म वगैरे सांगणारे आम्ही लिहित नाही तोवर आम्हासही कुणी गांभीर्याने घेणार नाही! उगाच आमच्याकडे पाहून कुणी दाताड वेंगाडूनी हसलेच पाहिजे की काय? तर आम्ही या सर्व पाहणीचा खोलवर आणि सखोल विचार केला.. नव्हे चिंतन आणि मनन केले. विचार करणारे ते सर्वसामान्य हे सर्वमान्य व्हावे. आमच्या सारखे संशोधक करतात ते चिंतन आणि मनन! तर आमच्या अहवाल लेखनाचा अंतिम भाग म्हणून आम्ही त्यात प्रतीकात्मकता शोधून काढली. आपल्या संस्कृतीत प्रतीकांची स्वीकृती जास्त! मग आम्ही या निष्कर्षावर पोहोचलो.. की दात हे एक आयुष्याचे प्रतीक असेल तर कवळी हे जीवनाच्या अशाश्वततेचे प्रतीक! तान्हे बाळ दात आले की कसे जे दिसेल त्यावर त्या दातांचा प्रयोग करीत सुटते.. मग मोठे झाल्यावर दात दाखवीत हसू लागते. आयुष्य असले बेदरकार! बिचाऱ्यावर बसते दात धरून! कुण्या गरीबाकडे दातावर मारायला नसतो पैसा.. तो मग दात कोरून भरतो पोट. करतो काय .. खातो दातओठ आणि दातखीळ बसेल असे खातो आयुष्याकडून फटके! त्यातील जिगरबाज तोच जो तेच दातओठ खात उठतो आणि दात दाखवत करतो दोन

हात! आणि काही करतात दातांच्या कण्या नि काही जातात दाती तृण धरून त्याच आयुष्यास शरण! हाडे झिजली की एकेका दाताचा वेळ होते निरोप घ्यायची.. तर गेलेला दात.. गेलेल्या दिवसासारखाच.. परत येत नाही. अगदी स्क्रू ठोकून नवीन बसवला तरी त्यास मूळच्याची सर नाही येत! आणि कवळी देखील हळूहळू हाडे घासली गेली की बोलता बोलता  घसरून बाहेर येऊ लागते!

आयुष्य हे 'असेच' असते!

खूप विचार करूनही 'असेच' म्हणजे कसे हे आम्ही लिहू नाही शकलो तरी प्रत्येकाने या प्रतीकात्मकतेवर आपला मेंदू खर्ची घालण्यास हरकत नाही. आम्ही फक्त संशोधक आहोत. आमची या गंभीर प्रकरणातून सुटका करून घेत आहोत. अर्थात तसे त्या बौद्धिक मेहनतीचे काही वाटत नाही कारण विद्वज्जनांत उठबस करायची असेल तर गांभीर्यच हवे! तिथे विदुषकी बावळा वेष काय कामाचा? अंतरी ना ना कळा हव्यात.. अजूनही हवे काही. नाहीतर तेच हसतील आमच्यावर दात दाखवत! अर्थात आधी आम्ही सांगितलेच आहे.. हसतील त्याचे दात दिसतीलच! आणि कुणी वयोवृद्ध तपस्वी विद्वान असतील.. तर त्यांच्या दिसतील त्या कवळया!

॥ इति.. श्री दंत पुराणोध्याय: संपूर्ण ॥

## कसं वाटलं पुस्तक मित्रांनो?

फ़ुकट असलं तरी दर्जेदार आहे ना?

काही लोकांचा असा समज आहे की जे फ़ुकट मिळतं ते कमी दर्जाचं असेल. पण तसं नसतं. आपल्याला आपले आईवडील मिळतात ना की ते आपण विकत घेतो? आणि त्यांचे संस्कार? आणि आपला देश आपलं राष्ट्रीयत्व? अगदी आपल्या आजूबाजूच्या हवेतला ऑक्सिजनही फ़ुकटच मिळतो ना. आणि हा मौल्यवान मनुष्यजन्मही फ़ुकटच मिळाला की आपल्याला!

तेव्हा मित्रांनो जे जे फ़ुकट ते ते फ़ालतू असा समज असलेल्या लोकांना एकदा ई साहित्यच्या साइटवर आणा. ई साहित्यची पुस्तकं वाचायला द्या. तुम्ही जे पेराल तेच उगवेल. जर तुम्ही समाजात चांगली मूल्यं पेराल तर तुम्हालाही या समाजात चांगली वागणूक मिळेल. समाज म्हणजे आपणच की. निदान आपल्या आजूबाजूचा समाज तरी मूल्यप्रधान करुया.

चला तर मित्रांनो, एक भव्य चळवळ उभारुया. यात प्रत्येकाने आपला सहभाग घेतला तर हा बाराकोटींचा महाराष्ट्र जगातला सर्वोत्कृष्ट अभिरुचीपूर्ण वाचकांचा प्रदेश बनायला वेळ लागणार नाही.


टीम ई साहित्य

esahity@gmail.com

www.esahity.com


### एक प्रसन्न अनुभव